४८ तास ह्मणजे दोन दिवस पर्यंत, साधारण ह्मणजे ढाळ बंद होईप-र्यंत फिरण्यास काढूंनये. ढाळ बंद झाल्यावर मग त्याला थोडें गवत आणि भुस्यांत थोडा दाणा मिळवून २४ तास पर्यंत देणें सुरू ठेवावें. पाणी थोडें द्यावें. तें थंड असावें. त्याचे अंगावर कपडे नित्यापेक्षां जास्ती गरम ठेवावे. थंड हवा त्याला न लागण्याचा बंदोबस्त ठेवा-वा. जुलाब दिल्यापासून कमींतकमी ३ दिवस त्याला विसावा पाहिजे.

औषधांचीं वजनें व मापें.

या भागांत घोड्यास इंग्रजी औषधें देण्याचा प्रकार सांगितला आहे. सबब खालीं लिहिलेले कोष्टकांत हिंदुस्थानांतील व इंग्लंड देशांतील वजनांचा व मापांचा होईल तितका मेळ घातला आहे.

वजनें.

१ स्क्रुपल ह्मणजे ९ वाल = १ चवलीभार.
१ ड्राम = १९ वाल = ३ चवल्याभार.
१½ ड्राम = ॥ तोळा = ॥ रुपयाभार.
२ ड्राम = १० ग्रेन. ||| तोळा = बारा आणे भार.
३ ड्राम = १ तोळा = १ रुपयाभार.
४ ड्राम = ॥ औंस = १। तोळा = १। रुपयाभार.
८ ड्राम = १ औंस = २॥ तोळे = २॥ रुपयेभार.
२ औंस = ५ तोळे = १ छटाक.
१ पौंड = ६ छटाक = ३० तोळे.

मापें.

॥ औंस = । छटाक.
१ औंस = ॥ छटाक.
२ औंस = १ छटाक.

१ पौंड = ६ छटाक.
१ कार्ट = ॥ शेर.
२ कार्ट = १ शेर.
१ पैंट = ३ पाव किंवा पाऊणशेर.

औषधिक्रिया.

मोरचुताचें पाणी.

मोरचुताची पूड = १ ड्राम = ३ चवल्याभार.
ऊनपाणी = १ पैंट = ३ पाव किंवा पाऊणशेर.

याप्रमाणें पाण्यांत मोरचूत वितळवावें. आणि थंड झाल्यावर तें पाणी लावावें. हें पाणी खांडकें माठण्याचें (भरून येण्यावर प्रशस्त) आहे.

मोरचुताचें मलम.

मोरचुताची पूड = १ ड्राम = ३ चवल्याभार.
टर्पिनटैन = १ ड्राम = ३ चवल्याभार.
लिनासिड (अळशीचें) तेल ४ औंस = २ छटाक.
मेण = ४ औंस = २ छटाक.

आळशीचें तेल व मेण हें एकवट वितळवावें; आणि मग त्यांत टर्पिनटैन व मोरचुत घालावें. व तें गार होई तोंपर्यंत ढवळीत असावें.

खांडकें पडलीं असतील त्यावर हें चांगलें मलम आहे.

फटकीचें पाणी, नंबर १.

तुर्टी (फटकी)—४ ड्राम—१$\frac{1}{4}$ तोळा.
पाणी —१ कार्ट— $\frac{1}{2}$ शेर.

तुर्टी पाण्यांत वितळवावी. हेंही खांडकें माठविण्याचें पाणी आहे.

तुर्टीचें पाणी, नंबर. २.

तुर्टी (फटकी)—२ ड्राम—६ चवल्याभार.
गूळ —४ औंस—२ छटाक.
पाणी —१ कार्ट—.॥. शेर.

हीं सर्व एके ठिकाणीं वितळवावीं. याचा उपयोग वरच्याप्रमाणें.

तुर्टीचें (फटकीचें) मलम.

तुर्टी (फटकी) —१ औंस २$\frac{1}{2}$ तोळे.
लिन्‌सिड(आळशीचें)तेल—३ औंस १$\frac{1}{2}$ छटाक.
मेण —३ औंस १$\frac{1}{2}$ छटाक.
टर्पिनटैन —$\frac{1}{2}$ औंस १$\frac{1}{4}$ तोळा.

विस्तवावर आळशीचें तेल व मेण एकवट वितळवावें. आणि मग त्यांत टर्पिनटैन व तुर्टी घालावी. तें थंड होईतोंपर्यंत ढवळीत असावें, ह्मणजे चांगलें भेळावें. याचाही उपयोग वरच्याप्रमाणेंच आहे.

कापराचें तेल.

कापूर —१ भाग.
टर्पिनटैन—$\frac{1}{4}$ भाग.
गोडेतेल—४ भाग.

हे पदार्थ चांगले भेळून खांडकास लावावे. त्यांतही मांस फार वाढेल तर त्यावर मोरचुताची पूड लावावी.

शेकण्याचीं औषधें.

फ्लानेनचें किंवा कांबळीचें कापड फार ऊन पाण्यांत बुडवून तें पावतास अगर अर्धातास सुजेवर अगर दर्द शेकावयाचें असेल त्यावर लावावें. शेकलेले भागास वारा लागूं देऊं नये. मग शेकलेला भाग सुके वस्त्रानें अगदीं साफ पुसावा. नंतर खालीं लिहिलेलें औषध त्यावर चोळावें:--

मोहऱ्यांचें तेल—४ भाग.
टर्पिनटैन —२ भाग.

हीं औषधें चांगलीं मेळावीं.

बाहेरचे सुजेवर ऊन पाण्याचा शेक देणें हें फार चांगलें आहे. किंवा स्पंजानें शेक द्यावा. अथवा लवचिक नळी ज्याला इल्यास्टिक किंवा रबराची नळी ह्मणतात, तिणें अथवा स्टापकास्क यानें शेकावें. किंवा मोठी जखम झाली असेल आणि त्यामुळें सूज असेल तर त्या सुजेवर ऊन पाण्याची संततधार धरून शेकावें, अथवा ऊन पाण्याचें भांडें घोड्याचे पाठीवर साफ ठेवावें. वांकडेंतिकडें ठेवूं नये. ह्मणजे त्यांतील पाणी वांकडेंतिकडें होणार नाहीं. त्या भांड्याला इंडिया रबरची नळी लावून त्या नळीवाटे पाणी जेथें सूज असून स्पंज बसविला असेल त्या ठिकाणीं वाहूं द्यावें. ह्मणजे जें पाणी अधिक होईल तें स्पंजावरून खालीं जमिनीवर पडेल; आणि स्पंजाच्या द्वारानें त्या सुजेला जितका शेक लागावयाचा तितका लागेल. ही युक्ति कोणीही साधारण बुद्धीचा कलाक मनुष्य सहज करूं शकेल.

ब्लिस्टर (फोड येण्याचें औषध).

ब्लिस्टराच्या माशा —१ भाग.
लिन्सिडचें (आळशीचें) तेल—६ भाग.
मेण —६ भाग.

मेण पातळ करून त्यांत आळशीचें तेल भेळावें, आणि मग त्यांत माशा घालाव्या.

जपाळाचें तेल—$\frac{1}{4}$ औंस—$\frac{1}{8}$ छटाक.

गोडें तेल —४ औंस—१ छटाक.

हीं तेलें चांगलीं भेळून लावावीं.

मोहऱ्यांची पूड—२$\frac{1}{2}$ औंस—१$\frac{1}{4}$ छटाक.

टर्पिनटैन — $\frac{1}{2}$ औंस— $\frac{1}{4}$ छटाक.

ऊन गोडें तेल — $\frac{1}{2}$ शेर.

हीं एकत्र चांगलीं भेळून लावावीं.

उवांचें व गोचड्यांचें औषध.

गोडें तेल —१ शेर.

गंधकाची पूड—३ औंस—१$\frac{1}{2}$ छटाक.

तार (डांबर)—१ औंस— $\frac{1}{2}$ छटाक.

टर्पिनटैन —$\frac{1}{2}$ औंस— $\frac{1}{4}$ छटाक.

हीं एकत्र भेळावीं, व तें औषध कातड्याचे ज्या भागावर उवा व गोचड्या असतील त्या भागावर लावावें.

पोटीस.

कोंडा ऊन पाण्यांत भेळून मऊ लोंधा करावा, आणि तो कापडावर पसरावा आणि त्याचेवर थोडकें गोडें तेल ओतून तें पोटीस लावावें.

जखम घाणेरडी असेल तर जखमेवर पोटीस लावण्यापूर्वीं तिच्यावर कोळशाची पूड छाटावी, आणि तें पोटीस व तो कोळसा वारंवार बदलावा.

पिचकारी.

पिचकारी कशी करावी व मारावी ह्याविषयीं.

एक फूट लांब व अर्धा इंच जाड बांबूची नळी घेऊन तिचीं दोन्ही शेवटें ह्मणजे त्याचे कांठाची धार गोल करावी. मग दीडफूट लांब व चार पांच इंच रुंद अशी सुमारें दीडशेर पाणी राहील इतकी मोठी कातड्याची लांब पिशवी करावी. तिचे खालचे बाजूस बांबूचें शेवट शिरे इतकें मोठें भोंक पाडावें. ती पिशवी बांबूचे नळीचे एका शेवटास मजबूत बांधावी. ह्मणजे पिशवींतील पाणी नळींतूनच बाहेर येईल. मात्र बांधलेले ठिकाणांतून बाहेर न येईल अशी मजबूत बांधावी. पिचकारी मारतेवेळीं नळीस तेल लावावें. आणि ती मळद्वारांत आठपासून नऊ इंचपर्यंत घालून एका हातानें तेथें धरून ठेवावी व दुसरे हातानें पिशवीचें खुलें तोंड असेल तें जनावराचे पाठीबरोबर उंच होईइतकें उचलून धरावें. ज्या औषधाची पिचकारी मारावयाची तें १ ग्यालन किंवा ६ क्वार्टर पिशवीचे उघडे तोंडांत गड्यास ओतण्यास सांगावें. असें केलें ह्मणजे तें हळूहळू आंतड्यांत जातें.

बधुकपिचकारी.

तांदुळाची जाड कण्हेरी—२ क्वार्टर—१ शेर.

अफू —२ ड्राम —$\frac{3}{4}$ तोळा.

हीं चांगलीं भेळून त्याची मळद्वारानें पिचकारी मारावी.

क्रिमी झाले असतां ते मारण्याची पिचकारी.

गोडें तेल—१ क्वार्टर—.॥. शेर.

टर्पिनटैन—१ औंस —$\frac{1}{2}$ छटाक.

हीं ऊन करूनचांगलीं भेळावींत्याचीमळद्वारानेंपिचकारीमारावी.

पिचकारी मारण्याची दुसरी रीति—दवाखान्यांत पिचकारी मारण्याच्या नळ्या दाबासहित ऐत्या तयार केलेल्या मिळतात. त्यां-

पैकीं एक पिचकारी घेऊन घोड्याचे गुदद्वारांत त्या नळीचें टोंक ८ आठ किंवा ९ नऊ इंच घालावें, मग नळींत असलेला औषधी पातळ पदार्थ जो शरीरांत घालावयाचा आहे तो पंपानें शरीरांत जितका घालविला पाहिजे तितका घालवावा. तो १ ग्यालन किंवा ६ क्वार्टर घालवावा असा अजमास आहे.

लोसन—औषधी पाण्यानें जो शरीराचा भाग धुतात त्याला लोसन असें ह्मणतात. तें लोसन (औषधी पाण्यानें घोड्याचा पाय धुणें) कापसाचे वस्त्राची पट्टी लावून करावें. अथवा दुसरा कोणता भाग धुणें असेल तर कापसाचें वस्त्र त्या भागावर बांधून नंतर तो औषधी पाण्यानें धुवावा.

तांदळाची कण्हेरी.

तांदूळ— २ पौंड—१ शेर.

पाणी —१० क्वार्टर—५ शेर.

ही कण्हेरी दीड तासपर्यंत उकळवून कपड्यानें गाळावी; आणि थंड झाल्यावर थोडकें मीठ घालून घोड्यास द्यावी.

जेपाळाचे बियांची पूड—१ स्क्रूपल—१ चवलीभार.

मीठ किंवा एप्समसॉल्ट—$\frac{1}{2}$ पौंड —४ छटाक.

हा हलका जुलाब आहे. हीं औषधें एकत्र मेळावीं.

बद्धकोष्ठ झालें असेल तर वरील औषध एक क्वार्ट ($\frac{1}{2}$ शेर) ऊन तांदळाचे कण्हेरींत द्यावें.

गंधकाची पूड.	—२ औंस—१ छटाक.
आळशीचें तेल (लिन्सिड ऑईल)	—४ औंस—२ छटाक.
ऊन तांदळांची पेज	—१ क्वार्ट—.॥. शेर.

हें सारक औषध आहे. रेचक देऊन जुलाब होण्याचें बंद झाल्यावर बद्धकोष्ठ न होऊं देण्यासाठीं हें उपयोगी आहे.

आळशीचें तेल (लिनसिडऑईल)	—१ पैंट	— ३ पावशेर.
गंधकाची पूड	—४ औंस	— २ छटाक.
सुंठीची पूड	—$\frac{1}{2}$ औंस	—१$\frac{1}{4}$ तोळा.

हें रेचक औषध आहे. तें तांदळाची कण्हेरी एक कार्ट (॥) शेर घेऊन तींत द्यावें.

मीठ	—१ पौंड	— ८ छटाक.
एळ्या (काळाबोळ)	—४ ड्राम	—१$\frac{1}{4}$ तोळा.
गंधकाची पूड	—२ औंस	— ५ तोळे.
सुंठीची पूड	—१ औंस	—२$\frac{1}{2}$ तोळे.
गूळ	—४ औंस	— २ छटाक.
ऊन पाणी	—२ कार्ट	— १ शेर.

हेंही रेचक औषध आहे.

एप्सम्साल्ट किंवा मीठ	—४ औंस	— २ छटाक.
गंधकाची पूड	—३ औंस	—१$\frac{1}{2}$ छटाक.
सुंठीची पूड	—$\frac{1}{2}$ औंस	—१$\frac{1}{4}$ तोळा.
गूळ	—३ औंस	—१$\frac{1}{2}$ छटाक.

हेंही सारक औषधच आहे. हीं सर्व औषधें ४ कार्ट (२ शेर) ऊन पाण्यांत भेळून थंड झाल्यावर द्यावीं.

एप्सम्साल्ट किंवा मीठ	—१ पौंड	—८ छटाक.
एळ्या (काळाबोळ)	—$\frac{1}{2}$ औंस	—$\frac{1}{4}$ छटाक.
आळशीचें तेल	—४ औंस	—२ छटाक.
सुंठीची पूड	—$\frac{1}{2}$ औंस	—$\frac{1}{4}$ छटाक.
अर्क दारू	—२ औंस	—१ छटाक.

हें एक भारी रेचक आहे. हीं औषधें ४ कार्ट (२ शेर) ऊन पाण्याशीं चांगलीं भेळून ऊन असतांच द्यावीं.

नस्य देण्याचा प्रकार.

घोड्यास वात, पित्त व कफ झाला असतां नस्य द्यावें.

१ पिंपळी, निंब, निर्गुडी व सैंधव हीं समभाग घेऊन त्याचें चूर्ण करून ऊन पाण्यांत घोड्यास नस्य करावें. याचे योगानें कफ नाश पावतो.

२ निंबाचीं कोंवळीं पानें त्यांचा रस काढून त्यांत शंख उगाळून वसंतकाळांत घोड्यास नस्य करावें. ह्मणजे पित्ताचा नाश होतो.

३ उंची चंदन उगाळून त्याचें नस्य द्यावें. सर्व प्रकारचे कफ नाश पावतील.

४ द्राक्षांचा रस व अष्टमांश तबकीर एके ठिकाणीं करून नस्य द्यावें. पित्तनाश होतो.

५ साखर व मध हीं समभाग, दूध समभाग आणि पडवळीचें चूर्ण या सर्वांचें नस्य शरत्काळीं घोड्यास द्यावें. पित्तनाश होईल.

६ वेखंड, काळीं मिरीं, कोष्ठ, सुंठ व शृंगीबल हीं थंड पाण्यांत वाटून त्याचें नस्य घोड्यास द्यावें.

७ गुळवेल, धायटीफूल व थोडी हरताळ यांचें थंड पाण्यांत नस्य करून शिशिरऋतूंत घोड्यास द्यावें. व त्यास शीतळ जागेंत बांधावें.

८ शिरसतेल व गोमूत्र हीं एकत्र करून घोड्यास नस्य निघात झाल्यास करावें, ह्मणजे पुष्टता येईल.

९ गोमूत्र व मीठ, यांचें नस्य घोड्यास कंठरोग झाला असतां करावें.

१० मच्छाचें तेल, लसूण, पिंपळमूळ, ब्राह्मी व नागकेशर ह्या सर्वांच्या चूर्णाचें नस्य प्रातःकाळीं घोड्यास केल्यास नेत्ररोग जातो. नेत्ररोग असणारे मनुष्यानेंही हें औषध घेतलें असतां त्याचा नेत्ररोग जाईल.

११ पिंपळी व मीठ हीं दोन्हीं ऊन पाण्यांत मिश्र करून नंतर

थंड करून घोड्यास नस्य करावें. स्निग्ध, रूक्ष, तीक्ष्ण व मध्यम, हे रोगाचे चार प्रकार पाहून नस्य द्यावें.

१२ मार्गशीर्ष, माघ, आषाढ, श्रावण, व भाद्रपद ह्या दिवसांत वाताचा जोर फार असतो; ह्मणून वायु असल्यास, स्निग्ध नस्य द्यावें; कफास रूक्ष व तीक्ष्ण योजावें, आणि पित्त असल्यास मधुर योजावें.

फाल्गुन व चैत्र, ह्या दिवसांत जंतांची पीडा होते. व हिरवा घास खाल्ल्यानें घोड्यास कफ होतो, अशा वेळीं घोड्यास नस्य देण्याचें प्रमाण:—

उत्तम शंभर बिंदु, मध्यम पन्नास व कनिष्ठ वीस. याप्रमाणें नस्य द्यावें.

घोड्याचे अंगीं रक्तदोष असल्यास नस्याचा नाश होतो, सबब जलद उपाय करावे ते:—

१ डाळिंब, पुष्करमूळ व श्वेतदूर्वा, यांचा रस काढून नस्य करावें ह्मणजे रक्तविकार जाईल.

२ धायटी, पुष्करमूळ, कुसुंबा, लोध्र व निर्गुंडी यांचें थंड पाण्यांत नस्य द्यावें. तेणें करून रक्तदोष जातो.

३ धायटी, ब्राह्मी, गोमूत्र व मीठ यांचें थंड पाण्यांत नस्य करून द्यावें. कफविकार नाश होतो.

४ सुंठ, डिकेमाली व राजवृक्षाची अंतरसाल, तुपांत वाटून त्यांचें नस्य करावें; ह्मणजे वातरोग जाईल.

५ माक्षिक, नाबद, साखर, नागकेशर व चंदन यांचें थंड पाण्यांत नस्य करून द्यावें. पित्तनाश होतो.

६ सुंठ, पिंपळी, वेखंड, हिंग, सैंधव व काळीमिरें यांचें ऊन पाण्यांत तयार करून नस्य द्यावें ह्मणजे वात व श्लेष्म नाश पावतात.

७ गुळवेल, सुंठ, मुस्ता, तगर व श्वेतशिरस यांचें उष्ण उदकांत नस्य तयार करून द्यावें. सन्निपात जातो.

८ हिरडा, शंखावळी, शंख, शतावरी, आवळी व एलची या सर्वां-चें थंड पाण्यांत नस्य करून द्यावें. वात व कफ नाश होतो.

९ वेखंड, सुंठ, पिंपळी, सैंधव व काळीमिरें यांचें पाण्यांत नस्य करून द्यावें. कफवात नाश होतो.

१० तुपांत केशर, मध, साखर व नाबद हीं सर्व घालून घोड्यास नस्य करावें. पित्त व सन्निपात नाश पावतात.

११ काथचूर्ण व त्यांत तितकाच हिरडा मिळवून थंडपाण्यांत तयार करून नस्य द्यावें. पादग्रजा रोग नाश पावतो.

क्षुद्ररोगप्रकार.

ग्रंथिदोष.

१ सर्जखार व तितकाच गूळ एकत्र करून एकवीस दिवस नेमानें दिले असतां ग्रंथिदोष जातात.

२ अर्कमूळ व टांकळीमूळ, निवडुंगाचे चिकांत वाटून एकवेळ लेप करावा. त्यांत चित्रकही थोडा टाकावा. हें औषधही वरील रोगावरच आहे.

३ धत्तूर, सर्जिका, हळद, निंबाचीं पानें, दंती, कण्हेर व माका हे समभाग एकत्र करून गोमूत्रांत घालून त्यांची गोळी करावी; तीन दिवस सकाळीं ग्रंथीवर बांधावी, आणि नंतर सोडून पहावें. रोग नष्ट झालेला दिसेल!

वरील रोगांवर पोटांत देण्याचीं औषधें.

१ ओंवा व मूग दोन्ही एकत्र करून द्यावें. म्हणजे ग्रंथिदोष जातात.

२ सज्जिखार व समभाग गूळ हीं एकत्र करून चौदा दिवस रोज एकवेळ एक पलप्रमाणानें घोड्यास द्यावें. तेणेंकरून सर्व ग्रंथिरोग जातात.

मसाला देण्याचा प्रकार.

घोड्यास मसाला देणें तो अनुक्रमें एक मंडळ (७ दिवस) द्यावा. मसाल्याच्या योगानें घोडा शक्तिवान् व रोगरहित होतो.

१. कुटकी, तुळस, भांग, टाकळी व मुस्ता या सर्वांचें चूर्ण करून एक कर्षप्रमाण द्यावें.

२. वेळा, शोपा, चंदन, कावळी, माक्षिक, व शतावरीचूर्ण हें साखर घालून रोज द्यावें. हें पित्तनाशक आहे.

३. मुस्ता, गुळवेल, तुळशीचें चूर्ण, वृंदावनी व रिंगणी या सर्वांचें चूर्ण करून तुपांत मिश्रण करून पलप्रमाण एक वेळ द्यावें. वातरोग नाश पावतो.

४. सुंठ, गुळवेल, गोखरू, नागरमोथे व पेखंड हीं चूर्ण करून पीठ व गूळ यांचे मिश्रणांत एक पलप्रमाणानें द्यावें. सर्वरोग जातात.

५. ज्येष्ठमध, सैंधव, मुस्ता व हरीतकी हीं समभाग चूर्ण करून तें चूर्ण गोमूत्रांत द्यावें. अग्नि प्रदीप्त होतो व घोडा पुष्ट होतो.

६. कांगाणी, केतकी, द्राक्ष व साखर हीं मिश्रण करून तें मिश्रण द्यावें. किंवा ज्येष्ठमध आणि वरील समानचूर्ण घेऊन तें तुपांत द्यावें. शक्तिवर्धक आहे.

७. मत्स्य, मांस व स्वच्छ उडदांचें पीठ समभाग घेऊन तुपांत मिश्रण करून द्यावें. बळ व पुष्टता येते.

८. दहीं, मध व बकऱ्याचें मांस हीं एकत्र करून घोड्यास चारावें. बळ व पुष्टता येते.

९. त्रिफळा, कुटकी, मुस्ता, चित्रक आणि वावाडिंग, एककर्ष-प्रमाण सर्व घेऊन गूळ मिश्रण करून पीठ घालून द्यावें. आळस व सर्व प्रकारचे शूळ नाश पावतात.

१०. पिंपळी, पिंपळमूळ व कुटकी हीं दूर्वांच्या रसांत गोळा करून द्यावीं. दाह नाश पावतो.

११. नागकेशर, बिल्वफळें सागरगोटे व माक्षिक हीं मिळवून चारावें. शूळरोग जातात.

१२. सुंठ, हिरडा, व गूळ, समभाग सकाळीं द्यावें. हें औषध घोड्याची धातु पडते त्याजवर वस्ताद आहे.

१३. वेखंड, लोध्र, कचोरा, अतिविष, पिंपळी, गूळ व मध या सर्वांचें मिश्रण करून एक वेळ द्यावें. त्याचे योगानें वीरश्री व बळ उत्पन्न करतें.

१४. मत्स्यतेल, बकऱ्याचें मांस (दुप्पट), लसूण व नागकेशर या सर्वांचा पिठांत गोळा करून रोज एक वेळ चारावा. हा शक्तिवर्धक आहे.

१५. जंबीरपत्रें, कमलदळें व वेखंड आणि तितकाच गूळ, एकवेळ चारीत जावें. रक्तदोष जातात.

१६. कोलिस्ता, शेवगामूळ, पिंपळी, विडंग, (वावाडिंग) हळद व गूळ हीं मिश्रण करून तें औषध द्यावें, रक्तदोष जातात.

१७. वातबद्ध घोडा झाल्यास मंद चालतो. त्यास मसालाः—पिंपळी, पिंपळमूळ, चव, चित्रक, सुंठ, अतिविष, ओंवा, सैंधव, वेखंड, हरीतकी, अजमोदा, शिग्रमूळ. वावडिंग व बोरी हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करून त्यांत चौपट गूळ घालून समान गोळ्या कराव्या. वातभग्न, रक्तदोष व कासश्वास, वगैरे नाश पावतात.

१८. पिंपळी पिंपळमूळ, बोरी, लसूण, अजमोदा, वावाडिंग, संचळ, सैंधव, श्वेतजिरे, ओंवा आणि वर्धरा, या सर्वांचें चूर्ण करून चौपट

गूळ घालून सातपळें एक वेळ द्यावें. गात्रभंग, रक्तदोष, अजीर्ण व विषूचिक हे सर्व रोग जातात.

१९. तमालपत्र पुष्करमूळ, लोध्र, अघाडा व टेंभुरणीफळ या सर्वांचें चूर्ण एक वेळ द्यावें. सात दिवस दिल्यानें वायु व शीतपित्त नाश पावतात.

२०. अतिविष, हरीतकी व किंचित् हरताळ हीं मिळून ते मिश्रण तांदुळाचे धुवणांत द्यावें. जृंभवात नाश पावतो.

२१. मूग भाजून त्याचें पीठ, वेखंड आणि राळ हीं तूप व गूळ यांत द्यावीं.

२२. वावडिंग, कापूर, मोथा व गुळवेल, पाण्यांत मिश्रण करून द्यावें. वलितरोग नाश पावतो-

२३. साखर, दूध, कापूर, एलची, व तमालपत्र, मिश्रण करून द्यावें. अग्निदग्धाच्या लहरा नाश पावतात.

२४. गीष्मकाळीं दाहा होत असल्यास घोड्यास कांजीचा लेप करावा व सातूचें पीठ खाण्यास द्यावें, दाहा शांत होतो.

२५. तेल व लसूण एकत्र करून चारल्यास वातशीत रोग जातो. हें औषध शीतकाळांत द्यावें.

२६. साखर, तूप, दूध, व दास हीं मिश्रण करून दिल्यास कफाचा नाश होतो. किंवा त्याजमध्यें पीठ मिश्रण करून द्यावें.

२७. रोचन, बर्बरी, आवळी व पक्व महाळुंग यांचें मिश्रण करून दिल्यास कफाचा नाश होतो.

२८. सहदेवी, वेखंड, वृंदावनी, व कोष्ठ, यांचें चूर्ण मधांत मिश्रण करून द्यावें, श्वासरोग जातो.

२९. उंबराचीं पिकलेलीं फळें, हशीचे दह्यांत कल्क करून द्यावीं. दाह शांत होतो.

३०. बिल्याच्या फळांची त्वचा, कांगोणी व मीठ या सर्वांचा कल्क करून द्यावा.

३१. कचोराचूर्ण धाजमध्यें सैंधव व संचळ मिळवून ताकांत वाटून द्यावें. येणेंकरून घोडा मूत्र करीत नसल्यास करूं लागतो.

३२. संचळ, हळद, पिंपळी व वृंदावनी हीं मिश्रण करून दिल्यास मूत्रकृच्छ्ररोग नाश होतो.

३३. जंबीरफळें (जांभूळ), सातू, मध, बिबवा व पांढरा भोपळा यांची निंबरसांत गोळी करून द्यावी. घोडा रक्तमूत्र करीत असल्यास बंद होतें.

३४. हिरडा, ज्येष्ठमध, अतिविष, देवदारू व पुष्करचूर्ण हें मिश्रण करून द्यावें. रक्तमूत्ररोग नाश पावतो.

३५. पटोळ, धायटी, मध, यष्टिका, मोथा व गिरिकार्णिका यांचें मिश्रण करून द्यावें. रक्तविकार दूर होतो.

३६. घोड्याचें अंग तप्त होतें, श्वास करतो, तोंडांतून रक्तस्राव होतो, व तसाच नाकांतूनही रक्तस्रास होतो त्यास मसालाः—

खजूर, कोहळा व कांकडी यांचा साखर घालून रस काढावा. तो घोड्यास वरचेवर दिल्यास रक्तपित्तदोष नाश पावतात.

३७. औदुंबराच्या मूळाजवळचें पाणी, मध व साखर हें मिश्रण करून द्यावें; रक्तपित्त नाश पावून बळ येतें.

३८. दोन्ही हळदी, गंधक, विडंग (वावडिंग) व शिरसाचें तेल मिश्रण करून दिल्यानें कंडूकुष्ट नाश पावतें.

३९. आळशी, तमालपत्र, निंबाचीं पानें व वडाचे कोंब पाण्यांत वाटून द्यावें. अतिसार नाश पावतो.

४०. गुंजा व एरंडाचें बीं, वाटून त्याचा लेप अंगावर व्रण पडल्यास त्याजवर करावा. व्रणरोग जातो.

४१. तमालपत्रें निर्गुडीपत्रें व मिरे, एकत्र करून, ज्येष्ठमध समान घालून द्यावें.

४२. जखमी घोडा झाल्यासः—

सैंधव, जवखार, विडंग व मध मिश्रण करून द्यावें; नखम, शस्त्रपीडा नाश पावते.

४३. वेखंड, टांकणखार, तीळ, सज्जीखार व जवखार यांत समभाग गूळ घालून, घोड्यास एक वेळ उक्त प्रमाणानें चौदा दिवस दिल्यानें सर्व रोग नाश पावतात.

४४. सुंठ, मिरे, पिंपळी, सैंधव, वज्रखार, हिंग, संचळ, हरीतकी, कुटकी, अजमोदा, ओंवा, जव, चित्रकमूळ व वावडिंग यांचें चूर्ण करून एरंडेलांत द्यावें; शूळरोग जातात.

४५. मदनफळ, पिंपळी, सुंठ, काळी हरीतकी, ओंवा, अजमोदा व शेवग्याची मुळी गूळ घालून ती गोळी द्यावी. शूळरोग जातो.

४६. हिंग, सुंठ, पिंपळी, मिरे, हर्तकी, ओंवा, यवक्षार, कचोरा, सैंधव व गुंजासार, समभाग करून चूर्ण करून ताकांत मिश्रण करून पांच पलप्रमाण द्यावें. गुल्मोदर व शूळ, हे रोग जातात.

४७. रिठा, कचोरा व सैंधव, ऊनताकांत वाटून द्यावें; ह्मणजे घोड्यास मळ बद्ध झाल्यास ढाळ होतात.

४८. अतिविष, सुंठ, सैंधव, गुळवेल, शिरस व पांढरा आम्लवेत या सर्वांचें चूर्ण पिठाबरोबर द्यावें. सर्व शूळ नाश पावतात, व त्यांतच किंचित् गूळ घातला ह्मणजे पित्तवाताचा नाश होऊन बळ येतें.

४९. वाळा, धायटी, लोध्र, धने व जिरे या सर्वांचें चूर्ण ताकांत द्यावें. अतिसार नाश पावतो.

५०. राई, हळद व जिरे, यांचें चूर्ण ताकांत द्यावें. अतिसार नाश पावतो,

५१. संचळ, कवठ, वाळा, श्वेतजिरे, बिल्व, धायटीचीं फुलें, लोध्र व मोचरस, समभाग सर्वांचें चूर्ण करून ताकांत मर्दन करून द्यावें. सर्वप्रकारचे अतिसार नाश होतात.

५२. धायटी, अघाडा, जंबू, कांचनार व तेज, समभाग चूर्ण

करून दहीं व ताक यांचे मिश्रणांत द्यावें. रक्तातिसार तत्काळ नाश पावतो.

६१. बिल्व, धायटी, मंजिष्ठ, लोध्र व धने या सर्वांचें मिश्रण करून तें दारूंत द्यावें. सर्व अतिसार नाश होतात.

रोगाचीं कारणें.

रोग सहा प्रकारानें होतातः—

१. त्वचेसंबंधी.—स्पर्शापासून किंवा स्पर्शरहित कारणांनीं.

२. शरीरेंद्रियांचे व्यापारांत कमजास्त झाल्यानें.

३. सुजेपासून.

४. अजीर्णापासून.

५. विशेष प्रकारानें.

६. अपघातापासून.

१. स्पर्शजन्य—ह्मणजे, खरूज, देवी वगैरे; हे रोग स्पर्शापासून होतात.

२. भूक तहान न लागणें किंवा दोन्ही जास्त होणें, ह्मणजे, इंद्रियांचे व्यापारांत कमजास्त झाल्यानें.

३. रक्त एके ठिकाणीं जमल्यानें किंवा शरीरेंद्रियांचे भाग ठेंचल्यानें.

४. अधिक खाल्ल्यानें वांती व ज्वर वगैरे उत्पन्न होतात.

५. संधिवात, गंडमाळा, इत्यादि विशेष प्रकारचे रोग आहेत.

६. पडल्यापासून हातपाय दुखणें किंवा हाडें मोडणें.

विशेष उपचारांची माहिती.

उपचार दोनप्रकारचे आहेतः एक पोटांत देणें, आणि दुसरें बाहेर औषधें लावणें.

औषधें देण्याच्या चार तऱ्हा आहेतः एक, गोळीकरून देणें;

दुसरी, पातळ पदार्थ करून देणें; तिसरी, चूर्ण देणें; आणि चवथी, चाटण देणें.

गोळी देणें ती नरम करून हातानें घोड्याचे तोंडांत घालावी; पातळ औषध देणें तें दाण्यांत किंवा दुसऱ्या पाजण्याच्या तऱ्हेनें द्यावें; चूर्ण, दाण्यांत किंवा पिठांत द्यावीं; आणि चाटण हातानें द्यावें.

घोड्याची साधारण प्रकृति बिघडली तर खालील औषध द्यावें:—

स्टिंकिंग हेलीबोर (काळीकुटकी) पांच पासून आठ ग्रेन आणि ऱ्हुबर्ब पौडर (रेवाचिनी) दोन पासून चार ग्रेन पर्यंत, यांची एकत्र गोळी करून रात्रीं दररोज द्यावी.

त्वचेचे रोगांवर उपचार.

एमेटिक टारटर पांच औंस, पौडर जिंजिर (सुंठीची पूड) तीन औंस व ओपियम (अफू) एक औंस. साखरेच्या पाकांत या सर्वांचें मिश्रण करून सोळा गोळ्या कराव्या. रात्रीं रोज देणें.

घोड्यास उष्ण झालें असेल तर शीत करण्यास उपायः—

बार्बेडोस अलोस एक औंस, क्यास्टाईल सोप दीड औंस व जिंजिर (आलें) अर्धा औंस, या सर्वांचें साखरेच्या पाकांत मिश्रण करून त्याच्या सहा गोळ्या कराव्या; प्रत्येक सकाळीं एक गोळी देत जावी.

घोड्यास हुब्बक व रिंगाडा, झाल्यास त्यावर उपायः—

बारबेडोस अलोज एक औंस, एमेटिक टारटर दोन ड्राम व क्यास्टाईल सोप एक ड्राम, यांचें मिश्रण करून गोळी देत जावी.

साधारण सर्व रोगांवर उपाय.

ब्ल्याक सल्फ्यूरेट ऑफ अँटिमनि (सुरमा) दोनपासून चार ड्राम, सल्फर (गंधक) दोन ड्राम, नायटर दोन ड्राम आणि लिन्सिड-

सिडमील (जवस   ) यांत पाणी गोळा होण्यापुरतें घालावें. आणि त्यांची एक ... करून द्यावी.

हरएक रोग शुद्ध किंवा निर्दोष करण्यावर औषध.

फ्लावर्स ऑफ सल्फर (गंधकाचें फूल) सहा औंस, एमेटिक टार्टर पांचपासून आठ ड्रामपर्यंत, क्यारोसिव्ह सब्लिमेट १० दहा ग्रेन आणि लिनसिडमील (जवसाचा मगज) यांच्या ऊन पाण्यांत सहा गोळ्या कराव्या. आठवड्यांतून दोनदां किंवा तीनदां एक एक गोळी द्यावी.

अग्निमांद्यावर उपाय.

क्यालोमेल (पारदभस्म) एक स्क्रूपल, आलोज एक ड्राम, कार्ब क्यारिला, जंटेन (काडेचिराईत) व जिंजिर (आलें) ह्या तिहींची पूड प्रत्येकी एक ड्राम, आणि क्यास्टाइल सोप तीन ड्राम यांची सायरप (साखरेचा पाक) मध्यें एक गोळी करून आठवड्यांतून दोनदां द्यावी किंवा प्रत्येक दुसरे दिवशीं रात्रीं देत जावी.

अनोडाइन ह्मणजे दर्द कमी करणारी दवा.

मज्जातंतु, हगवण, पोटदुखी किंवा तिडिक व चांदणी यांजवर देण्याची पोटदुखीवर—पावडर ओपियम (अफूची बुकणी) अर्ध ड्राम पासून दोन ड्रामपर्यंत, क्यास्टिल सोप व क्यांफर (कापूर) प्रत्येक दोन ड्राम, आणि जिंजर (आलें) दीड ड्राम यांचा लिकरिस पावडर आणि ट्रिकल (काकवी) ह्या दोहींत गोळा तयार करून बरणींत ठेवावा आणि जोंपर्यंत पोट दुखत आहे तोंपर्यंत प्रत्येक तासाळा थोडथोडा देत जावा.

साधारण दर्द दूर कर

१. ओपियम (अफू) अर्धड्रामपासून ५॥ ५॥पर्यंत, क्यास्टिक सोप दोनपासून चार ड्रामपर्यंत, जिंजिर (आलें) एकपासून दोन ड्राम, पावडर ॲनिसीड अर्धाऔंसपासून एकऔंस आणि क्याराक्सी-ड (ओंव्याचें) तेल अर्धा ड्राम यांजमध्यें सर्वांचा गोळा होण्यापुरता साखरेचा पाक घालून गोळा करावा. नंतर तो गोळा अर्धी बाटली एल् नांवाचे दारूंत मिळवून तें मिश्रण घोट्यानें पाजावें.

वरचेवर लीद होत असल्यास (ऑर्डिनरी डायरिया) त्यावर उपाय.

१. अरेबिक् गम (अरबीगोंद) दोन औंस व बॉयलिंग वाटर (कढतपाणी) पाऊणशेर यांचें मिश्रण करून नंतर त्यांत पेपरमिंटा-चें तेल २९पंचवीस थेंब व टिंचर ऑफ ओपियम (अफूचा अर्क) अर्ध औंस यांचें मिश्रण करून, जरूर असेल त्याप्रमाणें सकाळीं व संध्याकाळीं थोडें थोडें द्यावें.

साधारण जुलाबावर दुसरा उपाय.

१. पावडर च्याक (खडूची बुकणी) एक औंस आणि अरेबिक-गम (अरबीगोंद) प्रत्येक एकेक औंस हीं टिंचर ऑफ ओपियम (अफूचा अर्क) अर्धा औंस आणि पेपरमिंटाचें पाणी दहा औंस यांजमध्यें मिश्रण करून तें मिश्रण सकाळीं व संध्याकाळीं थोडें थोडें द्यावें.

सर्दी दूरकरणारी दवा.

शरीरांत तिडका, वेग, पेटके येणें किंवा कंप होत असेल त्याजवर.

१. पोटदुखीवर.—स्पिरिट ऑफ टरपेनटाइन (टरपेनटाइन तेल)

१ तीन औंस आणि टिंचर ऑफ ओपियम (अफूचा अर्क) १ औंस, *हीं सर्व बाटलीभर एल नांवाच्या दारूंत घालून तें पेय घोट्यानें पाजावें.

२. स्पिरिट ऑफ टरपेनटाइन (टरपेनटेल) साडेतीन औंस, टिंचर ऑफ ओपियम (अफूचा अर्क) दीड औंस, आणि बारबाडोज अलोज एक औंस. अलोजची भुकणी करून ऊन पाण्यांत टाकावी. नंतर वरील जिन्नस घालून तें औषध घोट्यानें पाजावें.

पोटदुखीवर पिचकारी मारण्यास औषध.

स्पिरिट ऑफ टरपेनटाइन सहा औंस ? अलोज दोन ड्राम हीं दीड शेर (तीन कार्टे) ऊन पाण्यांत मिळवून नंतर टरपेनटाइन त्यांत चांगलें मिसळून द्यावें.

४. जिंजिर (आलें) चारपासून सहा औंस, टिंचर ऑफ क्यॉपसिकम् दोन ड्राम, टिंचर ऑफ ओपियम (अफूचा अर्क) १ तीन ड्राम व दीड शेर ऊन पाणी हीं सर्व एकत्र मिसळून तें पेय घोट्यानें पाजावें. परंतु हें औषध शरीरावर सूज असेल तर देऊं नये.

ढाळकाविषयीं.

१. साधारण जुलाब—बारबेडोज अलोज तीनपासून आठ ड्रामपर्यंत, हार्डसोप चार ड्राम व जिंजर एक ड्राम हीं थोडी मिश्रणापुर्ती ऊन पाण्यांत मिश्रण करून तापवून तें मिश्रण पिण्यास द्यावें. पोटांत मुरडणार नाहीं.

२. उष्ण जुलाबाचा गोळा—बारबेडोज आलोज तीनपासून आठ ड्रामपर्यंत, क्यारबोनेट ऑफ सोडा अर्धा ड्राम, आरोम्याटिक पौडर एक ड्राम, आणि आईल ऑफ कॅरावे (ओंव्याचें तेल) बारा थेंब. वरच्याप्रमाणें सर्वांचें मिश्रण करून नंतर तें तेल घालून द्यावें.

३. सौम्य जुलाब.—बारबेडोस अलोज तीनपासून पांचड्रामपर्यंत,

ऱ्हुबर्ब पौंडर एकपासून दोनड्रामपर्यंत, जिंजर दोन ड्राम आणि ऑईल ऑफ क्याराबे, पंधरा थेंब, या सर्वांचें मिश्रण ऊन पाण्यांत करून पहिल्याप्रमाणें गोळा करून द्यावें.

४. कोठा साफ होण्यास 'वासी' जातीच्या घोड्याकरितां.—बारबेडोस अलोज तीन ड्राम, ऱ्हुबर्ब दोन ड्राम, जिंजर आणि क्यासक्यारिला पौंडर प्रत्येक एक ड्राम, ऑईल आफ क्याराबे पंधरा थेंब आणि क्यारबोनेट ऑफ सोडा दीड ड्राम, हीं ऊन पाण्यांत प्रथम अलोज मिश्रण करून नंतर सर्व औषधें पहिल्याप्रमाणें मिळवून तें पेय द्यावें.

५. क्यालोमेलच्या जुलाबाचा गोळा.—बारबेडोज अलोज तीनपासून सहा ड्रामपर्यंत, क्यालोमेल अर्धा ड्रामपासून एक ड्रामपर्यंत ऱ्हुबर्ब एकपासून दोन ड्रामपर्यंत, जिंजर अर्धा ड्राम पासून एक ड्रामपर्यंत आणि क्यास्टिल सोप दोन ड्राम. वरच्या प्रमाणें मिश्रण करून गोळा द्यावा.

६. साधारण पातळ मिश्रण.—बारबेडोस अलोज तीनपासून चार ड्रामपर्यंत, क्यानेला अलबा एकपासून दोन ड्राम, साल्ट आफ टार्टर एक ड्राम आणि मिन्ट वाटर आठ औंस, हीं मिश्रण करून तें द्यावें.

७. दुसरा प्रकार.—क्यास्टर आइल (एरंडीचें तेळ) तीनपासून सहा औंस, बारबेडोज अलोज तीनपासून पांचड्राम, क्यारबोनेट ऑफ सोडा दोनड्राम, आणि मिंटवाटर आठ औंस. प्रथम मिंटवाटर ऊन करून त्यांत अलोज मिसळून नंतर सर्व औषधें मिळवून द्यावें.

८. सौम्यजुलाबाचें पातळ औषध.—क्यास्टर आइल चार औंस, इप्सम साल्ट तीनपासून पांच औंस आणि ग्रुएल (भाताची पेज) दोन बाटल्या, हीं सर्व औषधें एकत्र करून द्यावीं.

९. फारच सौम्य असे जुलाब.—क्यास्टर ऑईल व लिनसिड ऑईल प्रत्येक चार औंस आणि ऊन पाणी किंवा भाताची पेज एक बाटली, हें औषध वरच्याप्रमाणें मिश्र करून द्यावें.

१०. उन्मादरोगावर जुलाब.—बारबेडोस अलोज, सहा ड्राम, कामन साल्ट (मीठ) सहा औंस, फ्लोअर ऑफ मस्टर्ड (राईची बुकणी) एक औंस आणि पाणी दोन शेर मिळवून द्यावें.

११. थोडी थंडी झाली असतां सौम्य व पातळ जुलाब.—इप्सम साल्ट सहापासून आठ औंस. व व्हे (ताक) दोनबाटल्या हें मिश्रण करून घोड्यानें पाजावें.

१२. जुलाबाकरितां पिचकारी देणें तीः—

कामनसाल्ट (मीठ) चार पासून आठ औंस व ऊनपाणी चारपासून आठ शेर मिश्रण करून पिचकारी मारावी.

कषायान्वित औषधें.

काढा करून तोंडानें पाजण्याची आणि वरती जखमेचे तोंडावर व चट्टयांवर बाहेरून लावावयाचीं कषायान्वित औषधें. घोड्याचे शरीरांत किंवा वरचे भागावर हाडें जमण्यास किंवा दुखवलेला वरचाभाग भिळून येण्यास या औषधांचा उपयोग करावा.

१. घोड्याचे डोळ्यांस आजार झाला असतां डोळे धुण्यास औषध. सल्फेट ऑफ झिंक पांच पासून आठ ग्रेन आणि पाणी दोन औंस. यांचें मिश्रण करून त्याणें डोळे धुवावे.

२. गोलार्ड एक्स्ट्र्याक्ट (गोलार्डचा अर्क) एक ड्राम व पाणी एक औंस, यांचें मिश्रण करून त्याणें डोळे धुवावे.

३. घोड्यास रक्ताची लघवी होतअसल्यास त्यावरः पावडर्ड क्याटेच्यू (काथाची बुकणी) अर्धा औंस, अलम अर्धा औंस, क्यॉस क्यारेला बार्क पावडर एक पासून दोन ड्रामपर्यंत व लिक्वारिस पावडर आणि ट्रीकल ह्या दोन्ही औषधी सर्व औषधांचा गोळा होण्यापुरत्या घालून तें औषध दिवसांतून दोनदां द्यावें.

४. फार मूत्रमेह होत असल्यासः—ओपियम (अफू) अर्धा-

ड्राम, जिंजर पावडर (सुंठीची पूड) दोनड्राम, ओकबार्क पावडर (ओकसालीचें चूर्ण)एक औंस,आणि क्यामो माइल चहा एक बाटलीभर तयार करून, त्यांत वितळेल इतकी अलम (तुरटी) मिळवावी व त्या सर्वांचे मिश्रण करून, तें घोड्यानें पाजावें.

५. घोड्यास व्रण झाला असतां त्याचे भोंवतालीं लावण्याचें औषधः—पावडर अलम (तुरटीची पूड) चार औंस व आर्मिनीयन बोळ एक औंस.

६. व्हाइट व्हिट्रियल चार औंस व आक्सिड ऑफ झिंक एक औंस यांचे मिश्रण करून लावावें.

७. धुण्याचीं औषधेंः—गोलार्ड एक्स्ट्राक्ट दोनपासून तीन ड्रामपर्यंत व अर्धी बाटली पाणी.

८. सल्फेट ऑफ् कॉपर एकपासून दोनड्राम व अर्धी बाटली पाणी यांचे मिश्रण करून धुवावें.

९. टांचा सुजल्या असल्यास त्याजवर तेल लावण्याचा उपायः— सुपर असिटेट ऑफ लीड एकड्राम व लार्ड (चर्बी)एक औंस यांचें मिश्रण करून लावावें.

१०. दुसरा उपाय—नाइट्रेट आफ सिल्व्हर पावडर अर्धाड्राम,गोलर्ड एक्स्ट्र्याक्ट एकड्राम व लार्ड एक औंस यांचें मिश्रण करून लावावें.

तेलें व ब्लिस्टरें.

१. साधारण सूज आली असल्यास तेल लावावें तें:—हॉगज़ लार्ड (डुकराची चर्बी) चार औंस, व्हेनिस टरपेनटाइन एक औंस व पावडर्ड क्यांथेरिड सहा ड्राम हीं मिश्रण करून तें तेल लावावें.

२. फार सूज आली असल्यास त्याजवर तेलः—स्पिरिट ऑफ टरपेनटाइन एक औंस व सल्फ्यूरिक आसिड मोजूनच दोन ड्राम—फार काळजीनें, उघड्या हवेमध्यें, त्या आसिडाचें मिश्रण करून, नंतर

डुकराची चर्बी मिळवावी. ती चर्बी चार औंस पाहिजे. त्यांत पावडर्ड कॅंथाराइड्स् एक औंस मिश्रण करून लावावें.

३. सूज आली असल्यास त्यावर फोड आणण्याचें कडक औषध :-स्ट्रॉंग मर्क्यूरिअल ऑइन्टमेन्ट चार औंस, ऑइल ऑफ आर्ग्यानम् अर्धा औंस, फाइनली पावडर्ड यूफरबियम तीन ड्राम व पावडर्ड कॅन्था-रिड अर्धा औंस यांचें मिश्रण करून लावावें.

४. जलद उपाय करणारें ब्लिस्टरः-राईची चांगली पूड आठ औंस पाण्यांत घालून त्याची खळ करावी. नंतर त्यांत स्पिरिट ऑफ टरपेन्टाइन् दोन औंस मिळवावें व स्ट्रॉंग लिकर ऑफ आमोनिया एक औंस हीं सर्व तयार करून कुशी, पोट व पाठ ह्या ठिकाणीं चांगलें सपाटून चोळावें.

५. साधारण ब्लिस्टरः—स्ट्रॉंग मर्क्यूरियल ऑइन्टमेन्ट दोन औंस, ऑइल ऑफ अर्ग्यानम् दोनड्राम, कारोसिव्ह सब्लिमेट दोन-ड्राम व कॅन्थारिडस् पावडर तीनड्राम यांचें मिश्रण करूनहातांनीं खूप चोळावें.

६. कडक साधारण ब्लिस्टर, (चपरहडी, चक्रावळ, बेरहडी) वगैरेंवरः—

रेड आयोडाइड ऑफ मर्क्यूरी एकपासून दीडड्रामपर्यंत, आणि लार्ड (चरबी) एक औंस, हें, पायांवरचे किंचित् केस काढून तेथें चां-गलें चोळावें व अर्निका हें रोजचेरोज ब्रशानें धुतल्यासारखें लावावें. टिंचर ऑफ अर्निका एक औंस आणि पाणी बारा किंवा चौदा औंस यांचें मिश्रण करून त्याणें धुवावें.

७. टिंचर ऑफ आयोडाइन हें ब्रशानें रोज त्याजवर लावावें. तें हाडावर कातडें येईपर्यंत लावावें. नंतर कांहीं दिवस बंद ठेवून फिरून लावीत जावें.

घोड्यांस औषधाचे योगानें भाजणें.

क्यास्टिक ह्मणजे औषधाचे योगानें घोड्याचे शरीरास डाग देणें, यांत दोन भेद आहेत: एक लोखंड अग्नींत तापवून भाजणें; व दुसरें पोट्याश, लूनार क्यास्टिक वगैरेंनीं भाजणें. ह्यांपैकीं पहिल्या प्रकारचें भाजणें ह्मणजे जेथें फार मोठी सूज आली असेल तेथेंच त्याचा उपयोग करतात. हा भाजण्याचा प्रयोग जो रोग ह्मणजे सूज-किंवा हाडांतील दर्द त्याजवर ब्लिस्टर लावून, उपयोगांत आणिला असतां सूज कमी होते. हा प्रयोग करून तीन महिने गुजरल्यावांचून अग्निदाह करूं नये.

तीव्र आणि घट्ट क्यास्टिक औषध.

१. फ्यूज्ड पोटॅश ह्याचा उपयोग करणें कठिण आहे, कारण तो सर्व जागेला पसरतो. सबब घोड्याचे दर्दावरचे औषधांत त्याचा उपयोग थोडा करितात.

२. लूनार क्यास्टिक अथवा नाइट्रेट ऑफ सिल्व्हर हें फार करून घोड्याचे रोग जाणणारे लोक उपयोगांत आणितात.

३. सल्फेट् ऑफ् कॉपर याचाही उपयोग सदरीं लिहिल्याप्रमाणेंच आहे. परंतु लूनार क्यास्टिक प्रमाणें हें तीव्र नाहीं. हें औषध दर्द माठून येईपर्यंत पुष्कळ चोळलें पाहिजे. घोड्याचा गुडघा मोडतो अगर त्या सारखें दुसरें दर्द होतें त्या वेळेस चोळावें.

४. कारोसिव्ह सब्लीमेट पावडर ही चामखीळ वगैरेंवर लाविली असतां जलद नाश करिते. हें औषध फारच युक्तीनें तेवढ्याच जागेवर लावावें, आणि थोडे मिनिटांनीं लागलेंच धुऊन टाकावें. परंतु हें लावण्यास दर्द जाणाराचा हात चांगलाच बसला पाहिजे.

५. यलो आर्पिमेन्ट याचाही उपयोग सदरीलप्रमाणेंच आहे. हें औषध वरीलप्रमाणें तीव्र नाहीं. सबब निर्भयपणानें लावावें. चामखीळ किंवा मस ह्यांचे वर हें चोळलें असतां तीं जातात.

६. स्ट्रॉंग लिकिड क्यास्टिक, ह्मणजे पातळ पदार्थांचा तीव्र दाहः—

सलफ्यूरिक आसिड अथवा नाइट्रिक आसिड ह्यांचा उपयोग, तितक्याच प्रमाणाचें पाणी घालून किंवा पाण्यावांचून तें चोळून, करावा. परंतु तें कातड्याला (त्वचेला) लवकर जाळतें; सबब जपून उपयोग करावा.

७. घोड्याचे पायाच्या तळव्यावर व पुतळीवर मुरदाड मांस वाढतें, त्याजवरः—क्ुइक् सिल्व्हर एक औंस, व नाइट्रिक आसिड दोन औंस. मातीचे परळांत मिश्रण करून थंड झाल्यावर रुंद कांचे-च्या शिशांत ठेवावें व बूच मारावा. व त्यांत एकपासून तीन औंसपर्यंत पाहिजे असल्यास चरबी घालावी.

८. याचप्रकारचें दुसरें औषध अदलून बदलून लावण्याचें तें:— कॉपर फिलिंग्ज अर्धा औंस व नाइट्रिक आसिड एक औंस या दोहींचें मिश्रण करून वर लिहिल्याप्रमाणें उपयोग करावा.

९. म्यूरिएट ऑफ अन्टिमोनी यास बटर ऑफ अन्टिमोनी ह्मणतात. हें फार तीव्र असून नेहमीं वापरण्यासवरण्यासारखें नाहीं. याचा उपयोग नुस्ता करावा किंवा थोडें किंवा फार पाणी मिळवून करावा.

१०. माइल्ड सालिड क्यास्टिक ह्मणजे सौम्य घट्ट क्यास्टिकः—

व्हर्डिग्रीस याची बुकणी किंवा चरबी बरोबर मलम करून एक पासून तीन औंस सारखें घेऊन, चोळावें.

११ रेड प्रेसिपिटेट याचा वरच्या प्रमाणेंच उपयोग करावा.

१२. बर्न्ट आलम् (भाजलेली फटकी) कोरडीच उपयोगांत आणावी.

१३. पौडर्ड व्हाइट शुगर (पांढऱ्या साखरेची बुकणी) हिचा उपयोग करावा.

१४. माइल्ड लिक्विड क्यास्टिक ह्मणजे सौम्य पातळ क्यास्टिकः सोल्यूशन ऑफ नाइट्रेट ऑफ सिल्व्हर (पांच पासून पंधरा ग्रेन) व एक औंस शुद्ध पाणी, मिश्रण करून लावावें.

१५. सोल्यूशन व्ल्यूव्हीट्रियल (मोर्चूत) वरच्या पेक्षां दुप्पट मानानें घेऊन मिश्रण करून लावावें.

१६. क्लोराइड ऑफ झिंक, तीन ग्रेन व एक औंस पाणी, मिश्रण करून लावावें.

चार्ज (मलमपट्टी).

ही दवा प्लयास्टर प्रमाणें आहे. ही घोड्याचे पायावर ऊन असतांनांच बांधावी. आणि लौकर तागाचे कापडानें पाय आच्छादावा. व तो चरूं लागला किंवा हिंडूं लागल्यास सुटूं नये.

नेहमींच्या साध्या पट्या.—बरगंडी पिच चार औंस, बारबेडोज टार चार औंस, बीव्याक्स (मेण) दोन औंस व रेडलेड (तांबडें शिसें) चार औंस; पैकीं पहिलीं तीन एकत्र मिश्रण करून वितळवावीं आणि नंतर शिसें घालून तें मिश्रण लावण्याजोगें थंड होईपर्यंत ढवळीत जावें. कदाचित् हवेनें घट्ट झाल्यास चरबी किंवा तेल घालून नरम करून लावावें.

आर्निका मलम.—कानडा ब्यालसम दोन औंस व पावडर आर्निका लीव्हज् अर्धा औंस. ब्यालसम हें वितळवून पानासहित लाविल्यास स्पिरिट्स टरपेन्टाइन् घालावें. त्यांचें जेव्हां चांगलें मिश्रण होईल तेव्हां पातळ थर पायावर चोळावा. वर सांगितल्याप्रमाणें पायावर तागाचें कापड आच्छादावें. ह्मणजे तें वेष्टण ब्यान्डेज प्रमाणें उपयोगी पडतें. व आर्निका हें घोड्याच्या शिरांस मजबुती आणितें. हा चांगला उपाय आहे.

उष्णता आणणारीं औषधें.

कार्डियल्स (उष्णता आणणारें). हें औषध तूर्तातूर्त अंगांत उष्णता आणणारें आहे. अजारीपणांत शक्ति व उत्साह कमी असल्यामुळें किंवा फार काम केल्यानें अंगांत शक्ति व उत्साह कमी होतो, तेव्हां याचा उपयोग केला असतां फायदा होतो. हें औषध गरमी आणणारें असून घोड्यास व कुत्र्यास उपयोगीं पडतें. परंतु ह्याचा डोस घोड्याच्या व कुत्र्याच्या शक्तीप्रमाणें द्यावा.

१. कार्डीयल बाल्स.—पावडर्ड क्याराॅवे सीडस् सहा ड्राम, जिंजर दोन ड्राम, आइल आफ क्लव्ह्ज (लवंगांचें तेल) वीस थेंब, आणि सर्वांचा गोळा होण्यापुर्ती काकवी घ्यावी.

२. पावडर्ड अनिसीड (बडिशेपेची पूड) सहा ड्राम, क्यार्डामोम (एलची) दोन ड्राम, पावडर्ड क्याशिया (बहावा) एक ड्राम आणि आइल आफ क्याराॅव वीस थेंब. यांत गोळा होण्यापुर्ती काकवी घालून गोळा करावा.

३. कार्डियलड्रेंच.—एक शेर एल नांवाची उष्ण दारू व त्यामानानें अलें घालून धोंत्यानें पाजावें.

४. कार्डीयल अन्ड एक्सपेक्टोरन्टः—पावडर्ड अनिसीड अर्धा औंस, पावडर्ड स्किल एकड्राम, पावडर्ड मिर्‍ह दीड ड्राम, आणि ब्यालसम आफ पेरू गोळा होण्यापुर्ते घालून गोळा करावा.

५. लिकरिस पावडर अर्धा औंस, गम अमोनिआकम् तीन ड्राम. बाल्सम ऑफ टोलु दीड ड्राम आणि पावडर्ड स्किल एक ड्राम. लिन्सीड मील, व बायलिंगवाटर (ऊनपाणी) गोळा करण्यापुर्ते घालून गोळा करावा.

डेम्यूलसेन्टस् (नरमाई आणणारी दवा).

डेम्यूलसेन्ट हें औषध पोटांतील रोग, मूत्राशयरोग, आणि म-

ल्लाशय रोग ह्या ठिकाणीं नरमाई आणण्याचे उपयोगी आहे.

१. डेम्यूलसेन्ट ड्रेंच:—अरेबिक गम अर्धा औंस व पाणी एक शेर, हें सर्व मिळवून द्यावें.

२. लिनसिड चार औंस व पाणी एक शेर, घट्ट होईपर्यंत साखरेचा पाक घालून वरच्या प्रमाणें द्यावें.

३. मार्शमाल्लो ड्रेंच.—मार्शमाल्लो दोन मुठी व पाणी एक शेर; वरच्या प्रमाणें साखरेचा पाक घट्ट होईपर्यंत घालून द्यावें.

डायफोरेटिक (घाम आणणारें).

हें घाम आणणारें औषध होय.

१. त्वचेला घाम आणण्याकरितां—इमेटिक टारटर दीड ड्राम, क्यांफर अर्धा ड्राम, जिंजर दोन ड्राम, ओपियम अर्धा ड्राम, आणि आइल ऑफ क्यारावे (ओंव्याचा अर्क) पंधरा थेंब. लिनसिडमील आणि ऊनपाणी, हें गोळा होण्या पुर्ते घालावें; हा आठ दिवसांत दोन वेळ किंवा तीन वेळ द्यावा.

२. घाम आणणारें परंतु साधारण.—अन्टीनियल पावडर (सुरमा) दोन ड्राम, जिंजर एक ड्राम, पावडर क्यारावे सहा ड्राम व आइल आफ अनसिड (शोपाचें तेल) वीस थेंब वरच्याप्रमाणें मिश्रण करून द्यावें.

ह्या औषधाचा गुण आणण्याकरितां घोड्यावर झूल घालून फिरवावा ह्मणजे घाम येईल. नंतर तो घाम पुसून काढावा.

डायजेस्टिव्ह (पिकवण्याचें औषध).

जखमेंतील व चट्टे पडले असतील तर त्यांतील पूं काढण्याचें औषध.

पूं काढणारें मलमः रेड प्रेसिपिटेट दोन औंस, व्हेनिस टरपेन्टाइन, तीन औंस, बीज्‌व्याक्स (मेण) एक औंस व हाग्स लार्ड (डुकराची चर्बी)

चार औंस. पैकीं शेवटलीं तीन औषधें मंदाग्नीवर कढवून थंड झाल्या-वर त्यांत वरील पावडर (पूड) मिळवावी.

ड्यूरेटिक (मूत्रव्याधीवर)

ड्यूरेटिक ह्मणजे, पृथःकरणें, व शुद्धीकरण होऊन लघवी साफ होण्याचें औषध.

१. घोड्याचे अंगीं उष्णता ठेवून मूत्र साफ होण्यास उपायः पावडर रेसिन, साल मूनेल व क्यास्टिक सोप, प्रत्येक तीनड्राम, आणि आइल आफ ज्यूनिपर एक ड्राम मिश्रण करावें.

२. सौम्य मूत्ररेचक औषधः—पावर्ड नाइटर अर्धा औंसपासून एक औंसपर्यंत, क्यांफर आणि आइल ऑफ ज्यूनिपर प्रत्येक एक ड्राम व सोप तीन ड्राम; लिनसिड मिल मिश्रणापुरतें घालून गोळा करावा.

३. नायटर आणि रोसीन हीं प्रत्येक अर्धाऔंसपासून पाऊण औंसपर्यंत घेऊन मिश्रण करून द्यावें.

४. दुसऱ्या प्रकारापेक्षां कांहीं तीक्ष्ण.—नायटर आणि क्यांफर, पैकीं नायटर सहा ड्राम व क्यांफर दीड ड्राम मिश्रण करून द्यावें.

इंब्रोकेशन (तेलानें मर्दन करणें व घुणें).

हें औषध दर्दाचे आंत उष्णता ठेवतें. बाहेरून हातानें चोळलें असतां दर्दाची सूज व त्याच्या वेदना होत असल्यास अभ्यंतरीं गर्मी राहून वेदना कमी होतात.

१. मोहरीनें मर्दन करण्याचा प्रकार.—बेस्ट फ्लोअर ऑफ मस्टर्ड (उत्तम मोहरीचें पिट) सहा औंस, लिकर आफ अमोनिया दीड औंस व आईल ऑफ टरपेन्टाइन (टरपेन तेल) दीड औंस या सर्वांचें घट्ट मिश्रण होण्यापुरतें पाणी घालून खळीसारखें झाल्यावर चिकटवावें.

२. चेतनावर्धक.—क्यांफर अर्धा औंस, आईल ऑफ टरपेन्टाइन आणि द्राक्षाची दारू प्रत्येक एकेक औंस मिश्रण करावें.

३. मागील पायाचे दर्दावर मध्यम मर्दन.—स्ट्रांगमरक्युरिअल आईन्टमेंन्ट दोन औंस, क्यांफर अर्धा औंस, आइल ऑफ रोजमरि दोन ड्राम आणि आईल ऑफ टरपेनटाइन एक औंस मिश्रणक-रून लावावें.

४. दुसरा प्रकार वरच्यापेक्षां उत्तमः स्ट्रांग मरक्यूरियल आईन्ट मेन्ट दोन औंस, आईल ऑफ बे एक औंस, आइल ऑफ आर्ग्यानम् अर्धा औंस,व पावडर क्यांथारिडस् अर्धा औंस,मिश्रण करून लावावें.

५. सौम्य परंतु तल्ख मर्दन.—रेड आयोडाइड ऑफ मर्क्यूर अर्धा औंसपासून एक औंसपर्यंत, पावडर्ड अर्निका ठिव्हज एक ड्राम. सोप लिनिमेन्ट दोन औंस, मिश्रणकरून लावावें.

इम्यूलशन (नरमाईस औषध.)

फार दिवसांचे खोकल्यास हें औषध फार उपयोगी आहे.

१ साधी नरमाई.—लिनसिड आइल दोन औंस, हनी (मध) तीन औंस, स्वच्छ पाणी अच्छेर आणि सबक्यारबोनेट आफ पोट्याश एक ड्राम. मध व पोट्यास पाण्यांत एकत्र करून नंतर लिनसिड तेल थोडें थोडें घालीत जाऊन खलबत्त्यांत खलीत जावें. फेंस येईपर्यंत तयार करून सकाळीं व संध्याकाळीं द्यावें.

२ दुसरा साधा परंतु तीव्र उपाय.—सिंपल इम्यूलशन एक पासून आठ औंस, क्यांफर एक ड्राम, ओपियम पावडर अर्धा ड्राम व आइल आफ अनसिडचे तीस थेंब. परंतु शेवटचीं तीन औषधें एकत्र करून खलबत्यांत घालून घोटावीं. घोटतानां त्यांत थोडी पांढरी साखर घालावी. नंतर इम्यूलशन (नरमाईचा पदार्थ) थोडें थोडें घालीत जावें.

एक्सपेक्टरन्टस् (कफ पडण्यास).

फुफ्फुसांत अभ्यंतरीं जी सूज असते त्यापासून कफ निर्माण झाला असतो, तो बाहेर पाडून सूज उतरण्यास उपायः—

१ सूज नसतांना साधारण खोकला आहे तर.—गम अमोनिया-कम अर्ध औंस, पावडर्ड स्किल एक ड्राम, क्यास्टिल सोप दोन ड्राम व मध सर्व औषधांचा गोळा होण्यापुरता घालावा.

२ फार दिवसांचा जुना खोकला.—असाफोटिडा (हिंग) तीन ड्राम, गलबानम एक ड्राम, क्यारबोनेट आफ अमोनिया अर्ध ड्राम व जिंजर दीड ड्राम. आणि या सर्वांचें मिश्रण होण्यापुरता मध घालावा.

३ कफ पडण्यास उत्तम औषध.—इमेटिक टारटर अर्ध ड्राम, क्यालोमेल पंधरा ग्रेन, डिजिटालिस (रानहरभरा) अर्धा ड्राम, पावडर स्किल अर्ध ड्राम आणि लिनसिड व पाणी सर्व औषधांचा गोळा होण्यापुर्तें घालून गोळ्या कराव्या.

फिबरीफ्यूग्ज (ज्वरनाशक.)

हीं औषधें ताप निवण्यास, लघवी साफ होण्यास आणि खर न पडण्यास उपयोगी आहेत.

१ तापावर.—नाइटर चार ड्राम. क्यांफर एक ड्राम, क्यालोमेल आणि ओपियम प्रत्येक एकेक स्क्रूपल; लिनसिडमीळ आणि पाणी सर्व औषधांचा गोळा होण्यापुरतें घालावें.

२ दुसरा प्रकार.—इमेटिक टारटर दीड पासून दोन ड्राम, कंपाउन्ड पावडर आफ ट्र्यागॅकॅन्थ दोन ड्राम. लिनसिड मीळ वरच्या प्रमाणें घालून गोळा करावा.

३ तिसरा प्रकार.—नाइटर एक औंस कोंडा किंवा भुस्सा ह्यांत द्यावें.

४ धोव्यानें पाजण्याचा प्रकार.—नायटर एक औंस, स्वीट स्पिरिट्स

ऑफ नायटर दोन औंस, टिंचर ऑफ डिजिटेलीस दोन ड्राम. आणि दह्याची निवळ (व्ही–ताक) अर्धे शेर एकत्र करून घोटयानें पाजावें.

क्लिस्टर (पिचकारी).

पिचकारी मारण्याचें कारण इतकेंच कीं, पोटांत तिडीक येणें किंवा त्या संबंधीं आंतड्यांत हरकत आली असल्यास ती दूर होण्याकरितां पिचकारी ऊन पाण्यानें किंवा औषधी काढ्यानें मारावी. पोटदुखीचा वगैरे अजार असल्यास त्यावर ही प्रशस्त आहे.

१. हगवणीवर पिचकारी.—धुण्याकारितां केलेली पेज किंवा कल्क एक शेर, व पावडर ओपियम दोन ड्राम: पैकीं ओपियमपाण्यांत शिजवून नंतर पेज किंवा कल्क त्यांत मिश्रण करावा.

लोशन (भाजणें).

लोशन करण्याचा जो पदार्थ तो पातळ असून त्याचा उपयोग बाहेरच्या भुजेवर करितात. ह्याचा उपयोग केल्यानें उष्णता कमी होते व शिरा बंदावर राहतात.

१. व्रशानें लावण्याचें सौम्य औषध.–टिंचर ऑफ अर्निका एक ड्राम, व स्पिरिट ऑफ वाइन सात ड्राम या सर्वांचें मिश्रण करून ती जागा हातानें चोळून नंतर तें औषध लावावें.

२. दर्दाचे आंतील फिडांवर.—नायट्रेट ऑफ सिल्व्हर १० ग्रेन व शुद्ध पाणी (डिस्टिल्डवाटर) एक औंस, मिश्रण करून रोज रात्रीं त्याचा टिपका त्याच जागेवर द्यावा.

३. बाहेरच्या बाजूस सौम्य औषध.—गोलार्ड एक्स्ट्र्याक्ट एक औंस, व्हेनिगर दोन औंस, स्पिरिट ऑफ वाइन किंवा जिंजर तीन औंस व पाणी दीडशेर मिश्रण करून क्यालिकोब्यान्डेज बरोबर त्या ठिकाणीं लावावें.

४. पाय, किंवा घांसटलेला खांदा किंवा पाठ, यांवर.—साल आमोनिआक एक औंस, व्हिनिगार चार औंस, स्पिरिट ऑफ वाईन दोन औंस, टिंकचर ऑफ अर्निका दोन ड्राम व पाणी अर्धशेर मिश्रण करून लावावें.

५. व्रण किंवा भगेंद्र.—सल्फेट ऑफ कापर एक औंस, नायट्रिक आसिड अर्धा औंस व पाणी आठपासून बारा औंसपर्यंत मिश्रण करून त्याचें लेपन करावें.

हें तेलकट औषध आहे. यांत तेजस्वी औषध असून चर्बीचें मिश्रण आहे. ज्या ठिकाणीं क्षत वगैरे असेल त्याठिकाणीं किंवा ज्या ज्या दर्दीवर जें जें मलम चालतें त्या त्या ठिकाणीं त्याचें वर्णन केलें आहे त्याप्रमाणें लावावें.

सिम्यूलेन्ट (गर्मी आणणारें).

हें औषध शिरांची व धमनीची क्रिया चालू करतें. व मस्तकांतील मेंदु आणि काळीज यांचीही क्रिया या औषधापासून चालू होते.

१. ओल्ड एल (जुनी एल नांवाची दारू) एक शेर, क्यारबोनेट ऑफ अमोनिया अर्धाड्रामपासून दोनड्राम पर्यंत व टिंकचर ऑफ जिंजर चार ड्राम मिश्रण करून घोटयानें पाजावें.

मलम किंवा लेपन यावरचीं आणिक औषधें 'कार्डियल' (गरमी आणणारीं औषधें) या सदरांत सांगितलीं आहेत.

स्टमक (क्षुब्दोधक).

अपथ्यानें किंवा आजारीपणानें पोटांत मंदाग्नि होतो तो चेतवण्यास हें औषध आहे.

पोटांत देण्याचे गोळे.—पावडर जन्टेनाटियन अर्धा औंस, पावडर जिंजर दीड ड्राम, क्यारबोनेट ऑफ सोडा एक ड्राम आणि ट्रिकल

(काकवी) या सर्व पदार्थांचा गोळा होईपर्यंत घालून गोळा करावा.

२. दुसरा प्रकार.—क्यासक्यारिला पावडर एक औंस, मिन्ह' दीड ड्राम, क्यास्टिलसोप एक ड्राम आणि गोळा होण्यापुर्ता साखरेचा पाक किंवा काकवी घालून गोळा करावा.

३. पावडर कोलोंबो अर्धापासून एक ड्रामपर्यंत, पावडर क्यासिया एक ड्राम आणि पावडर व्हुबार्ब दोन ड्राम यांचें दुसऱ्या नंबरांत सांगितल्याप्रमाणें मिश्रण करावें.

स्टायपिक्स (रक्त बंद करणें).

हा उपाय शरीराचे बाहेरून किंवा आंतून रक्त वाहूं लागलें असतां तें बंद करण्याचा आहे. पोटांत औषधें घेऊन किंवा बाहेर डाग देऊन रक्त बंद करावें. कषायांचे सदरांत औषधांचा प्रकार लिहिला आहे तो पान ८९ यावर पहा.

वर्म मेडिसन (क्रिमींवर औषध).

क्रिमी घालविणारे औषधाचे योगानें, क्रिमी मळद्वारावाटे बाहेर पडतात किंवा पोटांतच नाहींसे होतात.

१. क्यालोमेल एक ड्रामपासून दोन ड्राम, बारबेडोज अलोज तीन पासून सहा ड्राम, जिंजर एक ड्राम, व सोप तीन ड्राम मिश्रण करून द्यावें. दुसरें औषध, एक पिंट जवसांचें तेल क्रिमी दूर होईपर्यंत दररोज द्यावें.

टॉनिक (पाचक व पौष्टिक).

हें औषध दिल्यानें कांहीं दिवस शरीरांत गर्मी राहते. थोडा ताप कमी झाला ह्मणजे या औषधाचा उपयोग करावा. हें औषध शक्तिवर्धक आहे.

टानिकबाल.—पावडर यलो बार्क एक औंस, जिंजर दोन ड्राम, क्यारबोनेट ऑफ सोडा अर्धा ड्राम व गोळा होण्या पुरतें लिन्सिडमील आणि पाणी घालून गोळा करावा.

२. सल्फेट ऑफ आयर्न आर्धा औंस आणि एक्स्ट्राक्ट ऑफ् क्यामोमाइल एक औंस हीं मिश्रण करून गोळा करावा.

३. अऱ्यासिनीक दहा ग्रेन, जिंजर एक ड्राम, पावडर अन्सिड एक औंस, कंपाउन्ड पावडर ऑफ ट्रगाकॅन्थ दोन ड्राम आणि सायरप (साखरेचा पाक) गोळा होण्यापुरता घालून त्या सर्वांचें मिश्रण करून गोळा करावा. हें औषध फार शक्तिवर्धक आहे.

मेंदूसंबंधी रोग.

फ्रिनिटीस,(मेंदूस सूज येते ती)—इंग्रजींत याला बरींच नांवें आहेतः **स्टयागर्स, आपोप्लेक्सी, म्याड** व **स्लीपी** वगैरे. हा रोग होण्याचें कारण वाईट धान्य व वाईट गवत खाण्यापासून अजीर्ण होतें आणि तेणें करून मेंदूस सूज येते.

लक्षण—प्रथम सुस्ती येते, डोळे सुजून पाणी निघतें, नाडीचे ठोके जलद चालतात, पोटांत अवरोध होतो, लघवी कमी होते, व पुढें बेशुद्ध व वेड्यासारखा होतो; असें झालें ह्मणजे मेंदूची इजा झाली असें समजावें.

पक्काशयांत झालेले विकृतीमुळें डोळे व तोंड पिंवळें होतें; छातीच्या शिरा टणक होतात; घोडा फार अशक्त होतो; पुढील पाय कांपतात, ते इतके कीं, उभें राहण्यासही त्याला ताकद नसते; आणि बेशुद्ध होऊन तो पुढें वांचत नाहीं, त्याबद्दल निरनिराळे उपाय आहेत.

इलाज—मेंदु सुजला असतां रक्त फार काढलें पाहिजे, जुलाब दिला पाहिजे व टरपेनटाईनची पिचकारी द्यावी. त्यापासून गुण येतो, डोक्यावर ब्लिस्टर मारावें, पोटांत एक औंस नाईटराचा डोस

द्यावा, व टार्टर इमिटिक, डिटेलीस प्रत्येक ड्राम याचा डोस द्यावा, पक्काशयांत झालेले विकृतीस लौकर उपाय झाला तर थोडा बरा होईल. पोट फुगत असलें तर रक्त काढण्यापेक्षां पोटांत औषध द्यावें हें चांगलें; कारण दोन्हींचे भेद कळत नाहींत. टिंकचर आफ जिंजर कान्पौंड स्पिरिट आफ अमोनिया, टिंकचर आफ लवेंडर व सल्फर हे प्रत्येक एक द्राम आणि क्यांफर मिक्स्चर व येलदारू चारचार औंस मिळवून घोड्यास द्यावें.

दुसरा इलाज—बारबेडोज एलोज तीन ड्राम, टिंकचर आफ क्याप्सिकम दोन ड्राम, जिंजर चार औंस आणि पाणी चार औंस मिळवून डोस द्यावा व स्टिम्युलेटिंग पिचकारी मारावी. पिचकारी मारण्याची कृति पूर्वींच सांगितली आहे त्याप्रमाणें मारावी, ह्मणजे पोटांतील विकृति दूर होईल. नंतर जुलाब द्यावा आणि खाणें कमी करावें. सदरीं लिहिलेले उपचार एकदम करूं नयेतः—एक दवा दिल्यावर चारसहा तासांत फरक न दिसेल तर दुसरा उपाय करावा.

अक्सिस ऑफ थि ब्रेन.

हा रोग डोक्यावर कांहीं दुखापत झाल्यानें होतो. त्या योगानें आंतील मेंदूस क्षत पडतें.

लक्षण.—सुस्तता येते, दाणा वैरण खात नाहीं व डोक्यावरील बाहेरच्या दुखापतीचा स्राव होतो तेणेंकरून तो मरेपर्यंत आपलें डोकें जमिनीवर आपटतो.

इलाज.—या रोगावर इलाज चालत नाहीं असा हा एक असाध्य रोग आहे !

स्लीपी.

हा रोग मस्तकांत मेंदूंतील रक्त फार मंद वहात असल्यानें

होतो, किंवा रक्त नासल्यानें होतो. यास कैंजंकुशन आफ् ब्रेन ह्मणतात.

लक्षण.—झोंप आल्यासारखें करतो, कान व शेंपूट ताठतें, डोकें टांगल्याप्रमाणें होतें, डोळे मिटतो, श्वास कष्टानें टाकतो, नाडी मंद वाहते, त्वचा गार होते, नाकपुड्यांचे पडदे फिकट होतात व तोंडास चिकटा असतो.

इलाज.—कोणतेही तेळाचा साधारण एक डोस द्यावा, ह्मणजे एक पिंट (आच्छेर) तेल पाजावें. आळोज तेळ देण्यास सर्वांत उत्तम आहे. सहा तासांत कांहीं फरक न वाटल्यास दुसरा डोस त्या तेळाचा करून क्रोटन तेळाचे वीस थेंब घालून द्यावें. ह्यापासून फरक नाहीं झाला तर सहा तासांनीं क्रोटनचे तीस थेंब घालून द्यावें. या रोगापासून म्याडस्ट्यागर रोग होतो आणि त्या रोगाप्रमाणें त्याचीं चिन्हें होतात तेव्हां म्याडस्ट्यागर याजवर सांगितलेलें औषध द्यावें.

म्याडस्ट्यागर (ह्मणजे उन्माद).

हा रोग मेंदूस सूज आल्यानें होतो.

लक्षण—घोडा भानरहित असतो, भित्रेपणा राहत नाहीं, कितीही प्राणांतिक अवस्था झाली तरी सोसतो, बेशुद्ध (बेफाम) होतो—ज्युगलर्व्हेन (मानेच्या शिरा) ताठतात आणि लीद, व लघवी थोडी होते.

इलाज—मानेच्या शिरांचें रक्त तो अगदीं मलूल होईपर्यंत काढावें. नंतर ती जखम तत्काळ शिवून टाकावी. प्रमाणापेक्षां दुपटीच्या मानानें जुलाब द्यावा. तीन तासांत जुलाब न झाल्यास पुन्हां जुलाब द्यावा, किंवा फिरून रक्त काढावेसें वाटल्यास काढावें. तंबाखू एक स्क्रूपल, अर्धे ड्राम अंकोनाइडच्या मुळ्याचा रस किंवा डिगीटॅलिस एक ड्राम, इतक्यांचा काढा करून निवळून गाळून

त्याचा डोस द्यावा. यांपैकीं जें औषध लौकर होईल तें द्यावें. कांहींच न मिळाल्यास फार कढत पाणी एक बाटलीभर द्यावें, आणि ह्यापासून जर तो शांतसा वाटेल तर चांगला शांत होईपर्यंत प्रत्येक अर्ध तासानें फार कढत पाणी सदहूप्रमाणें द्यावें. जुलाब न होईल तर जुलाबाचे औषधाची पिचकारी मारावी व मस्तकावर प्ल्यास्तर मारावें.

फ्रिनिटिस याजवर (मेंदूस सूज येऊन जो रोग होतो त्यावर) जो उपाय सांगितला आहे तो यावरही लागू आहे.

मिग्रिम (मिर्गी.)

हा रोग मेंदु थोडा गोंठला ह्मणजे अति उष्णतेपासून उन्हाळ्यांत होतो अथवा मानेच्या शिरांस गळेबंदाचा दाब लागून अथवा लगाम फार तंग धरल्यानें एकाएकीं घोडा थांबेजतो आणि डोकें हालवितो; त्यावेळेस लगामास त्रास देतो असें वाटतें. इतक्यांत घोडा फिरतो किंवा पडतो, पांच मिनिटांनीं पुन्हां उठतो आणि चालू लागला तर घाम येतो. या रोगानें घोडा क्वचित् मरतो. विकृति होतांच लागलेंच रक्त काढलें पाहिजे, जुलाब देऊन कांहीं दिवस विश्रांति द्यावी आणि त्याजकडून मेहनत फार घेऊं नये.

हैड्रोफोबिया (जलद्वेषरोग).

पिसाळलेलीं कुत्रीं, कोल्हीं, किंवा मांजरें घोड्यास चावलीं असतां मस्तकांतील मेंदूस विकार होतो आणि मग घोडीं वेडीं होतात. त्यांच्या क्षुधेंत फरक पडतो, त्यांस तहान फार लागते, जवळ कोणी आल्यास चावण्यास धावतात आणि कोणी त्यांच्या आटोक्यांत आला ह्मणजे त्याचे तुकडे तुकडे करितात. तींच कुत्रीं, मांजरें, किंवा

कोल्हीं, हीं पुष्कळांना चावून जर घोड्यांस चावलीं असतील तर त्यांचें विष कमी चढतें, व ज्या ठिकाणीं चावतें त्या ठिकाणीं नेहमीं स्राव होत असतो.

इलाज—यावर कांहीं उपचार चालत नाहीं. घोडा कोंडून ठेवावा. त्याजवळ कोणी जाऊं नये. अशा वेळीं घोड्यास गोळी घालून मारून टाकावें हें चांगलें. पिसाळलेलीं कुत्रीं चावल्यापासून लवकर ह्मणजे निदान पंधरा दिवसांनीं विषाचा अम्मल चढतो.

केव्हां केव्हां तर सहा महिने किंवा बारा महिनेपर्यंत केव्हां अम्मल चढेल याचा नेम नसतो!

पिसाळलेलीं कुत्रीं चावलीं तर त्यावर उपाय.

कारळें, कडू वृंदावन, गजनाकोई, कुटकी, पाषाणभेद, नावशेराचा गोंद, कांदा व मिरची हीं एक सारखीं बरोबर घेऊन त्यांमध्यें गुलाबपाणी ४ चार टांक घालून तें घोड्यास पाजावें.

दुसरें—बोळ, गोंदवारखी, गोंदतरसीत, तूत व डाळिंबाचीं मुळें हीं सर्व कुटून तें मिश्रण शिरक्यांत पाजावें, व चावलेल्या ठिकाणीं लावावें.

पिसाळलेलीं कुत्रीं किंवा मांजरें चावलीं तर सदरप्रमाणें भावना होते.

चांदणी.

लक्षण.—चांदणी झाली ह्मणजे घोड्याची मान आंखडते, मान वर करीत नाहीं, डोळे फिरवतो, वरच पहातो आणि घांस खात नाहीं. पाठीवर जखम होऊन किंवा अंगाची कातडी निवून अगर हवेनें चांदणी होते. त्याचप्रमाणें मानेवर फोड झाल्यानेंही हा रोग होतो या चांदणीच्या संबंधानें सुंभावरही फोड होतात. शिवाय ना-

लबंदी नीट झाली नाहीं तर हे चांदणीचे फोड येतात व तेणेंकरून घोडा दुबळा होऊन त्यास ताप येतो.

उपचार.—ताप आल्यावर अगोदर अंगावर कांबळी घालावी. खाण्यास गवत द्यावें. हबूल बकर (तान्ह्या वासराचें शेण) व हळद तीन दिवस द्यावी. तेणेंकरून मानेचा ताठा जाईल. तिळाचें तेल, एरंडाचीं पानें व गाईचें शेण गरम करून, गेरू, सुंठ, हळद, अंबर, आंबेहळद, पिंपळी आणि तीळ तीन टांक घेऊन बारिक करून, गोड दारूंत मिळवून तें मिश्रण पाजावें. दारू न मिळेल तर तें मिश्रण एकशेर साखरेंत द्यावें.

चांदणीचे चार प्रकार आहेतः—पहिला प्रकार **कैसर चांदणी**, दुसरा प्रकार धनुर्वायु, तिसरा प्रकार **गत** आणि चौथा प्रकार **हिरण्वायु**.

हा रोग घोड्याचे पुढील अंगानें व मागील अंगानें होतो आणि कित्येक घोड्यांस शेपटी जवळ होतो.

चांदणीचीं आणखी लक्षणें.—दोन कान उभे राहतात, लगाम दिल्यावर पाय आंखडून घेतो, दम टाकतो, दाढा बंद होतात आणि दांतखिळी बसते.

दुसऱ्या प्रकारचीं लक्षणें.—जमिनीवर पडतो. दाणा खात नाहीं. अशा लक्षणांवर जो दवा द्यावयाचा तो साखरेंत दिल्यानें अवगुण होईल. यास्तव तिळाचे तेलांत व पाण्यांत दवा द्यावा. थंडकाळांत साखरेंत द्यावा. व पावसाळ्यांत पाण्यांत द्यावा.

दवा.—काळे दाणे, कलोंजी, संभाळूचीं (निरगुडीचीं पानें, बोळ, पिंपळमूळ, कोहळा, पिंपळी व केळीं, हीं एरंडाचे तेलांत द्यावीं. समुद्रफळ बारिक करून घोड्याचे डोळ्यांत घालावें ह्मणजे अंजन करावें. डुकराचें रक्त पिंपळीं बरोबर द्यावें आणि दिवसांनंतर रक्त काढावें. ह्मणजे शिरा नरम होतील. वीस रोज झाल्यावर छातीचें रक्त काढावें.

पांढरे जिरे, धने, गुळवेल, काळा बोळ. अवळकंटी, जायपत्री, ज्येष्ठमध,

आणि पळसाचें फूल हीं बारिक करून द्यावीं. हीं सर्व औषधें जर न मिळतील तर अवळकंठी, बोरीच्या बियांचा मगज आणि जायपत्री द्यावी. याशिवाय आणखी उपाय आहेत ते:—

१. चांदणी होईल तेव्हां बकरी कापून तिचें रक्त कच्चें सात शेर द्यावें.

२. घोड्यास जमीनीवर पाडावें, पुढील पायांचे सुंभे छेदावे व त्यांतून ह्मणजे सुंभांच्या शिरांतून रक्त काढावें. रक्त काढल्यावर त्या सुंभांचे शिरांच्या रगावर डाग द्यावा आणि त्याजवर औषध लावावें.

दवा.—हरताळ तीन टांक, निलातोता (जंगला) तीन टांक, राळ तीन टांक व मनशीळ तीन टांक हीं सर्व एकत्र करून बारीक करावीं आणि ती पूड सुंभावर चोळून कपड्यानें सुंभ बांधावें. याप्रमाणें सात दिवस करावें.

१. घोडा चांदणी झाल्यावर शेंपूट फार हालवीत असतो. सर्व शरीर आंखडतें. असें हवेचे योगानें होतें. पहिल्यानें पुढील भाग व मागाहून मागील भाग आंखडतो.

उपचार.—औरतेचे (बायकांचे) विटाळाचा कपडा घेऊन तो जाळावा व एक बिरघुटी, व एक काळा दाणा (कलोंज), मिरे, व थोडें अळें हीं सर्व लिंबाचे रसांत खलावीं व त्यांचें अंजन घोड्याचे डोळ्यांत तीन वेळ घालावें.

१. चांदणी झाल्यावर चांगला निर्मळ मध एक पैसाभार ऊन करावा व शेपटीसुद्धां पाल घेऊन मारून त्या मधांत मिळवून घोड्यास चारावी. तीन दिवसपर्यंत.रोज एक याप्रमाणें पाल खाऊं घालावी. पालीची नखें मात्र काढून नंतर पाल चारावी.

२. चांदणी झाल्यावर चोपड करावें तें:—तांब्याचे परातींत मीठ बारीक करावें व तें मीठ बकराचे रक्तांत मिळवावें. आणि तें गरम करून सर्व अंगास चोपडावें. तें इतकें चोळावें कीं, एक केस-

मुद्दां चोपडल्याशिवाय राहूं देऊं नये. याशिवाय घोड्याला मसाला द्यावा तोः—लवंग अर्ध तोळा, बिरघुटी चार पांच दाणे, कायफळ एक तोळा, पिंपळी एक तोळा, पिंपळमूळ एक तोळा, कुटकी एक तोळा, काळीं मिरें एक तोळा, सुंठ एक तोळा आणि भाजलेली सोहागी सहा मासे हीं सर्व बारीक करून तें मिश्रण अद्पाव मधांत मिळवून एकदमच द्यावें. त्याचप्रमाणें एक वेळ घोड्याचे कानांत एक तोळा पारा घालावा. त्यावर कापूस लावावा. एक कावळा मारून त्याचे दोन तुकडे करावे, आणि घोड्याचे दोन्ही डोळ्यांवर तीन दिवस बांधून ठेवावे. कावळा न मिळेल तर काळी कोंबडी कांपून डोळ्यांवर बांधावी, व घोड्यास अंधारांत बांधावें. सदर्हू गोष्टीनें बरें न झालें तर बत्तिसा डाग द्यावा. याशिवाय त्याचे डोळ्यांत घालण्याकरितां अंजन करावें तेंः—काळीं मिरें एक व लवंग एक कावळ्याचे किंवा कोंबडीचे रक्तांत घांसून अंजन करावें.

दुसरें अंजन—मोठा जंगली सरडा घेऊन त्याचा गळा कांपून रक्त काढावें व त्यांत काळीं मिरें उगाळून अंजन करावें. याप्रमाणें तीन दिवस करावें. बाकी राहिलेला सरडा बारीक करून तो त्या घोड्याला तीन दिवसपर्यंत खाण्यास द्यावा.

१. चांदणी झाली असतां सर्व शरीर आंखडतें, शरीर गार पडतें, खाण्याची इच्छा नसतें, मूत्र बंद होतें, आणि घोडा वाळत जातो. अशा लक्षणांवर उपायः—

उपाय—तेल लावून मालिस करावें. गरम पाणी घेऊन तें थंड करावें. त्या पाण्यांत एक शेर तिळाचें तेल व चार शेर जवखार घालून तें पाणी घोड्याचे अंगास चोळावें. नंतर खावयास देण्याचे जिन्नस तेः—हिंग, जवखार, पिंपळीं व सुंठ हीं दरएक चारचार टांक घेऊन बारीक वस्त्रगाळ करावीं. आणि ती पूड एक शेर गोड दारूंत घालून सकाळीं घोड्यास चारावी.

दुसरा प्रकारः—तिळाचें तेल चार शेर, गाईचें तूप नऊ टांक व बकऱ्याची चरबी चार शेर, हें सर्व कढवून घोड्याचे नाकांत दररोज चार शेर घालावें, आणि एक शेर चरबी घोड्याचे अंगास चोळावी. हुकना ह्मणजे, बारिक कांठी घेऊन त्यास चिंध्या लपेटून सदरचे द्रव्यांत ती भिजवून घोड्याचे गुदद्वारांत घालून काढावी.

खाण्यास देण्याचे जिन्नसः—दगडीं मीठ सहा टांक, नऊ टांक मिरच्या, चार शेर तेल व एक शेर बकरीचें रक्त हीं मिळवून घोड्यास चारावीं. शिरावर किंवा डोळ्यावर किंवा छातीवर अथवा दोन्ही पायांवर फोड आले तर ते फोड चिरावे, आणि बरे न होतील तर डाग द्यावे.

खाण्यास देणें तेंः—राई चार तोळे, गुग्गूळ चार तोळे, व लसूण चार तोळे, हीं सर्व बारिक करून दारूंत बायकांचे विटाळाचीं फडकीं धुऊन तें सकाळ संध्याकाळ याप्रमाणें सात दिवसपर्यंत घोड्यास खावयास द्यावें.

संख्या सोमल एक तोळा व शिंगरूफ एक तोळा हे दोन जिनस आल्याचे दोन शेर रसांत मिळवून पांच रोजपर्यंत हालवीत जावे. नंतर त्यांच्या हरभऱ्यायेवढ्या गोळ्या कराव्या. एक गोळी पाव शेर दारूंत द्यावी. हें अनुभवशीर आहे.

अर्धांगवायु.

१. मान वांकडी होते त्यास लखवा किंवा अर्धांगवायु ह्मणतात; त्यावर इलाजः—लहान शेवरीचें बीं बारिक करून त्याचा रस घोड्याचे नाकांत घालावा.

उपायः—पांढरे मोहरीचें तेल, लसूण तेल, जुने तेल, मीठ, जिरे, साखर व दैलम हीं एकत्र करून जखमेवर लावून ती नखम बकरीच्या कातड्यानें बांधून टाकावी.

२ रा. नाकांत गुलाबाचें व शेवतीचें तेल एकत्र करून घालावें. हीं तेलें न मिळतील तर सुरेखुर्ख दारूंत मिळवून तें नाकांत फुंकावें.

३ रा. गाईची चर्बी सर्वांगास लावावी. बतम तेल (बुंदांचें तेल) यास इंग्रजींत काफी ह्मणतात, हें दारूंत गरम करून सर्व अंगास मर्दावें.

४ था. बतम तेल दोन्ही नाकांत फुंकावें. जखम सुकली नाहीं तर दोन्हीं कानांचे मागें डाग द्यावे. गरम वस्तु खाण्यास द्याव्या.

५ वा. घोड्यास शेणांत (शेणखळींत) नाक, तोंड, अयाळ, शेंपूट, हें अवयव खेरीजकरून सर्व गाडावा आणि याप्रमाणें सात दिवस ठेवावें.

६. डुकराची चर्बी, सुरूचे झाडाचा गोंद, बतम झाडाचा गोंद, लसूण व मीठ हे सर्व पदार्थ बरोबर घेऊन बारिक करून तेलांत मिळवून सर्व अंगास मर्दावे.

७. मिरच्या, बुरेसमा व हिंग हे बरोबर घेऊन बारिक करून दारूंत मिळवून नाकांत घालावे.

८. मेथी व कलोंजी नऊ टांक बारिक कुटून तिळाचे पावशेर तेलांत मिळवून रात्रीं खाण्यास द्यावें. मानेच्या शिरांचे रक्त काढावें. बरें न आल्यास बत्तिसा डाग द्यावा.

९. भारंगी, इंद्रजव, कोहळा, असकंद, नागोरिअजवान, वावडिंग, बच (वेखंड), पिंपळमूळ, पिंपळी, सुंठ, चित्रक, दारू, हळद, देवदार, चोपडा, रसशेंदूर, आवळा, सारगंधक, सोनामुखी, काळाबोळ, अजमोदा, कलोंजी (काळे दाणे), काचकुइरीं, काकडशिंगी, शेवग्याची साल, निरगुडीचें बीं, ओंवा, काळे जिरे, रूमीमस्तकी, आहळीव, कबाबचिनी व भिलावे हीं सर्व बारिक करून तें चूर्ण समभाग घ्यावें व एरंडीचे तेलांत घालून तीन किंवा सात दिवसपर्यंत रोज पावशेर प्रमाणें द्यावें. दाणा उकडून द्यावा.

१०. हिर्डा, बेहडा, अवळकंठी, चुवानिकचरी, मिरे, पिंपळी, हिंग, कडूवृंदावन, वेखंड, पाषाणभेद, सोरमीठ, पिंपळमूळ, कोरफड, मुसबारबोळ, हळद, अलें, लसूण, लिंबें व मोहऱ्या. हे सर्व जिन्नस एकत्र करून कांडावे व दह्यांत कालवावे. परंतु त्यांत मीठ, लिंबें व अलें हे जिन्नस फार घालावे. हें औषध फार उपयोगी पडेल.

अर्धांगवायु—यास इंग्रजींत 'प्यारालिसिस' असें ह्मणतात. हा रोग, फार आयासयुक्त काम करण्यापासून किंवा मेंदूवर भार पडल्यापासून पाठीचे कण्यास दुखापत होऊन अथवा विशेष सर्द हवेपासून होत असतो.

लक्षणें—पाय कांपतात व जमिनीवर पडूं पाहतो; उभा राहूं शकत नाहीं; आणि कमरेंत व पायांत जीव नसतो.

उपचार—अर्धाग्रेन ट्रिकूनिया, ऐवोडाईड ऐरन एक ग्रेन, क्वासापौडर व काकवी गोळी होण्यापुरती, हीं मिश्र करून त्याच्या गोळ्या कराव्या. आणि सकाळीं एक व संध्याकाळीं एक याप्रमाणें गोळी द्यावी. उष्ण कपडे अंगावर घालावे, व घोड्याची चाकरी त्याचे अंगांत गरमी येईपर्यंत करावी.

झुला होतो त्यास उपाय.

घोडा वरून पडला किंवा पाय सरला किंवा हवेच्या योगानें, या तिन्ही कारणांमुळें अशा घोड्याची कंबर तुटते ह्मणजे लब खाते व मानेच्या शिरा तुटतात, व जमिनीवरून उठतां येत नाहीं. यास हिंदवींत 'कमरी' ह्मणतात. या रोगापासून घोडा फारकरून मरतो.

यावर उपाय—लांकडांनीं कमर व मान बांधावी. आणि त्या ठिकाणीं गाईचे तुपांत गुग्गुळ मिळवून अंगास चोळावा.

दुसरा उपाय—सोनिबहुल सुकवून बारिक करावी. बेलाचे झाडाची साल एक पावशेर साखरेंत द्यावी. घोड्याची कंबर बरी हो-

ईल. कोल्हा कांपून त्याचें कातडें काढावें. नंतर त्याचें मास व हाडें हीं ठेवून वाळवावीं. नंतर कुटून त्याचे सात भाग करून सा- खरेंत सात दिवस द्यावे. डुकराची चर्बी घेऊन ऊन करून थंड करावी व एक तास प्रमाणें दर्दावर दहा पंधरा दिवस चोळावी. परंतु लांक- डांनीं बांधलेलें कायम ठेवावें. व रोज कोंबडीच्या वीस अंड्यांतील पिवळा मगज व हालुंज यांचें बीज कुटून पिठासारखें करून पावशेर प्रमाणें त्यांत घालून चाळीस दिवस द्यावें. याचा अनुभव आहे.

भिलावे पावशेर, तेलीया सुवागी आतपाव, साबण पावशेर, सज्जी- खार आतपाव, अंबेहळद पावशेर, गेरू अर्धापाव, काळ्या मिरच्या आ- तपाव, हालूंज अतपाव, गुग्गूळ अतपाव, लवंग एक तोळा, अफू एक तोळा, सज्जीखार एक तोळा, फटकी आतपाव, रूईचे झाडाचीं पानें पिकलेलीं व किड्यानें न खाल्लेलीं एक तोळा घेऊन तीं सर्व कु- टून तीन गोळे करावे. सकाळीं व संध्याकाळीं दाण्याचे पूर्वी एक गोळी द्यावी. अनुभवशीर आहे.

अंबेहळद एक पैसाभार, मैदालकडी एक पैसाभार, कायफळ एक पैसाभार, तिळाचें तेल कढविलेलें चार पैसेभार व त्याचप्रमाणें एरंडीचें तेल व तूप चार पैसेभार हीं सर्व बारीक करून तुपांत तेल मिळवावें व तें कमरेवर चोपडीत जावें.

मुळाविषयीं २ रा प्रकार.—जंगली कबूतर आणून कांपावें. त्याचे पंख उपटून शिजवावें. तें इतकें कीं, मांस व हडूक निराळें होईल. त्यांत तूप अतपाव घालावें व गरम मसाला घालून शिजवावें. नंतर त्याचा अर्क नळीनें घोड्यास पाजावा. ह्याप्रमाणें तीन चार रोज किंवा एक आठवड्यापर्यंत दररोज एक कबूतर द्यावें.

१. हवेपासून मुळा होतो त्यास इलाजः—राळ तोळे २, गुग्गूळ तोळे२, पारा तोळा एक, आणि मध तोळा१.राळ बारीक करून नंतर गुग्गूळ घेऊन तो बारीक करावा; त्यानंतर पारा घालावा. पुढें मध

थोडा थोडा टाकावा, आणि सर्वांचा खल दोन घटकांपर्यंत करावा. हरभऱ्याएवढ्या सात गोळ्या कराव्या. बाजरीचे पिठांत रात्रीस दररोज एक गोळीप्रमाणें सात रोज द्याव्या.

मनुष्यास झुला किंवा बायकोची गरमी लागते, त्याजवर ह्याच औषधाची मुगाइतकी गोळी करून लोणी किंवा तुपांत द्यावी.

कोल्ह्याचें कातडें काढून त्याचे पोटांतील मैळा काढून टाकून मांस मात्र घ्यावें. उडीद एक शेर, आंबेहळद पावशेर व तूप एक शेर हीं तिन्हीं मासांत घालून शिजवावें; नतर हाडें काढून टाकावीं, व तें घोड्यास दररोज अर्धशेरप्रमाणें सात किंवा आठ दिवसपर्यंत देत जावें.

२. अस्कंद व नागोरी दोन दोन शेर, साखर दोन शेर, तूप अर्ध शेर, व गव्हांचा मैदा दोन शेर, हीं सर्व एके ठिकाणीं करून शिजवावीं. हें मिश्रण दररोज घोड्यास सकाळीं व संध्याकाळीं एक शेरप्रमाणें सहा दिवस द्यावें. व तें अर्धा शेर मधांत मिळवून द्यावें. अर्धा शेर मधांत वीस शेर पाणी एकत्र करून घोड्यास पिण्यास द्यावें. सहा दिवसपर्यंत देणें; परंतु ती मुदतपर्यंत दुसरे पाणी पिण्यास देऊं नये.

३. सज्जीखार दररोज तीन तोळे बारीक करून गाईचे तुपांत गोळी होईपर्यंत तूप घालून सात दिवस द्यावा. घोड्याचे कमरेवर सकाळीं ऊन पाणी घालावें. गरमीचे दिवस असल्यास एक वेळ घालावें व सर्दीचे दिवसांत दोन वेळ घालीत जावें.

झणक वायु.

स्प्रिंग हाल्ट—हा रोग बहुतकरून एकाच पायास होतो व एखादेवेळेस दोन्हीं पायास होतो. हा रोग वाढत जातो, व चालू लागल्यावर पायांत झणक किंवा शिणिक मारते.

शिरोरोग.

हा रोग झाला असतां मस्तक सुजतें, व घोडा मान खालीं घालतो, त्यास उपाय—बोराची साल, पळसाची साल, आंकोल्याची साल, व येरंडमूळ हीं सर्व पाण्यांत वाटून त्यांचा कल्क करावा. अगोदर घोड्याचें मस्तक तेलतुपानें मर्दावें. नंतर तो कल्क घेऊन त्याचा मस्तकावर लेप करावा, व विटेनें शेकावें. मग गूळ नऊ टांक, टाकळी ९ टांक, आणि वांवडिंग ९ टांक, हीं समभाग ४ दिवस देणें ह्मणजे बरें होईल.

शिरःशोष—टाळू शोषतें, ओंठ शोषतात, ह्मणजे वाळतात आणि उकलतात. त्यास उपचार—सुंठ, जिरे, मिरे पिंपळी, कोथिंबीर, हिरडा, बेहडा व आवळकठी, हीं प्रत्येकीं तीन टांक घेऊन त्याचें चूर्ण करून हें चूर्ण मधांत कालवून सात दिवस द्यावें. आणि दररोज अश्वगंध, वावडिंग, ओंवा व जिरे हीं प्रत्येक पांच टांक घेऊन पाण्यांत वाटून त्याचा लेप डोक्यावर करावा. असें एक सप्तक करावें.

नेत्ररोग.

सिंपल अप्थाल्मिया—हा रोग घोड्याच्या डोकीवर मारल्यानें किंवा केरकचरा वगैरे बारीक पदार्थ डोळ्यांत गेल्यानें किंवा घोड्याघोड्यांनीं मस्ती करून लाथा मारल्यापासून किंवा चावल्यापासून क्षत पडून होतो.

लक्षणें—हा रोग झाला असतां डोळ्यांतून नेहमीं पाणी गळतें. पापण्या मिटतात व बुबुळावर पांडुरकी येतें.

इलाज—डोळ्यांत कांहीं गेलें असल्यास तें काढण्याचा इलाज करावा व डोळ्यावर वस्त्र बांधावें. पण तें वस्त्र अफूच्या बोंडाचा काढा करून त्यांत टिंक्चर ऑफ आरनिका थोडीशी मिळवून डोळ्याच्या जागे पुरतें भिजवावें. जर डोळ्यावर थोडी सूज जास्त अ-

सेल तर डोळे उघडून क्लोराईड आफ् झिंक याणें डोळे धुवावे; सूज जास्त होत असल्यास डोळ्याचें रक्त काढण्याच्या शस्त्रानें डोळ्याच्या शिरांचें रक्त काढावें व तें रक्त गळूं लागलें असतां जमिनीवर घोड्यास आवडता दाणा खावयास ठेवावा. ह्मणजे रक्त डोळ्यांत न जातां खालीं पडेल. याप्रमाणें डोळे बरे होई तोंपर्यंत करावें. परंतु रक्त मात्र एकदांच काढावें.

स्पेसिफिक आफ् तालमा. (वायूपासून डोळ्यास विकार होतो तो).

हा डोळ्याचा रोग, तबेल्यांत घाणेरडा पदार्थ सांचला असून त्याची वाफ निघून हवेनें जर डोळ्यात गेली तर त्यापासून होतो.

लक्षणें.—डोळ्याच्या पापण्या सुजतात व डोळ्यांतून पाणी गळतें, नाडी कठीण चालते, श्वासोच्छ्वास जलद चालतो, तोंडास चिकटाई येते, नाकाचे पडदे सुजतात, किंवा फिकट रंगाचे होतात, डोळ्याची पापणी सावलींत मात्र उघडते, आणि डोळ्याच्या बुबुळाजवळील भाग लाल होतो. ऐरिश (बुबुळाच्या आंतील भाग) नेहमीं पेक्षां हलका होतो. हा रोग एका डोळ्यास झाला ह्मणजे दुसऱ्यासही होण्यास अवधि नसतो. एक वेळ हा रोग झाला ह्मणजे पुन्हां होत नाहीं असें नाहीं. तरहा पुन. पुनः होतो. याचा अखेरीस परिणाम डोळा जातो. कधीं कधीं दोन्हीही जातात किंवा एक बरा होऊन एक जातो.

उपाय.—वाईट तबेल्यांतून घोड्यास काढावा, सावलींत बांधावा, डोळ्याच्या शिरांचें रक्त काढावें, व त्याच शस्त्रांनीं पापण्यांचेंही रक्त काढावें. रक्त काढण्याची जरूर नसेल तर काढूं नये. दोन्ही डोळ्यांवर थंड पाण्याची घडी घालावी. जर घोडा अशक्त असेल तर त्यास खाण्यास पुष्कळ घालावें, आणि घोडा तयार असेल तर बेताचें खाणें खाऊं घालावें; जास्त घालूं नये व ज्या खाण्यास फार चवर्ण लागणार नाहीं असें घालावें.

दुसरा उपाय—दररोज सकाळ संध्याकाळीं औषध द्यावयाचें तें पाउडर्ड कोलचिकम दोन ड्राम, आयो डाईड ऑफ ऐरन एक ड्राम, क्यालोमेल एक स्क्रूपल आणि एक्स्ट्र्याक्ट ऑफ जंटीयन, हीं एकत्र करून लवकर त्यांचा गोळा करावा. आणि तो वर लिहिल्याप्रमाणें दिवसांतून दोन वेळ द्यावा. ह्या गोळ्यांनीं जर कांहीं गुण न येईल तर बदल करावा. किंवा अवगुण होईल तर बदल करावा, आणि त्याच्या ऐवजीं लिकर आरसीनेकीलीज तीन औंस, म्यूरीइटेट आणि टिंक्चर आफ् ऐरन पांच औंस, हें औषध द्यावें. तें अर्ध्या औंस पाण्यांत मिश्रण करून दोन वेळ द्यावें. व घोडा तबेल्यांत येण्यापूर्वी तबेला स्वच्छ ठेवावा.

क्याटेऱ्याक्ट. (डोळ्यांतील फूल किंवा मोतीबिंदु).

पांढऱ्या भिंतीकडे नेहमीं पाहण्यानें किंवा डोळ्याच्या आंत इजा झाल्यानें किंवा स्पेशिफिक ऑफ तालमा यापासूनही डोळ्यांत फूल पडतें.

लक्षणें.—हें फूल केव्हां केव्हां कमी असतें किंवा उगीच त्याची झळक असते. जर अगदींच पूर्ण फूल पडलें तर बुबुळ पांढरें राहून डोळे आंधळे होतात.

इलाज.—तबेल्याच्या भिंती हिरव्या रंगांनीं सारवाव्या, कारनीयावर जर थोडकें फूल पडलें आहे तर आपोआप जाईल, नाहीं तर त्यास दुसरा इलाज चालत नाहीं.

फंगॉइड.

हा रोग कशापासून होतो याचें कारण समजत नाहीं.

लक्षणें.—डोळे आंधळे होतात, व कांहीं पिवळा पदार्थ डोळ्यांत आहे असें दिसतें, आणि डोळ्यांतून रक्त किंवा वाईट पदार्थ पडत असतो. हा असाध्य रोग आहे.

अमरोशिस (मोतीबिंदु).

हा होण्याचें कारण, अर्धांगवायु झाल्यानें किंवा खच्चीकेल्यानें डोळे आंधळे होतात.

लक्षणें.—हा रोग झाला ह्मणजे घोडा साफ न चालतां फार जपून चालतो व चमकतो; डोळे अगदींच आंधळे होतात असें नाहीं व यामुळें चांचपडल्यासारखा चालतो.

याजवरही कांहीं उपाय चालत नाहीं.

इंपिडिमेंट (डोळ्यांतील पाणी नाकांतून येण्याचा रस्ता बंद होतो तो रोग).

लक्षण.—नाकांतून पाणी येण्याचें तें डोळ्यांतून येऊं लागतें. व पापण्यांचे पडदे सुजतात.

इलाज.—नाकाच्या नळीपर्यंत पाण्याचा प्रवाह जोरानें करावा, ह्मणजे डोळ्याचे कण्यापाशीं नाकांत पाणी जाण्याचा जो रस्ता आहे तो खुला करावा आणि त्यांतून मेण लावलेली दोरी घालून नाकाच्या नळींतून आरपार काढावी. आणि मग पाणी ओतावें. ह्मणजे नाकाच्या नळीचा रस्ता कांहीं गेल्यानें बंद झाला असल्यास खुला होतो, आणि मग डोळे बरे होतात.

डोळ्यांतील दर्द.

डोळ्यांतून पिंवळें पाणी निवतें त्याजवर उपचारः—

१. सोन्याचा व रुप्याचा गू, इंद्रनीळ, पांढऱ्यामिरच्या, माणिक, इंद्रायणी मीठ आणि गारेचा दगड हीं बारीक करून त्याचें अंजन करून लावावें.

२. पिंवळें निळें पाणी डोळ्यांतून जाऊन कमी दिसतें. याजवर उपचार.—काळाबोळ नऊ मासे, येल्वा, केशर नऊ मासे, कोरफड,

कापूर आणि जवाचे दाणे एक टांक, हे सर्व पदार्थ बारिक करून अंजन करावें. व तें मधांत कालवून डोळ्यास लावावें. डोळ्याजवळचें रक्त काढलें तर चांगलें आहे. टाळूवर थंड पदार्थ बांधावा.

३. सर्दी किंवा गर्मी झाली तर डोळ्यांनीं दिसत नाहीं याजवर— डोळ्याच्या शिरा नाकाखालीं येतात, त्यांचें रक्त काढावें. कोंबडीचे अंड्यांतील पांढरें बलब घ्यावें, सुगंधिक फुलाचें तेल व जवसाचें पीठ सारखें घेऊन, डोळ्यांत घालावें.

४. डोळ्यातून निळें पाणीं जातें त्याजवर—कोंबडीचें अंड्यांतलि पांढरें बलब केशर व बत्तासे हे प्रत्येक बरोबर घेऊन अंजन करावें, व कोंबडीचे पिसानें लावावें.

५. डोळ्यांतून पांढरें पाणी निघतें त्यास मोतियाबिंदु ह्मणतात. ह्मणजे डोळ्यांतली बाहुली काळी पांढरी होते. अशा वेळीं त्यावर उपचारः शस्त्रांनीं डोळ्याचा पडदा काढावा, आणि नीळकांत कोंबडीच्या अंड्यांतील पांढऱ्या बलकांत घोंटून डोळ्यांत घालावा.

६. काचबिंदु याजवर उपचार.—डोळ्यांतील बाहुली निळी होतें. त्यांतून काळे पाणीं जातें. डोळे लाल होतात. अशा स्थितींत वेताचीं पानें घेऊन सावलींत सुकवून बारिक करावीं. व साबणानें धुऊन पुन्हां सुकवावीं आणि नंतर डोळ्याचे आंखांत घालावीं.

७. कोंबडीचे अंड्यांतील पिंवळा बील, जिरे, व फुलाचें तेल यांचें अंजन करून डोळ्यांत घालावें.

८. डोळे काळे होतील, त्यांतून पाणी येईल, व लाल दिसतील, तेव्हां त्यास मुंज्या ह्मणतात. त्याजवर उपचार—बाभळींचा गोंद, केशर, हिंगुळ व फटकी वस्त्रगाळ करून; दररोज चार जवा येवढें हें औषध डोळ्यांत घालावें.

९. डोळ्यांतील बाहुलीचा रंग निळा होतो, नंतर डोळे लाल होतात, डोळ्यांतून कांहीं वेळ पिंवळें पाणी निघतें, कहीं वेळ निळें

पाणी निघतें व डोळे हागतात. त्याजवर उपचारः—तांदूळ शिजवून त्यांत कच्ची फटकी मिळवून घोड्याचे डोळ्यावर कांहीं वेळ ठेवून लेप करावा. नंतर त्यावर साखर लावावी, व घोड्याजवळ मनुष्य बसवावा. घोड्यास हालूं देऊं नये, व तीन दिवसपर्यंत घोड्याचे कानावर पट्टी तशीच ठेवून नंतर काढावी.

१०. सिरसाचे झाडाच्या चार बिया, गुंजा पांढऱ्या ४, हत्तीची नखी, लवंगा ४, हे सर्व पदार्थ लिंबाचे रसांत उगाळून, कुंकूं ४ मासे व फटकी भाजलेली १ मासा घेऊन त्यांत मिश्रण करून लेप घालावा, व एक दिवस तो लेप तसाच ठेवावा. नंतर कोंबडीचे परानें डोळ्यांत घालावा. दिवसांतून तीन वेळ हें औषध द्यावें व दररोज नवें औषध करीत जावें. पांच दिवस असें करावें.

११. हिंगणाची मुळी तीन तोळे, धमासा तीन तोळे व जंगला भाजलेला एक रती, हें सर्व डाळिंबाचे रसांत भिजवून कोंबडीचे पिसानें लावावें.

१२. डोळे लाल होतात किंवा मैले दिसतात, किंवा पाणी वाहतें व भुंवया चढल्या असतात, त्यावर उपचार.—शहादाणे, पांढऱ्या मिरच्या, काळ्या मिरच्या, मुरदाडसिंग व केशर, हे सर्व पदार्थ सारखे घेऊन बारीक वस्त्रगाळ करावे. मग शिजवावे आणि अंजन करून तें डोळ्यास लावावें.

१३. तांबडी साखर घेऊन ती डाळिंबाचे रसांत भिजवावी आणि तें अंजन डोळ्यास लावावें.

१४. गव्हांची कणीक व मनुष्याचे केंसांचीं राख एकत्र शिजवून नंतर त्यांत दगडी मीठ, संगमरवरी दगड, समुद्राचा फेंस व कोरफडीचा मगज हें सर्व बारीक करून डोळ्यास लावावें.

१५. भाजीचे मुळे बारीक करून त्यांचा रस मधांत मिश्रण करावा आणि पिसानें डोळ्यांत घालावा.

१६. डोळ्यांत कंडू होतो त्यावर उपचार.—जंगली, बाभळीचा व तुताचा गोंद, इंद्रायणी मीठ आणि नवसागर हे सर्व बारीक करून, गाईचे तुपांत घालावे. व तें मिश्रण एक टांकाचा चौथा हिस्सा इतकें डोळ्यांत घालावें.

१७. पडवळ ह्मणजे डोळे हागतात त्यावर इलाज.—डोळ्यांचे टोंकांस ह्मणजे नाकाकडे रक्त काढावें. नंतर मेंदीचा रस काढून डोळ्यांत घालावा.

१८. कोंबडीचे अंड्यांतील सफेत बील, व फुलाचें तेल डोळ्यांत घालावें, किंवा गाढवीचें दूध चार पांच दिवस डोळ्यांत घालावें.

१९. डोळ्याचे केस बुबुळावर येतात त्यावर उपचार—भाजलेली हळद व हरताळ वस्त्रगाळ करावी. आणि लिंबाचे रसांत अंजन करून डोळ्यांत घालावें.

२०. खुपरी होते त्याजवर उपचार—रक्त निघतें त्यावर डाग द्यावा आणि त्यावर तीन दिवस साखर टाकावी. नंतर डाग दिलेली कातडी काढावी, त्यावर दवा–डाळिंबाचें फूल आणि फटकी बारीक करून त्याजवर लावावी.

२१. डोळ्यांतून पाणी वाहतें, डोळ्याची पुटें सुजतात आणि डोळे लाल किंवा निळे होतात. त्याजवर उपचार—रक्त काढावें आणि त्यावर पुढें लिहिलेला दवा लावावा. कोंबडीचे अंड्यांतील पांढरें बलक, बुरा अदमणी आणि मीठ, यांचें मिश्रण करून डोळ्यांत घालावें.

२२. तांबडी साकर, कापूर व लांबट मिरच्या हीं सर्व एकत्र करून तें मिश्रण डोळ्यांत घालावें.

२३. गोंद गाढवीचे दुधांत मिश्रण करून डोळ्यांत घालावा.

२४. चिमणीसारखे डोळे होतात त्याजवर उपचार—शस्त्रांनीं टोंचून, मिठाचें पाणी डोळ्यांत घालावें व रक्त बंद करावें. नंतर साधें मीठ, पिंवळें मीठ, इंद्रायणी मीठ, नवसागर आणि मिरच्या

हीं सारखीं घेऊन बारीक करावीं व त्यांत सर्व औषधांचे अर्धी साखर घालून अंजन करावें व डोळ्यांत घालावें.

२५. सैंधव व खाण्याचें मीठ, हें नरमूत्रांत मिळवून अंजन करावें, व दिवसांतून चारपांच वेळ डोळ्यांत घालावें.

२६. सिरसाचे झाडाचें बीं, लिंबाचे रसांत उगाळून त्यांत फटकी, लवंग व चंदन मिळवून पिसानें डोळ्यांत घालावें.

२७. जंगला भाजलेला अर्धा पैसाभार, सिरसाची अंतरसाल भाजलेली अर्ध पैसाभार आणि फटकडी अर्ध पैसाभार; लिंबाचे रसांत सर्व औषध भिजवावें. नंतर तें तुपांत तळावें. व बाटलींत घालून ठेवावें, आणि दिवसांतून चार वेळ डोळ्यांत घालावें.

२८. पांढरे डोळे झाले असतील तर त्यावर उपचार—हळद मीठ यांची पट्टी डोळ्यावर बांधावी, आणि मीठ व हळद यांचें पाणी सोडावें. चवथे दिवशीं पट्टी काढावी. जर कांहीं पांढरेपणा असेल तर पिवळी कवडी जाळावी व त्याचें भस्म वस्त्रगाळ करून, गाईचे लोण्यांत अंजन करावें व डोळ्यांत घालावें. परंतु पाणी फार जात असेल तर नुस्तें भस्मच डोळ्यांत टाकावें.

२९. जंगला निळा अर्धा मासा, फटकी एक मासा, लवंग पांच मासे, गूळ खापरी सहा मासे व हत्तीचें नख एक मासा, हे सर्वत्र वस्त्रगाळ करून त्यांचें गाईचे लोण्यांत अंजन करावें व दिवसांतून दोन तीन वेळ डोळ्यास लावावें.

३०. इंद्रायणी मीठ, (बुरा अरमणी मीठ) मोतीं बिनछेद, खडी साखर, गारेचा दगड, पांढऱ्या मिरच्या आणि मिरे हें सर्व बारीक करून दिवसांतून चार वेळ डोळ्यांत घालावें.

३१. शरीराचें मास वाढतें त्याजवर–फुलेल तेल व मेण हें ऊन करून डोळ्यास लावावें. नंतर माशीचें डोकें कापून बाकी भाग घोड्याचे डोळ्यावर लावावा.

३२. डोळ्याच्या कोणांत मांसाचा तुकडा होतो, व त्यापासून पिंवळें पाणी वगैरे निघतें. त्यावर उपचार:शस्त्रांनीं कांपावें ह्मणजे रक्त व पू निघून जाईल; नंतर पांढरे जिरे बारीक करून त्यांत भरावे, आणि कोंबडीचें आंडें पक्कें झालेलें, गरमदूध, पांढरे जिरे व फुलेल तेल हीं एकत्र करून जखमेवर लावावीं. आणि तीन दिवसपर्यंत जखम बांधून टाकावी. नंतर सोन्याचा गू, जंगला, नवसागर व गारेचा दगड हीं सर्व बारीक करून अंजन करावें.

३३. रातांधळ्यावर उपचार—बकरीच्या कर्डाचें काळीज घेऊन विस्तवावर ठेवावें, आणि ऊत आल्यावर मेंदीचा रस त्यांत पिळावा. आणि ती फेस घेऊन तें अंजन डोळ्यांत घालावें.

३४.काळे मिरे बारीक करून हातांत ठेवावे.उंटाचें दूध, व गाढवाचें रक्त, एकंदर करून पिसानें लावावें; असें २०दिवस पर्यंत करावें.

३५. घोड्याचे डोळ्यांत लाल ठिपका होतो त्यापासून ऊन पाणी निघतें, त्यावर उपचार—जंगली खबूतराचा बच्चा आणावा, त्याचीं पिसें काढून टाकावीं, आणि त्याचें रक्त निघेल तें डोळ्यांत घालावें. मध व उंसांचा रस मिळवून डोळ्यांत घालावा.दुसरे दिवशीं गाईचें तूप, शेंदूर, अळें, शिंगरूप, केशर, फुलाचें तेल आणि कोंबडीचे अंड्यांतील पिंवळें बलक हीं एकंदर करून अंजन करावें व तें डोळ्यांत घालावें.

३६. डोळ्यांत उन्हांनीं लाल ठिपका होतो, त्यावर उपचार—गाढवीचें दूध डोळ्यांत घालावें.

३७. फूल पडतें त्याजवर उपचार—कांब्या सेंदूर तीन मासे, लवंग तीन मासे, शिरसाचे झाडाचें बीं तीन मासे, हे सर्व गाईच्या दुधांत खलून गोळ्या करून लिंबाचे रसांत उगाळून लावावें.

३८. सफेत गूळ दोन तोळे, हत्तीची नखी दोन तोळे, पिंपळपान दोन तोळे, पिंपळमूळ १ तोळा, शिरसाचें बीं एक तोळा, व सा-

बू १ तोळा, बारीक करून वस्त्रगाळ करावें. आणि गोळी करून लिंबाचे रसांत लावावी.

३९. काळा भंगडा याचें बीं, मधांत मिळवून अंजन करावें,व त्यांत पिण्याची दारू मिळवून लावावी, आणि अफू, लवंग, हळद, हे पदार्थ लिंबाचे रसांत लावावें.

४०. गुगुपंजर लिंबाचे रसांत घांसून लावावें.

४१. बांगड्या निळ्या बारीक कुटून १ एक तोळा,व केश २ तोळे, तिळांत कुटून त्यांत लिंबाचा रस घालून खळवत्यांत घोंटावें. या प्रमाणें खल करावा, नंतर गोळी करून लिंबाचे रसांत उगाळून दिवसांतून तीन वेळ डोळ्यांत घालावी.

४२. काळे किंवा पांढरे जिरे दहा मासे, हळद नऊ मासे, खडीसाखर सात मासे,व जंगला (निळा) चार मासे,हीं सर्व बारीक करून वस्त्रगाळ करावीं,नंतर तरवटाचे झाडावरच्या किड्याचा रस काढून त्यांत गोरखूत घालावा आणि वस्त्रगाळकरून सर्व मिळून त्याचें अंजन करावें.

४३. निळा (जंगला)६मासे, व मनुष्याचें नख एक तोळा,हीं बारीक करून शिजवून लोणी घालून अंजन करावें आणि तें दिवसांतून दोन वेळां लावावें.

४४. डोळ्यास गरमी होते, लाल होतात,त्यास संकला ह्मणतात. त्याजवर उपचार—रक्त काढावें. गाईचे तुपांत जवसाचें पीठ शिजवावें व त्याचें अंजन करावें.

४५. डोळे पाण्यानें धुवावे, लोणी,तांबडी साखर व कंचनाल याचीं पानें सारखीं घेऊन बारीककरून सुरमा करावा आणि पिसानें लावावा.

४६. सफेती किंवा जाळें डोळ्यावर येतें, त्याजवर उपचार—सफेत गुंज, हत्तीचें नख, तरवटाचे झाडाचा किडा, विसमुळसरी, फटकी, रिठ्याचे बीचा फेंस, त्यांत निळा (जंगला) भाजलेला, मनुष्याचें नख १ एक तोळा, आंबेहळद एक तोळा, लवंग तीन मासे व काळे-

मिरे सुमारें ४ हीं सर्व लिंबाचे रसांत मिळवून तें मिश्रण पेनानें लावावें. एक महिन्यापर्यंत असें करावें.

४७. सोरा, शिककई, हिंगणाचा मगज, व सिंदीचे झाडाची साल, हें सर्व बारीक करून लिंबाचे रसांत खल करावा आणि ती गोळी घांसून दिवसांतून तीन वेळ लावावी.

४८. माशाचें पित्त, मेणांत दिवसांतून चार वेळ लावावें.

४९. हिंगणाची सालतीन मासे, व जंगला(निळा) भाजून त्यांचें लिंबाचे रसांत अंजन करावें. व तें पिसानें दिवसांतून तीन वेळ लावावें.

५०. गाईचें तूप, फूलतेल, अंड्याचा पिवळा बलक, व केशर हीं एकत्र करून तें मिश्रण पिसानें लावावें.

५१. सिरसाचे झाडाचें बीं, लवंग, काळीमिरें, हत्तीचें नख, व हिंगणबेटाची बी, हीं सर्व एकत्र करून, सिंदीचा रस घालून दिवसांतून तीन वेळ लावावें.

५२. शिंदीचा रस व कांहीं मीठ घालून लावावें. सात दिवस दररोज सकाळीं लावीत जावें.

५३. पांढरे मिरे, लालमिरच्या, जवसागर, चांदीचा गू, मरजान दगड, व बिन छेदलेलें मोतीं बारीक करून चार पैसेभार डोळ्यांत घालावें.

५४. सफेद गुंज, खडीसाकर, व जैतूनाचें बीं, हीं सर्व बारीक करून वस्त्रगाळ करावें. आणि बिजखोबऱ्याचा रस त्यांत मिळवावा आणि तें अंजन सकाळीं संध्याकाळीं डोळ्यांत घालावें.

५५. कुंकूं चार मासे, तरवटाचे झाडावरचा किडा, व मिरें ५० लिंबाचे रसांत खलावें. आणि गाईचें लोण्यांत लावावें.

५६. विलायती एरंडाचा चीक, त्यांत लवंग चवथा हिस्सा, व सिरसाचें बीं चवथा हिस्सा, दिवसांतून दोनवेळ लावावें. चाळीस दिवस असें करावें. ह्मणजे रात्रीचें दिसत नाहीं तेंही बरें होईल.

५७. डोळ्यावर छडी मारल्यापासून वगैरे डोळ्यावर सफेती येते, त्यास प्रथम शेकावें, नंतर आंबेहाळद, रक्तबोळ, फटकी, लिंबाचींपानें, पिठाचे झाडाचा मगज, व कोरफड हीं बारीक करून पोटली करावी, आणि गरम करून शेकावें.

५८. सर्दी किंवा गर्मी झाली तर दृष्टीस विकार होतो, दिसत नाहीं, त्याजवर उपचार—नाकाकडच्या शिरांचें रक्त काढावें, कोंबडीचे अंड्यांतील पांढराबल्क, फुलाचें तेल, व जवसाचें पीठ, सारखें घेऊन, लिंबाचे रसांत अंजन करावें.

५९. कापूर, अंड्यांतील पांढरे बल्क, केशर, व बत्तासे, यांचें अंजन करावें, व पिसानें लावावें.

६०. घोड्याचे डोळे गुंजावर्ण अथवा नीलवर्ण होतात, त्यास औ-षधः—तालांजन, नीळांजन (निंबीचे मुळीची साल), रातांजन (रक्त-चंदन) व कोरांजन (टारडमुळीची साल) हे सर्व जिन्नस मधांत उगाळून, घोड्याचे डोळ्यांत घालावे. चार दिवसांत घोडा बरा होईल.

६१. डोळे धूम्रवर्ण होतात, हा पित्ताचा गुण होय; त्याजवर उपचार—पिंपळी, सुंठ, व रसांजन हे सर्व जिन्नस मधांत उगाळून डो-ळयांत घालावें.

६२. वडसांस औषध—सैंधव, व डांगरमीठ, हीं समभाग घेऊन गोमूत्रांत कालवून, सात दिवस डोळ्यांत घालावें, म्हणजे बरे होतील.

६३. घोड्याचे डोळ्यांत निळे, पिवळे व सुतासारखे किडे पडतात. त्यास उपाय—नीळांजन, रसांजन, व रातांजन, हीं जाळून त्यांची राख मधांत कालवून डोळ्यास लावावी. असें तीन दिवस करावें व डोळे ऊन पाण्यानें धुवावे.

६४. घोड्याच्या डोळ्यास मुंजा होतो त्यास औषध—हिराहिंग ३ तीन टाक पोटांत तीन दिवस पर्यंत द्यावा. व डोळ्यावरचे सर्व केंस काढून त्यावर हिंगाची पुडी घालून, वरतीं कांपडानें बांधावें

म्हणजे आंतील किडा जाईल. नंतर तिधारी निवडुंगाच्या दुधाचें अंजन लावावें. त्यावर आंबेहाळद अच्छेर बारीक वस्त्रगाळ करून त्याची टिकी करून, पांढरे कण्हेरीचीं फुलें अच्छेर घेऊन मोठ्या मडक्यांत पाणी घालून चिरगुटानें तोंड बांधावें. नंतर चिरगुटावर फुलें घालून, त्या फुलावर झांकण ठेवावें व नंतर फुलें उकडल्यावर त्या फुलांची व हळदीच्या पुडीची डोळ्यावर पट्टी बांधावी. सात दिवस झाल्यावर डोळ्यावरची पट्टी काढावी, ह्मणजे डोळा बरा होईल.

६५. मुंज्यास औषध—वडाचे पारंबीचा चीक, अरुणोदयीं एक टांकप्रमाणें डोळ्यांत घालावा. सात दिवसांत बरें होईल.

६६. घोड्याचे डोळे सुजतात, रक्तवर्ण होतात, वारंवार पाणी जातें. त्यास उपचार—संचळ, सैंधव, मध, व कांच हे सर्व कांजीबरोबर वाटून त्याचा डोळ्यावर लेप करावा. मग निर्गुडीचा पाला, ऊन करून डोळ्यास शेक द्यावा. घटकाभर चिरगुट वर बांधावें. असा क्रम तीन दिवस करावा.

६७. डोळा पांढरा पडला असल्यास त्यास उपाय—पिंपळी, सुंठ व रसांजन, हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन मधामध्यें उगाळून डोळ्यांत घालावें.

६८. डोळे अगदीं रात आंधळे होतील, त्यास औषध—मासळीचें अथवा साळूचें पित्त मधांत मिसळून डोळ्यांत चार दिवस घालावें.

६९. डोळ्यांत फूल पडलें असेल तर त्यास औषध—मासळीचें पित्त मधांत मिसळून, डोळ्यांत घालावें.

७०. गुंजा मनुष्याचे मूत्रांत उगाळून डोळ्यांत घातल्या असतां फूल झडेल.

७१. मुंज्यास औषध—गोंद लिंबाचे रसांत खलून डोळ्यांत घालावा. मुंजा तत्क्षणीं निघेल.

७२. घोड्याचे डोळ्यांत रस उतरतो त्यास उपचार—सैंधलोण,

व डांगरमीठ, हे दोन्हीं बरोबर घेऊन, गोमूत्रांत खलून तीन दिवसपर्यंत डोळ्यांत घालावें. डोळे बरे होतील.

७३. घोड्याचे डोळ्यांतून पाणीं गळतें. त्यास उपाय-तांवडे कण्हेरीचें फूल, गहूं, कोष्ठ, तूप, व मध हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन तांब्याचे परातींत घालून तांब्याचे भांड्यानें घोंटावें. एक एक थेंब घोड्याचे डोळ्यांत घालावा. सात दिवसांत डोळे बरे होतील.

७४. शेंदेलोण, काळेंमीठ, सोरमीठ, व गोमूत्र हे सर्व सारखेएक ठिकाणीं करून सारवावें. व हें औषध चिरगुटांत घालून त्याची पोचंडी बांधून ऊन करून दोन्ही डोळे शेकावे. ४ च्यार दिवसांत डोळे बरे होतील.

डोळे आणि तोंड सुजतें त्यावर उपचार.

१. हा रोग एकाएकीं होतो, त्या वेळेस साधारण ताप थोडा येतो. घोडेवाल्यांस हा रोग माहित नसला तर ते त्यास उष्ण झालें आहे असें समजतात आणि त्याकडे फारसें लक्ष्य लावीत नाहींत. तेव्हां घोड्याच्या डोळ्याची पापणी सुजते. व डोळ्यांतील पांढरा भाग तांबूस होतो आणि बाहुली मंद दिसते. डोळ्यावर सारा येतो, डोळ्यास कांहीं लागलें किंवा डोळ्यांत कांहीं गेलें तर डोळ्यावर सूज वगैरे येते. तेव्हां डोळ्यांत कांहीं गेलें असेल तें काढलें असतां बरें होईल. जुलाब दिला तर बरें होईल. भुस्यांत नैटर एक औंस घालून खाण्यास द्यावें. याप्रमाणें दोन किंवा तीन दिवस केलें असतां बरें होईल. थंड पाण्यानें त्याचे डोळे धुवावे. धुण्याची कृति पूर्वीं लिहिल्याप्रमाणें करावी.

२. डोळे आले असल्यास वर लिहिल्याप्रमाणें चिन्हें होतात. डोळे आले तर उजेडाकडे पाहवत नाहीं, डोळे अगदीं मंद होतात, पांढरेपणा येतो, रक्त किंवा पुवानें डोळे भरतात, कांहीं दिवस विकृति

कमी असते, परंतु अखेरीस डोळे जातात, ह्मणजे फुटतात. हा रोग-दुसऱ्या घोड्यास स्पर्शानें लागतो, किंवा थंड ठिकाणचे तबेल्यांतून उष्ण ठिकाणचे तबेल्यांत नेला असतां किंवा जास्ती खावयास घातल्यानें किंवा अधिक काम घेतल्यानें हा रोग होतो. यावर उपचारः रक्त काढावें किंवा थंड पदार्थानें डोळे धुवावे. रक्त काढणें तें डोळ्याचे आंतील शिरांचें ह्मणजे कानाच्या बाजूकडील रक्त काढलें असतां बरें होईल.

३. डोळ्यांतील बाहुलींत फूल पडतें तो रोग डोळे सुजल्यावांचूनही होतो. पहिल्यानें डोळ्यांतून थोडा पूं वाहतो आणि नंतर जास्ती वाहत जातो. अखेरीस सर्व डोळा पांढरा होतो. हा रोग आईबापाला असला तर त्याचे संततीला होतो. आणि तो त्याचे ह्मातारपणीं होतो. हा रोग बरा होत नाहीं. शेवटीं घोडा अंधळा होतो.

४. दुसरी एक डोळ्याची विकृति अशी आहे कीं, डोळे दिसण्यांत सुरेख दिसतात. परंतु घोड्याला त्या डोळ्यानें मुळींच दिसत नाहीं. यावर कांहीं औषध नाहीं.

५. घोड्याचे तोंडांतील आंतील हिरड्या सुजतात; त्यावर उपचार-दोन जुलाब द्यावे. व रात्रीस भूस नैटर १ औंस घालून द्यावें. दाणा देऊं नये. हिरड्या इतक्या सुजतात कीं, त्या दांतांबरोबर मिळून जातात.

६. कमजास्ती तोंड उघडत नाहीं यावर उपचार-एका कारणानें हा रोग होतो तो असा-छातीवर धुरीचें लांकूड लागलें, किंवा शिरा ताठतात त्यामुळें असें होतें. त्यावर औषध लागूं होत नाहीं. अफू, क्लोरोफार्म, गांज्या, वावडिंग, रक्त काढणें किंवा चादर भिजवून आंगावर लावणें. या उपायांनीं घोडा वांचेल तर वांचेल, नाहीं तर वांचणार नाहीं. ज्योसतिंद-डोळ्यांतून पाणी वाहूं लागतें व तोंडांतून लाळ गळते. यास उपाय-हिरडा, बेहडा, आवळकठी, मोहऱ्या, व हळद हे सर्व जिनस बराबर घेऊन गोमूत्रांत चारावे. व

या औषधांचा लेपही करावा. परंतु हा लेप करण्याचे अगोदर कांजीनें तोंड चांगलें धुवावें.

मुखरोग.

हा रोग घोड्याच्या तोंडास (कल्लुचांस) लगाम लागून त्याचे योगानें क्षतें पडतात;याचें कारण,लगाम फार ओढल्यापासून असें होतें.

इलाज—खालीं लिहिलेले औषधानें चट्टे पडलेले धुवावेत. तें औषध—क्लोराईड आफ झिंक दोन स्क्रुपल, इसेन्स् आफ आनीसीड दोन ड्राम, व पाणी एक शेर,हें सर्व मिश्रित करून पडलेले चट्टे धूत जावे.

खालचे जबड्याची इजा.

हा रोग, साधा लगाम ओढल्यानें किंवा घोड्यास दाबांत ठेवण्याकरितां दाबाची सांखळी बळकट आंवळल्यापासून होतो.

लक्षण—सुळे दांतांच्या पुढें किंवा मागें क्षत पडतें, आणि जिभेच्या खालीं खोक होते, किंवा टाळ्यास दुखापत होती, अथवा जबड्याच्या बाजूवर गांठ येते, किंवा हाड वाढतें.

इलाज—जेथें क्षत पडलें असेल तेथें हाडापर्यंत चाकूनें कांपावें, जर दुर्गंधि येत असेल तर क्लोराइड आफ् झिंक यांणीं धुवावें आणि जखम उघडी ठेवावी ह्मणजे बरें होईल.

घोड्याचें तोंड येतें त्याजवर उपचार.

हा रोग उष्णतेपासून होतो किंवा अन्न न पचन झाल्यामुळें होतो.

लक्षण—ओंठ सुजतात, जिभेस सूज येते आणि दोन्हीही ठिकाणीं चट्टे पडतात, आणि गुदद्वारांत फोड येऊन येऊन खवले पडून

बरे होतात किंवा जास्ती झाले ह्मणजे त्यांतून नासका पदार्थ पडूं लागतो.

इलाज—नरम दाणा खाण्यास देऊन खालीं लिहिलेले औषधानें तोंड धुवावें. तें औषध—बोराक्स पांच औंस, मध किंवा काकवी दोन पिंट, व पाणी एक ग्यालन, हें मिश्रण करून तोंड धुवावें. याप्रमाणें दिवसांतून दोन वेळ धुवावें ह्मणजे बरें होईल.

जिव्हारोग (जिभेवर चिरा पडतात, किंवा जीभ उफळते).

हा रोग जुलाबाचें औषध देतेवेळीं चिकटा राहिल्यानें किंवा चऱ्हाटें चवळण्यापासून होतो.

लक्षण—घोडा जीभ बाहेर काढितो, आणि जिभेचें चळण वळण कमी असतें.

इलाज—शस्त्रांनीं जीभ कांपावी आणि रक्त जाऊं द्यावें; व दाण्याऐवजीं पातळ व नरम पदार्थ खाण्यास द्यावा, आणि चंदी दिल्यावर कांहीं वेळांनीं, क्लोराईड आफ् झिंक यांणीं किंवा बोराक्स पांच औंस, मध दोन पिंट व पाणी एक ग्यालन हें एकत्र करून तोंड धुवावें ह्मणजे बरें होईल.

तोंड येतें व सांत चट्टे पडतात.

हा रोग फार कडक औषध दिल्यानें होतो (तोंड उफळतें).

लक्षण—घोडा वारंवार थुंका गाळतो व ओंठानें मिटक्या मारितो.

इलाज—पातळ व नरम पदार्थ खाण्यास द्यावा, आणि क्लोराईड आफ झिंक, किंवा बोराक्स पांच औंस, मध दोन पिंट, व पाणी एक ग्यालन हें एकत्र मिश्रण करून घोड्याचें तोंड धुवावें, बरें होईल.

घोड्याच्या तोंडाचे रोग.

१. तोंडास घाण येते, व फेंस येतो.

२. तोंडांत फोड येतात व पिवळें पाणी निघतें. ह्याप्रमाणें गाईचे व म्हशीचे तोंडास फोड होतात,त्यास कुकडा ह्मणतात. त्यावर उपचार:—जिभेचें रक्त काढावें, जव, मीठ, व डाळिंबाचें फूल, सारखें घेऊन बारीक करून, अंगुराचे शिरक्यांत चोळावें.

३. कोंबडीचे अंड्यांतील पांढरें बील, अंबेहळद, खाण्याचें मीठ व धमासा हें सर्व बारीक करून मिश्र करावें. आणि रक्त निघेपर्यंत जिभेस चोळावें.

४. अंजिराचे झाडाचीं पानें व त्याचीच साल बारीक करून जिभेस चोळावी.

५. तोंड सुजतें त्यास औषध—जवखार, रायी, शिरस, हाळद व सैंधव हें सर्व सारखें घेऊन, चूर्ण करावें. व चिंचेच्या बरबटांत कालवून त्याचा लेप तोंडावर व बाहेर करावा. तीन दिवसांत सर्व सूज जाईल.

६. काळेमिरे दोनचार दाणे घेऊन पूड करावी. लसणाच्या पाकळ्यांचा रस काढून, त्यांत ती पूड भिजवावी. आणि कापसाचे बोळ्यानें जिभेस चोळावी.

७. मुंगा (ओंठाचे आंतल्या आंगास फोड येतात) व कांटे येतात. हा रोग झाला असतां घोड्याच्यानें दाणा वैरण खाववत नाहीं. हा रोग घोड्यास वेळच्यावेळीं पाणी न पाजल्यामुळें होतो. यास औषध:—धमासा,हळद, व मीठ, हें सारखें करून रक्त निघेपर्यंत ओंठांवर चोळावें.

८. विड्याचीं चार पानें व कळीचा चुना हीं एकत्र करून तें औषध ओंठास चोळावें.

९. मीठ व हळद बारीक करून ओंठावर चोळावें आणि वाळलेले हरभरे खाण्यास द्यावे.

१०. कव (टाळ्यास मास येतें तें) त्यावर औषध:गव्हांचा भुस्सा व कणीक खाण्यास द्यावी आणि रक्त काढावें.

११. दांतांवर मास जमतें त्यावर लोखंड तापवून डाग द्यावा, नंतर उंटाचे दांत व मायफळ समभाग घेऊन, बारीक करून द्राक्षाच्या शिरक्यांत लावावें.

१२. मटर (मोठे वाटाणे) व माजूम हे समभाग घेऊन, शिरक्यांत घालून दांतास चोळावें.

१३. बेडूक शिजवून त्याचा अर्क काढावा. व तो माकरीचा मगज व जैतूनचें तेल यांमध्यें कालवून खाण्यास द्यावा.

१४. कित्येक घोड्यांस चोर दांत एक असतो, तेणेंकरून घोड्यास दाणा वैरण खाववत नाहीं. यास्तव जो घोडा दाणा वैरण खात नसेल, त्याचे दांत पाहावे, आणि चोर दांत असल्यास काढून टाकावा.

१५. दांतांच्या हिरड्या सुजून रक्त निघतें त्यावरः विंचू जाळून त्याची राख चोळावी, तशींच करडूड यांचीं पानें घेऊन शिरक्यांत बारीक करून चोळावीं.

१६. मटर (मोठे वाटाणे) व माजूम हीं सारखीं वजनानें घेऊन शिरक्यांत चोळावीं.

दंतरोग.

हा रोग होण्याचें कारण कमजास्ती दांत होऊन हिरड्या घांसतात व दांतांवर मास येतें.

लक्षण—घोडा डोकें एकीकडे करितो, थुंका गाळितो, व दाणा खाते वेळीं, थुंक्यानीं खराब होतो.

इलाज—पुढें आलेला दांत असेल तो शस्त्रांनीं कांपावा किंवा मासास लागत असेल तर तेवढा भाग कांपून काढावा.

उशीतरोगाचें लक्षण.

दाणा खातां अथवा दूध पितां त्यांणीं अनमूट लागली असतां त्या-

जवर उपचार—पद्मकाष्ठ, भारंगी, वेखंड व सुंठ, हीं औषधें समभाग, प्रत्येकीं २ टांक घेऊन पाण्यांत वाटून खूप बारीक करून खलून नस्य द्यावें. तीन दिवसांत बरें होईल.

दुसरें औषध—शेरणी, एरंड, कडुइंद्रायणी, रुई, कारलें, चित्रक, आस्कंद, बेल, चित्रकमूळ, तेरणी, डोरली, राई, उताटे, इंद्रावणी, अडोळसा, व पांगारा, ह्या सर्वांचीं मूळें माका, घोडकातरा, निंबारा, वायवर्णी, भुईनिंब, वाघाटी, व कांदे यांचा पाला आणि मिरे, लसूण, वेखंड, ओंवा, पिंपळमूळ, शेपा, आजमोदा, चोखोवा, गेळें, निवडुंगाचा चीक, भारंगी, दोन्ही हाळदी, कोरांजन, हिरडे, हिंग, पिंपळसाल, व हादगा हीं औषधें समभाग आणि वर सांगितलेल्या मुळ्या व पाला मिळून गोमूत्र, ताक व नरमूत्र यांत कालवून मडक्यांत भरावें. त्यांत मीठ बरेंच घालावें आणि तें घोड्यांस द्यावें.

घोड्याला फांसणी (फासी) होते त्यास उपचार.

सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, अवळकठी, वेखंड, वावडिंग, लसूण ओंवा, किराईत, गोष्टकोळिंजन, भारंगीचीं व डोरलीचीं मुळें, केवडयाचे झाडाची साल, निर्गुडी, टाकळी, इंद्रावणीचें मूळ, रिंगणीचें मूळ, पांढरे जिरे, शहाजिरे, आजमोदा, डाळिंबाचा पाला, पत्री, मोठीं भोकरें, रुईचें लांकूड, लिंबू, गाजर, वांगी, व अश्वगंध, हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन कुटून दह्यामध्यें कालवून तीन दिवस मडक्यांत घालून ठेवावे. तीन दिवसानंतर मीठ घालावें. व हें दररोज घोड्याला चाटवीत जावें. ह्मणजे घोड्याला क्षुधा चांगली लागेल. कांहीं रोग होणार नाहीं. मोव्या पाहाटेस औषध चारलें पाहिजे. व हिरडा, अजमोदा, ओंवा, लसूण, वेखंड वावडिंग व हिंग हे सर्व जिन्नस तुपामध्यें कालवून दुपारीं द्यावे. ह्मणजे सर्व रोग दूर होतील

पाणी पिते वेळीं पोटांत जळू गेली असल्यास घशांत हात घालून

काढावी व पोटांत गेली तर जैतुनाचें तेल पाजावें. दांतखिळी बसली तर बचनाग, तेलीयानाग, मिरानाग, आणि सुंठ, मिरच्या, पिंपळपान, पिंपळमूळ, दगडी मीठ, लसूण, अजवान, व गुंजाचें बीं, हीं अनुक्रमें दोन दोन टांक घेऊन अर्धे भाजून एकशेर गूळ घालून वीस दिवस खाण्यास द्यावें.

२. बचनाग, कोष्टकोळंजन, सुंठ, बचनागतेलिया, कचोरा, काळाबोळ, गजगांठीची बी, आंबेहाळद, अजवान, टांकणखार, हिंग, व पिंपळाची साल, हीं बारीक करून पाण्यांत उकडून तोंडावर लेप द्यावा.

जिव्हारोग.

जिव्हेखालीं रोग होतो, तेणेंकरून पिवळें किंवा लाल किंवा पांढरें पाणी निघतें त्याजवर औषधः—

पिण्याचे दारूंत पाणी मिश्र करून त्या पाण्यानें तें दर्द एकवीस वेळ धुवावें; नंतर कोंकणी मीठ एक पैसाभार, कापूर व फटकी तोळा तोळा, आणि (निळा) जंगला तीन मासे, हे जिन्नस बारीक करून तुपांत मिश्र करावे. त्यांत आंबेहळद एक तोळा मिळवावी आणि तें औषध दिवसांतून दोन वेळ दर्दावर चोळावें.

काळीं मिरीं दोन चार दाणे, व लसणाच्या पाकळ्या दोन हीं एक ठिकाणीं वाटून त्यांत कापूस भिजवून जिभेस चोळावा. जिव्हाशोष ह्मणजे जीभ वाळते आणि लांकडासारखी होते, त्यामुळें त्यास चरतां येत नाहीं. त्यास उपचारः—उंबराची साल, मध, व जिरे प्रत्येक सहा टांक घेऊन मधांत कालवून त्याचा लेप जिभेवर करावा. चार दिवसांत सर्व बरें होईल.

तितिडी (चिंच) ३ टांक, उंबराची साल ६ टांक, व त्रिरेग ६ टांक यांचें चूर्ण मधांत सात दिवस द्यावें. व हें पाण्यांत वाटून जिभेस लेप करावा.

जिव्हा रोग ह्मणजे दाढांच्या सांधीस फोड येतात, लाळ वाहते, व श्वासोच्छ्वास करितो त्याजवर उपचार—सुंठ, मिरे, पिंपळी, राळ, व जिरे हीं प्रत्येक ९ टांक घेऊन त्यांचे चूर्ण करून तुपांत कालवून त्याचा तोंडावर आणि आंत लेप करावा.

जिभेखालीं रोग होतो, तेणेंकरून पिंवळें किंवा लाल किंवा पांढरें पाणी त्या ठिकाणांतून गळतें. त्याजवर उपचार—कोंकणी मीठ एक पैसाभार, कापूर १ तोळा, फटकडी १ तोळा, निळा (जंगला) तीन मासे, व आंबेहळद १ तोळा, इतके जिनस बारीक करून वस्त्रगाळ करावे. हें सर्व तुपांत कालवून जिभेखालीं जेथें पाणी निघतें तेथें लावावें.

दाढबंदरस.

घोडयाचे तोंडांत दोन्हींकडून मोठाला एकेक फोड होतो. त्या योगानें घोडा खात नाहीं. त्यास उपचार—मोठी कांठी घेऊन तिला, मध्यें बोट जाईसें भोंक पाडावें. ती कांठी घोड्याचे तोंडांत घालून त्या भोंकांतून त्याचे तोंडांत बोट घालावें, आणि बोटानें फोड फोडावा. नंतर लसूण, सुंठ, पिंपळमूळ व हळद हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन गाईचे दुधांत एकत्र करून फोडास लेप करावा. व एक मोठें लांकूड घोड्याचे तोंडांत घालून नंतर दाढ बांधावी. ह्मणजे तोंड मिटणार नाहीं. ह्याप्रमाणें दोन तासपर्यंत तसेंच घोड्यास राहूं द्यावें. नंतर लांकूड काढावें; असें चार दिवस करावें.

दाढारोग.

दाढांच्या सांधींस फोड येतात. त्यामुळें त्यास चरतां येत नाहीं. तोंडावाटे लाळ पडते. त्यास उपचार—प्रथम शस्त्रानें फोड फोडावे.

मग लसूण, वाया (सुंठ), पिंपळमूळ व हाळद, हीं प्रत्येक चार टांक प्रमाणें घेऊन कुटून गुळांत कालवून त्यांचा दाढांस लेप करावा. आणि घटकाभर तोंड उघडें ठेवावें. असा क्रम तीन दिवस करावा. नंतर टाकळीचा पाला ४ टांक, लसूण ४ टांक व सुंठ ४ टांक ह्याप्रमाणें घेऊन कुटून तुपांत कालवून ती गोळी पोटांत द्यावी.

दाढसाकळ रोग असा होतो कीं, घोड्याचें थोबाड सुजतें. त्यास उपचार—सज्जीखार, जवखार, व लोणाखार हे समभाग घेऊन मधांत कालवून लेप करावा. हींच औषधें गुळांत कालवून चार दिवस चाटण द्यावें.

गालफुगी—गळा व गाल सुजतो. त्यावर औषध—शंखजिरें, सज्जीखार, जवखार, व लोणखार हे प्रत्येक एक एक टांक ह्याप्रमाणें घेऊन चूर्ण करून मधांत कालवून गालास आंतून बाहेरून लेप करावा. आणि हेंच औषध पोटांत द्यावें. गाल बरे होतील.

घोडा कानानें बहिरा होतो त्यावर उपचार.

१. काळा आणि पांढरा अबलक या घोड्यास हा अजार होतो, तो कानांत मळ झाला ह्मणजे होतो. त्याची खूण नालबंदीचे वेळेस पुकारा करितो. त्यास—जव शेरभर व पारा शेराचा चौथा हिस्सा घेऊन कढवून, नंतर त्यांत कढविलेलें दूध घालावें. व थेंब थेंब प्रमाणें कानांत घालावें.

२. मध ऊन करावा, व नफाशाचें तेल घेऊन, त्यांत गरम दूध घालून कानांत घालावें.

३. तूप, व बदामाचें तेल, सारखें घेऊन त्यांत दूध घालून कानांत थेंब थेंब प्रमाणें घालावें.

४. गोडें तेल, व केशर तेलाचा आठवा हिसा घेऊन मिळवून गरम करून थेंब थेंब प्रमाणें कानांत घालावें.

५. अल्याचा अर्क घ्यावा, त्यांत गरम दूध घालावें आणि थेंब थेंब प्रमाणें कानांत घालावें.

६. कानांत पडदा होतो, पिंवळें पाणी जातें त्यावर उपाय. सुगंध तेल कानांत घालावें, ऊद कानांत घालावा व जवाचें पीठ सिरक्यांत शिजवून कानांत घालावें. ह्मणजे कानांतील मळ निघेल, नंतर देवदाराचा गोंद, व खजूर एकत्र करून सिजवावे. त्यांत तेल घालून कानावर लावावें.

७. कवडी जाळून तिची भुकटी कानांत घालून त्यावर लिंबाचा रस दिवसांतून दोन तीन वेळ टाकावा.

८. कानांत जखम होते त्यावरः—तेल गोडें व तेलाचे आठवे हिशाबरोबर केशर घेऊन कानांतील जखमेवर लावावें.

९. कर्णमूळ होतें त्यावर–जुनें तेल कानांत घालावें व उंटाची चर्बी आणि बदकाची चर्बी कानांत चोळावी. देवदाराचा गोंद, पांढरें मेण सारखें घेऊन शिजवून जैतूनचें तेल मिळवून कानांत घालावें. व मीठ बारीक करून किंवा पिण्याची दारू कानांत टाकावी.

१०. कानांत खुजली होते त्यावर–कायफळ, सिरका, व मध हें सर्व एकत्र करून लावावें.

११. गुग्गुळ, राई, व मीठ, सारखें घेऊन जैतूनचे तेलांत कढवावें आणि कानास लावावें.

१२. कानांत कांहीं खडा वगैरे जाऊन दर्द झालें तर–घोडा कान जमिनीकडे करितो ह्मणजे कान ताठ उभे रहात नाहींत त्यास–कापसाची वात घेऊन ती मनुष्याचे लाळींत भिजवून कानांत घालावी. नंतर जैतूनचें तेल घालावें.

१३. कानांत मांस वाढतें, आणि छेद बंद होतात, पिंवळें पाणी निघतें, त्यास पैन किंवा शिंगाडा ह्मणतात. कानांत मांस वाढतें तें कांपून काढावें. नंतर नवसागर जैतूनचे तेलांत उगाळून लावावा. व उंटाचे दांत शिरक्यांत उगाळून लावावे.

घोड्याच्या नाकांतील रोगांविषयीं.

१. पहिला प्रकार, नाकांतून रक्त जाणेंबद्दल—रक्त जास्त झालें किंवा मार फार बसला तर नाकांतून रक्त जातें. त्यावर उपायः—जायफळ, मायफळ, फटकी, व दाळिंबाचें फूल एकत्र करून नाकांत घालावें. फार रक्त झालें तर कागद जाळून राख करावी, व काळे मिरे, मुरदाडशिंग, फटकी, अफू, कापूर, दाळिंबाचें फूल, आणि माजूम, हें सर्व सारखें घेऊन शिरक्यांत घालून नाकांत घालावें. कानांतून व तोंडांतून रक्त गेलें तर पित्त झालें असें समजावें. किंवा, गरमीमुळें त्याचें शरीर तप्त होतें व दाणा वगैरे खात नाहीं; लघ्वीवाटे रक्त गेलें तर घोडा थंड पाण्यानें धुवावा. पापडखार व लाल मिरच्या सहा टांक प्रमाणें घेऊन, बारीक करून मधांत मिळवून, तें औषध कांहीं दिवस खाण्यास द्यावें. नाकांतून व लघ्वीवाटे रक्त जाईल तर—मेंदीचीं पानें, बाभळीचा डिंक, कितराचा डीक, पांढरे जिरे दोन टांक, व काथ पांढरा, हीं सर्व बारीक करूत त्यांत पाणी घालून रात्रभर ठेवावीं हें मिश्रण पाण्यासुद्धां दिवसांतून तीन वेळ पाजावें.

२. नाकांत मास वाढतें व घाण येते. तेणेंकरून घोडा दुबळा होतो, व तोंड उघडतो. त्यावर उपचार—मास कांपून टाकावें. त्यावर शिरका टाकावा, व जंगला भाजून बरोबर घेऊन बारीक करावा, व शिरक्यांत मिळवून त्यावर लावावा. मटर (वाटाणे), माजूम, व उडीद, बरोबर घेऊन दारूचे शिरक्यांत भिजवून त्यावर लावावे.

३. गांडवळ सावलींत सुकवावे. नंतर बारीक करून नाकांत टाकावे; जखम बरी होई पर्यंत दोन तीन दिवस असें करावें व नाकावर डाग द्यावा.

४. नाकांत मांस वाढतें, आणि छेद बंद होतात, पिवळें पाणी निघतें, त्यास पैन किंवा शिंगाडा ह्मणतात. नाकांत मांस वाढतें. तें कापून टाकावें. नंतर नवसागर, जैतूनचे तेलांत उगाळून, लावावें,

व उंटाचे दांत शिरक्यांत उगाळून लावावे. कास (खोकला) व अर्धशिशी झाली ह्मणजे नाकांतून पाणी येतें, त्याला घाण असते. घोड्यास ढास येते, ती सर्दीमुळें येते, डोळ्यांतून गू जातो. चौकचीं पानें व नवसागर, हळद, केशर बरोबर घेऊन बारीक करावें, व फुलांचे तेलांत नाकांत घालावें. कानाजवळचें व डोळ्याजवळचें रक्त काढावें. नंतर कानांत जैतूनचें तेल टाकावें.

६. प्रत्येक दिवशीं बाजरीचे पिठांत लहान घोड्यास २ बिबवे व मोठ्यास ४ बिबवे खाण्यास द्यावे.

७. अळें दोन पैसेभार, मध तोळाभर, लवंग एक तोळा, मिरे काळी एक तोळा, पिंपळपान एक तोळा, व आंबेहाळद छटाक हीं, एकत्र करून तीन गोळ्या कराव्या. एक सकाळीं, एक तिसरे प्रहरीं, व एक संध्याकाळीं अशा दिवसांतून तीन गोळ्या द्याव्या.

८. मध एक पैसाभार, छटाक अळें, मिरेकाळे, व लवंग, हें एकत्र करून चार पैसेभार खाण्यास द्यावें.

९. कायफळ एक तोळा, आंबेहाळद दोन तोळे, सुंठ दोन तोळे सैंधव एक तोळा, व अंजिराच्या मुळीचें तेल अतपाव हें सर्व बारीक करून डोक्यावर लेप करावा. कपाळ विस्तवानें शेकावें.

१०. पाणी पितांना नाकांत जळू गेली तर नाकांतून पाणी व रक्त जातें. तेव्हां नाकांत जैतूनचें तेल व तिळाचे तेलांत डिकेमाली मिश्र करून घालावी.

११. गेरू, व मुलतानी माती हीं दोन्ही बारीक करून, येरंडाच्या पानांत घालून, ती विस्तवाच्या उबाऱ्यांत भाजून त्यानें कपाळ व नाक शेकावें.

१२. घ्राणानुरोध (खरणीरोग) दोन्ही नाकपुड्यांतून वाफा निघतात, दुर्गंधी सुटते, नाकपुड्या ताणतो, पाणी पीत नाहीं, अगदीं कृश होतो, त्यास उपचार—सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडे, आवळ-

कठी, हाळद, मुस्ता, शिरस, अतिविष, देवदार, व पद्मकोष्ठ, हीं प्रत्येक दोन टांकप्रमाणें घेऊन चूर्ण करून गाईचे अच्छेर तुपांत ७ दिवस द्यावें. नंतर मध आणि गाईचें दूध एकत्र करून तीन दिवस नाकांत घालावें.

श्लेष्मा (पडसें).

घोड्याचें नाक व तोंड यांतून पाणी जातें, ताळू जळते, चारा खात नाहीं, अंगास घाम येतो, व डोळ्यांतून पाणी जातें त्यास उपचार–दालचिनी, देवदार, ओवा, व वावडिंग, हीं ४ टांक प्रमाणें घेऊन एकत्र पूड करावी. व गाईचें दूध ४ टांक घेऊन त्यांत ही पूड घालून पोटांत द्यावें.

२. सुंठ, मिरें, पिंपळी व शहाजिरें हे सर्व जिन्नस समभाग घेऊन गाईचे दुधांत वाटून शेरभर पाण्यांत कालवून घोड्यास चाटण द्यावें. व हें औषध घोड्याच्या नाकांत थोडेसें घालावें.

३. दालचिनी, देवदार, पद्मकोष्ठ, उंबराचें बीं, चंदन, भद्रमोथा, व वावडिंग हें सर्व समभाग घेऊन, गाईचें दूध तापवून त्यांत कालवून घोड्यास चाटण्यास द्यावें.

हलका खोकला.

खोकला फार दिवस सरदीपासून होतो, पौष्टिक फार खाण्यास द्यावें. पोटांत विकृति झाली तर जंत होतात, त्यावर जंताचें औषध द्यावें. रोअरिंग (घश्यांतून नाद निघतो,) श्वास लवकर सोडतो, घोरण्याचा आवाज शंभर कदमावर किंवा जवळ ऐकूं येतो. श्वास फार निघत नाहीं, परीक्षा केली तर दिसत नाहीं, आंतील बा पाणी लेली असावी. गळ्यास दोऱ्यानीं बांधून ठेविल्यापासून खो वाढतें. विकार होतो. लावावें,

नाकांत फोड येतात.

हा रोग सर्दीपासून होतो.

लक्षण—नाकपुड्या मोठ्या होतात; नाकांतून पाणी वाहतें; गुदमरल्यासारखें होतें; नाकपुड्या फार बंद झाल्या तर घोड्यास ढास लागून खोकला येतो.

इलाज—नाकांत जे गोळे असतील ते शस्त्रांनीं कापून काढावेत.

दुसरा प्रकार.

कपाळावर दुसरे घोड्याची लाथ लागल्यामुळें कपाळाचे हाडाला इजा होती; किंवा दातांला कीड लागल्यानें चेहऱ्याचीं हाडें नरम लागतात. आणि एका नाकपुडींतून चिकट पदार्थ गळूं लागतो.

इलाज—ज्या ठिकाणीं इजा आहे त्याचा शस्त्रवैद्याकडून फाड करावा, आणि क्लोराईड आफ झिंक याचा ताव द्यावा.

बालसम आफ कोपायबा अर्धा औंस, पौडर्डक्याथराईड चार ग्रेन आणि कबाबचिनी घालून गोळा करावा आणि दररोज द्यावा. यापासून लघवीला जर कांहीं इजा होईल तर तें बदल करून त्याबद्दल बेलाडोनाचा अर्क अर्धा औंस याचा डोस अर्धा ड्राम घेऊन वाइन गळासभर पाण्यांत मिसळून चारचार दिवसांनीं एकदां द्यावा.

सोंअर थ्रोट (गळा सुजतो.)

लहान शिंगराला हा आजार बहुतकरून होतो. हा रोग त्याजपासून अनियमित काम घेण्यापासून होतो. किंवा लहान शिंगरास

१२. प्रमाणें काम नियमितपेक्षां जास्त घेण्यानें अगर कांहीं दिवस
घतात, र बंद ठेविल्यानें अगर रानांत स्वतंत्र फिरल्यामुळें होतो.
अगदीं कृण—गळ्यांत चिकटा अगर थुंका जमतो. पातळ पदार्थ

गिळत नाहीं; भूक लागत नाहीं; आणि पातळ पदार्थ कांहीं गिळतो ते कांहीं नाकावाटे पडतो.

इलाज—गरम कपडे घालावेत. आणि त्याच्या तबेल्यांत त्यास न बांधितां मोकळें सोडावें. खाण्यास हिरवें गवत द्यावें व पातळ पदार्थ करून द्यावा, व गवताचा बिछाना असावा. जर घोड्यास लीद चांगली न होतां अवष्टंभ होईल तर सोल्युशन आफ् आलोज औंस ४ एसेन्स आफ् अनिशीड औंस अर्धा, व आच्छेर पाणी हें मिश्रण करून द्यावें. हें घशांतून न जाईल तर अर्धा औंस एक्सट्र्याक्ट आफ् बेलाडोना एक ग्यालन पाण्यामध्यें मिसळून पाजावा. हें पाजणें तें असें कीं, घोड्याचें डोकें वर करून अर्धी बाटली त्याच्या तोंडांत ओतावी आणि अर्धे मिनीटपर्यंत त्याचें डोकें तसेंच वर राहूं द्यावें नंतर खालीं करावें, याप्रमाणें सहा किंवा आठवेळ औषध दिवसांतून पाजावें. यानें कांहीं गुण नाहीं आला तर परमगमेट अंपोटाज अर्धा पिंट आणि पाणी एक ग्यालन मिसळून वर लिहिल्याप्रमाणें पाजावें. इतकें होऊन जर नीट न होईल तर क्लोराईड आफ् झिंक तीन ड्राम; एक्सट्र्याक्ट आफ् बेलाडोना अर्धा औंस, टिंचर आफ् क्याप्सीक दोन ड्राम; व एक ग्यालन पाणी मिश्रण करून पाजावें; या सर्वांचा जर निरुपयोग होईल तर त्याच्या गळ्यावर ब्लिस्टर मारावें.

खोकला.

खोकला हा रोग होण्याचें कारण, तबेल्यांत फार उष्ण असल्यानें किंवा तबेल्यांत कुजके दाणे ठेविल्यानें किंवा गवत ठेविल्यानें किंवा कुजका बिछाना घातल्यानें, किंवा अनियमित त्याजपासून काम घेतल्यानें होतो.

इलाज—दाणा भरडून द्यावा. गवत ओलसर (हिरवें) द्यावें;

जवसाचा चहा किंवा कण्हेरी पिण्यास द्यावी, अंगावर उष्ण कपडे ठेवावेत; एक्सट्र्याक्ट आफ् बेलाडोना एक ड्राम अच्छेर पाण्यामध्यें मिसळावा; टिन्चर आफ् क्लोरस दहा औंस; व टिंनचर आफ् इपिकाक्यूना आठ औंस, हें एकत्र करून पाण्याचें एक टंबेरलभर, याप्रमाणें दिवसांतून तीनवेळ दररोज द्यावें. यांत गुण नाहीं आला तर बार्बडोज अर्धा औंस, किंवा अर्धा औंस डामर, क्यालोमल पांच ग्रेन आणि जवस गोळा होण्यापुरतें घालून गोळा करावा आणि तो गोळा सकाळीं एक व संध्याकाळीं एक देत जावा, यापासूनही गुण नाहीं आला तर पावडरी येलोज एक ड्राम, बालसम आफ् कोपेबा तीन ड्राम, क्याथराईड तीन ग्रेन, हे जिन्नस भुसामध्यें कालवून सकाळीं खाण्यास द्यावें, हंगामीं कापलेलें गवत घोड्यास खावयास देणें.

शिंगरास (ढास).

१–शिंगरास कोरडी ढास लागते यामुळें शिगरूं कृश होतें त्यास उपाय—आडुळसा, व भारंगीच्या पाल्याचारस पाणी घालून काढावा. आणि शिंगराचे नाकांत नस्य घालावें. याप्रमाणें एक सप्तकपर्यंत करावें. अथवा पावशेरप्रमाणें सात दिवस खाण्यास द्यावें.

२–घोडा चारा खातो परंतु खातानां घश्यांत आडकतो. यामुळें त्यास खोकला येऊन ढास लागते, त्यास उपाय–आल्याचा रस, गाईचें दूध तापवून थंड झालेलें व सुंठ समभाग घेऊन वस्त्रगाळ करावी. ही पूड रस व दूध यांत कालवून नाकांत नस्य घालावें. नस्याच्या योगानें गळा मोकळा होऊन चारा चांगला गिळला जाईल. तीन दिवस करावें.

३–ढासीस दुसरें औषध—सापाची कात २ तोळे गाईचे लोण्यांत कालवून तीन दिवस पोटांत द्यावी.

लारिंग झायटीज (श्वासोच्छ्वासाच्या नळीस सूज येते).

हा रोग तबेला घाणेरा ठेवल्यापासून किंवा सर्दीपासून होतो.

लक्षणें—सुस्ती येते, हवेची नळी मोठी होते, मान ताठते, श्वासोच्छ्वास फार घाईनें टाकतो, नाडी थोडी जलद चालते, नाकाचे पडदे लाल होतात.

इलाज—टिंनचर आफ् आकोनाईट एक ड्राम, वाईन गलासभर पाणी यांत मिसळून प्रत्येक अर्ध्या आवरानें डोस द्यावा, ह्मणजे नाडी बेतावर येईल. एक तऱ्हेची पिशवी आहे ती नाकाला घालावी, त्यापासून नाकाच्या श्वासोच्छ्वासांत सुधारणा होईल. मानेला ब्यांडेज करावा (गरम कपडा बांधावा) व पुढें लिहिलेलें औषध दिवसांतून तीन वेळ द्यावें: इन्फ्युशन आफ् क्लि, दोन औंस; इन्फ्युशन आफ् इपिकाक्युना दोन औंस; इन्फ्युशन आफ् आकोनाईट अर्धा औंस; एक्सट्रॅाक्ट आफ् बेलाडोना एक ड्राम; हे सर्व पदार्थ एक पिंटभर ऊन पाण्यांत चांगले मिश्रण करून वर लिहिल्याप्रमाणें तीन वेळ द्यावे. घोड्याचा बिछाना गवताचा जाड (भरपूर) करावा, घोड्यास चांगले हवेंत ठेवावें. गरम कपडे घालावेत, पायाला ब्यांडेज (गरम पट्टा) बांधावा. खाणें पातळ कण्हेरीसारखें करून द्यावें, चांगलें खाऊं लागला ह्मणजे दाणा नरम करून द्यावा; सुधारणा चांगली झाली ह्मणजे घशाला पोत द्यावें आणि ब्लिस्टर मारावें.

रोअरिंग, ब्लोइंग, ग्रंटिंग, आणि ब्रोकन वुईन्ड.

हे रोग होण्याचें कारण जेव्हां घोडा चांगल्या स्थितींत नसतो (दुबळा असतो) तेव्हां पुष्कळ काम घेतल्यानें, अथवा नेहमीं लगाम ठांसून धरल्यानें, किंवा खाणें घालून लगेच काम घेतल्यानें उत्पन्न होतो.

लक्षण—ह्या रोगाचीं लक्षणें बहुतकरून मनुष्याच्या दमाच्या

रोगाच्या भावनेप्रमाणें होतात; गळा वाजतो; श्वासोश्वास जलद चालतात. अशीं या रोगाचीं लक्षणें होतात.

इलाज—पौडर नायटर एक औंस, क्यांफर दोन ड्राम, टार्टराईज्ड अंटिमनी दोन ड्राम, किंवा पौडर अनिसीडस्, आणि क्यारेसीडस् प्रत्येक एक औंस, डोअर्स पौडर दोन ड्राम, बाल्सम ऑफ् सल्फर दोन औंस; येणेंप्रमाणें औषधांपैकीं बाल्सम ऑफ् सल्फर बारीक करून कोंबडीच्या अंड्यांतील बलकांत घोटावा. नंतर त्यांत वर लिहिलेलीं औषधें मिळवावींत. हें औषध ऊन कण्हेरी करून त्यांत द्यावें, व त्यांत थोडी काकवी दोन चमचे मिळवावी. रोज किंवा एक दिवसा आड रात्रीस तीन वेळ द्यावें. औषध दिल्यावर घोड्यास उष्ण भुसा द्यावा.

चोकिंग.

हा रोग गळ्यांत एखादी वस्तु हवेच्या नळींत किंवा खाण्याचे नळींत आडकून उत्पन्न होतो.

लक्षण—हवेच्या नळींत कांहीं आडकलें असेल तर डोकें वर करितो, नाकांतून चिकट पाणी पडतें, डोळे सुजतात, चेहरा बदलतो, श्वासोश्वासांत आवाज होतो, मानेचे स्नायु आंखडतात, पुढचे पायांनीं लाथा मारितो, मागचे पाय झाडितो, खाण्याचे नळींत कांहीं आडकलें असेल तर घशाखालीं कांहीं उतरत नाहीं, नाकावाटे पाणी जातें; व नाकांतून चिकट पदार्थ निघतो, क्वचित् वेळीं श्वासांत आवाज होतो.

इलाज—जर प्यारिंगजेम ह्मणजे हवेच्या नळींत कांहीं गेलें असेल तर हात घालून काढून टाकावें, किंवा तेल अतपाव दरएक तासानीं पिण्यास द्यावें, जर गुलेट ह्मणजे खालच्या नळींत गेलें असेल तर तेल पिण्यास देऊन हात फिरवावा, जर तेल उतरलें नाहीं तर प्रोब्रे-

न नांवाचें हत्यार घाळावें, जर हत्यार घालून तेल उतरलें नाहीं तर क्लोरोफार्म पिण्यास द्यावें, यानेंही न उतरेल तर मोठी एखादी वस्तु आडकली आहे असें समजून चिरून वस्तु काढावी. जर छातींत असेल तर तेल पिण्यास द्यावें किंवा प्रोब्रेन हत्यार घाळावें, वस्तु खालीं गेली तर बरें, नाहींतर घोडा मरतो.

इलाज दुसरा—सल्फरीक आसीड दोन औंस, लाडनोम् दोन औंस व पाणी अर्धा पिंट हें एकत्र करून तेऊ पाजल्यानंतर अर्धे तासानीं द्यावें. या रोगास इंग्रजींत चोकिंग ह्मणतात. हा रोग गळ्यावर दाब बसल्यापासूनही होतो.

शेंबा म्हणजे पडसें, बळगम आणि कफ यांवर उपचार.

१–सुंठ शेरभर, तूप चार शेर आणि चार शेर बकरीचें दूध हें एके ठिकाणीं करून विस्तवावर कढवावें. निमें राहिलें ह्मणजे, उतरून निवाल्यावर अर्धा शेरप्रमाणें दर रोज सकाळीं द्यावें.

२–अच्छेर आलें, विड्यांचीं पानें २०० दोनशें, पिंपळमूळ व पिंपळपान प्रत्येक आतपावप्रमाणें व बचनाग छटाक, गुगुळ छटाक, व पावशेर मध घेऊन त्यांत वर लिहिलेले जिन्नस बारीक करून घालावे. आणि त्यांत हरभऱ्याचें भाजलेलें पीठ घालून त्याच्या १४ चौदा गोळ्या कराव्या. आणि दररोज एक एक गोळी सकाळीं, व संध्याकाळीं द्यावी.

३–रूईचें फूल, आजवान पावशेर, पीठ पावशेर, गुगुळ अतपाव, लसूण पावशेर, गुळ पावशेर जुना, काळेमिरें पावशेर, हिंग ४ चार तोळे, राई पावशेर, वेळूचें फूल पावशेर, हें बारीक करूनएकत्र करावें. पिण्याचे दारूंत किंवा शिरक्यांत कढवून सकाळीं एक गोळा लिंबायेवढा बाजरीचे पिठांत घाल्यास चारावा. ७ सात दिवस पर्यंत.

---

४. पिंपळी अच्छेर व मिरे पावशेर, ह्या दोन जिनसा एकंदर कुटून पूड करून गुळांत घालून गोळ्या अजमासें लहान लिंबासारख्या कराव्या व दररोज एकप्रमाणें द्यावी.

५. हरभेर दोन टांक, छटाक हळद, व मेथ्या अतपाव, येणेंप्रमाणें जिनसा रात्रौ मनुष्याचे लघवींत भिजत घालून लागलीच दुसरे दिवशीं सकाळीं वाटून गोळे करून दररोज तितके सर्व चारावे, असें एकसारखें १४ चौदा दिवसपर्यंत चालवावें, ह्मणजे थोडी बरी होईल. लघवी खेरीज दुसऱ्यांत वाटूंनये.

६. रिंगणी बोंडें आणून भाजावीं, थोडीसी वाटून बारीक पूड करावी. व शेळीचें दूध छटाक—दुधांत पूड मिळवून घोड्याचे नाकांत दोन्ही नाकपुड्यांत ओतावी. परंतु हें औषध घोड्यास फारच सरदी असेल तर करावें.

७.सेंबा अथवा पडसें (जुकाम) हें झालें असतां घोड्याचे नाकांतून पाणी गळूं लागतें. त्यास उपचार–पिकलेलें डोरलें आणून त्याचा रस काढावा. हा रस व तिळाचें तेल एकत्र करून नाकांत घालावें. व सुंठ गूळ एकत्र करून पोटांत द्यावें.

८. गूळ, ओवा, वेखंड, सुंठ, व हाळद, हीं प्रत्येक अर्धशेर आणि मिरे व गूळ पावशेर घेऊन निरनिराळीं कुटून एकत्र गुळांत करून १४ गोळे करावे. दररोज एक गोळा द्यावा.

९. अजमोदा छटाक, गूळ पावशेर, मटकीचें पीठ दोन पैसेभार, व भांग दोन तोळे, हीं सर्व एकत्र करून तिळाचे तेलांत मिळवून ती गोळी दोनपैसेभार प्रीतिदिवशीं सकाळीं एक व संध्याकाळीं एक याप्रमाणें तीन दिवसपर्यंत द्यावी.

१०. कायफळ, लवंगा, नकसीमणीचीं पानें, रिंगणीचीं बोंडें ४ व तंबाखू हीं बारीक करून नाकांत घालावें.

११. गुग्गुळ सहापैसेभार, वांगें १ कोरून त्यांत घालावा, आणि

त्यास कणकेचा लेप करून, नंतर भाजावें. भाजल्यावर पिठांत चारावें. याप्रमाणें करून चार दिवस एक तास मालीस करावें.

१२. अजवान पावशेर, साबूण पावशेर, सज्जीखार पावशेर, काळे बिबवे पावशेर, खजूर पावशेर, गूळ पावशेर, सुंठ पावशेर, लसूण पावशेर, व गुग्गुळ पावशेर, हे एकत्र करून पिण्याचे दारूंत मिळवून गोळे करून संध्याकाळीं एक गोळा पावशेर वजनाचा देत जावा. सात दिवसपर्यंत करावें.

१३. म्हशीचें शेण तिच्याच मुतांत कालवून, खापरांत ऊनकरून ऊनऊन असतां मस्तक व तोंड शेकावें.

१४. गळ्यास किंवा गळ्याखालीं गांठी आल्यास त्यास सेंबा ह्मणतात. शस्त्रांनीं गांठी कापाव्या, किंवा गांठीस डाग द्यावा. राई पावशेर, हरभऱ्याचें पीठ भाजलेलें अतपाव, बचनाग पावशेर, व लसूण छटाक, हें सर्व बारीक करून बकरीचे दुधांत भाकर करावी. ती भाकर एक अंगानें भाजावी, दुसरे अंगानें भाजूंनये. सदर्हूप्रमाणें भाकर करून तीच तीन दिवस द्यावी.

१५. सिंगाडा—नाका तोंडांतून पिंवळें पाणी पडतें, पाण्याचा फार सोस पडतो, गळा घरघर वाजतो, गळ्याखालीं गांठी येतात, गळा बंद होतो, आणि घांस खातांखातां तोंडांतून टाकतो, अशीं लक्षणें होतात. त्यास उपाय—शेराच्या किंवा चौधारी निवडुंगाच्या कांड्या (देंठ) आणून त्या तापवून त्यांणीं गळा शेकावा. आणि त्याचे रसाचा गळ्यास लेप करावा. अमर सरसून (राई) ॥॥१, हळद ॥॥१, लसूण॥॥१, शेवग्याचे मुळीची साल॥॥, व सेंधेलोण॥॥१ हे सर्व समभाग घेऊन निर्गुडीचे रसांत वाटून खापरांत घालून ऊन करावें. व ह्याचा लेप घोड्याचे गळ्यास करावा. दुसरे दिवशीं धुऊन टाकावें. वर पुन्हा लेप करावा. असें चार दिवस करावें. व टाकळीचा पाला ॥॥, लसूण ॥॥, ओंवा ॥॥, सुंठ ॥॥, पिंपळमूळ

अगर पिंपळी ०००९, व वेखंड ०००९ हे सर्व समभाग घेऊन पूड करून तुपांत कालवून घोड्याला चारावे. सप्तकपर्यंत द्यावें. जर गळ्यांतील गांठी आंतून फुटतील तर साध्य व बाहेरून फुटतील तर असाध्य लक्षण समजावें.

१६. पिण्याची दारू १ शेर व बाजरीचें पीठ १ शेर हें एकत्र करून त्याच्या १४ गोळ्या कराव्या. आणि सकाळीं १ व संध्याकाळीं एक याप्रमाणें दररोज द्यावी.

१७. बाम–पाण्यांत असते; तिचीं पानें नरमूत्रांत भिजवून गरम करून शेकावें. आणि थंड झाल्यावर तेथें बांधावें.

सेंब्याविषयीं.

गेरू अदपाव, लसूण अदपाव, लालमिरची अदपाव, भिलावे छटाक, अंबेहळद अदपाव, गूळ सात वर्षांचा जुना अदपाव, अक्कलकारा छटाक, सुंठ अदपाव हें सर्व बारीक करून पिण्याचे दारूंत कालवून छटाकाचा एकेक गोळा करून तो सायंकाळीं एक गोळा द्यावा.

शेंदे मीठ दोन तोळे, व हरभऱ्याचें पीठ पावशेर एकत्र करून पाण्यांत भाकर करण्यासारखें कालवून तव्यावर त्याची भाकर भाजावी. याप्रमाणें दररोज एक भाकर चार दिवसपर्यंत देत जावी. दररोज पाणी पाजण्याचें त एकवेळ पाण्यांत ओंवा टाकून तापवून पाजीत जावें.

हुब्बक.

हुब्बक ह्मणजे हनवटीखालीं किंवा गळ्याखालीं गांठी होतात त्याजवर—गाईचें शेण त्यांत मीठ व सफेत जिरें घालून तें शेण तव्यावर किंवा खापरांत ऊन करून गांठीवर बांधावें आणि गांठी पि-

कल्यावर शस्त्रानें फोडून त्यांतील पू निचरूं द्यावा. नंतर औषध द्यावयाचें तें: सफेत जिरें, तांबड्या मिरच्या, बचनाग व गंधांची पानें हे सर्व जिन्नस सारखे वजनानें घेऊन शिरक्यामध्यें गोळी करून द्यावे.

खेंचराची लीद गरम करून गांठींवर बांधावी..

बकरीचें दूध पावशेर त्यांत रिंगणीचीं दोन फळें बारीक करून त्याची भुकटी दुधांत घालावी. आणि तें दूध घोड्याचे नाकांत घालावें व त्या घोड्यावर बसून लागलेच पुष्कळ फिरवावें ह्मणजे नाकांतून सर्दी निघून जाईल. हें औषध हुब्बक व रेंवा याजवर आहे.

सुंठ वस्त्रगाळ, कित्रा गोंद म्हणजे डिंक, काडेचिराईत, इन्द्रावणीचें बीं, रिंगणीचीं पानें, व लसूण, यांपैकीं लसूण अच्छेर घेऊन बाकीचे जिन्नस प्रत्येक सम (सारखे) वजन घेऊन शिरका घालून मडक्यांत हे सर्व जिन्नस शिजवावे. थंड झाल्यावर घोडयास चारावे. त्याचें प्रमाण मोठे घोडयास पावशेर, व लहान घोडयास अदपाव याप्रमाणें सात दिवस द्यावें.

इंद्रजव, वावडिंग, बच, रुईचीं पानें, बेलाची साल, कबुतराची विष्ठा वाळलेली, नऊटांक नरमूत्रांत घालून कढवावें. घोडयास मालीस करून हुब्बक झाला असेल त्या ठिकाणीं बांधावें. हें चार दिवसपर्यंत करावें.

निळे रंगाचा कपडा घेऊन त्याचा कांकडा करून जाळावा व त्याचा धूर नाकांत द्यावा.

फटकी तोळे दोन, सुहागी तोळे दोन, काळीं मिरीं तोळे दोन, व मांस तोळे दोन बारीक करून त्याची गोळी करावी व ती प्रत्येक गोळी पांच तोळे वजनाची करावी. आणि सकाळीं एक गोळी देत जावी म्हणजे तीन चार दिवसांत रोग दूर होईल.

जैतूनचें झाड आहे त्याचें फळ, गुग्गुळ, व म्हशीचें शेण

एकत्र करून गरम करून शिजवणें; तें तव्यावर किंवा खापरावर शिजवावें आणि हुब्बक झाला असेल त्या ठिकाणावर तीन दिवसपर्यंत बांधावें.

कस्तुरी मासे दोन, कायफळ मासे दोन, व तमाखू मासे तीन हें एकत्र करून बारीक करावें आणि ती पूड घोडयाचे नाकांत तपकिरी सारखी घालावी.

शिंगाडा.

शिंगाडा, शेंबा, व हुब्बक, हे तिन्ही रोग सर्दीपासून आहेत. आणि हे एकसारखेच आहेत प्रथम शेंबा होतो तो बरा न झाला तों हुब्बक होतो व तिसऱ्यानें शिंगाडा होतो. त्यावर औषधः—

शेरभर दारू पिण्याची, पीठ हरभऱ्यांचें दोन शेर त्यांत घालून चवदा गोळे बांधावे. संध्याकाळीं एक गोळी द्यावी ह्मणजे शिंगाडा जाईल. हें औषध चौदा दिवसपर्यंत द्यावें.

भिलाव्याचे तेलांत काळे हरभरे भाजून दोन तोळेप्रमाणें दररोज दाण्यांत देत जावे.

बकरीचें किंवा ह्मशीचें दूध दोन पैसेभार तापवून त्यांत रिंगणीचीं चार फळें बारीक कुटून त्या दुधांत मिळवून घोड्याचे नाकांत घालावें.

गाईचें दूध पावशेर, व मेण पावशेर गरम करून एकत्र मिळवून घोड्यास पाजावें. सदर्हू औषध याप्रमाणें सात दिवस द्यावें. हें औषध शिंगाड्यावर आहे.

रिंगणीचें झाड पान फळ फुल मूळसुद्धां बारीक करून सुकवावें. खाण्याचें मीठ पैसाभार, हिंग तोळा एक, अजवान अद्दपाव, लसूण अद्दपाव, व काळीं मिरें अदपाव हीं सर्व बारीक करून बाजरीचे पिठांत घोड्यास तीन दिवस द्यावें.

भिलावे दोन तीन घेऊन बारीक तुकडे करावे आणि बाजरीचे

पिठांत सात दिवस द्यावे: हें औषध दाणा रोजचा असेल तो दिल्यानंतर द्यावें.

सागमाठ पाण्यांत गरम करून शिंगाड्यावर बांधावा.

शेवग्याचीं पानें तुपांत ऊन करून शिंगाड्यावर बांधावीं.

कुचला अदपाव व चिकणमाती नरमूत्रांत गरम करून शिंगाड्यावर लेप करावा.

बकरीचें दूध नऊ टांक व लवंगा चार बारीक करून दुधांत मिळवून घोड्याचे नाकांत घालावें.

राई छटाक, लसूण कांदा एक, अजवान अर्धा पैसाभार, व कोंकणी मीठ अर्धा पैसाभार, हें बाजरीचे पिठांत घोड्यास खाण्यास द्यावें.

शिंगाड्याच्या गांठी शस्त्रानें कांपून त्यांत कावाडिंग व स्पंज जाळून त्याची राख जखमेंत भरावी.

मानेवर दर्द होतें, मान ताठते व फोड येतात त्याजवर उपचार.

१.—बेटकुळी घेऊन दर्दावर बांधावी, असें पांच ५ दिवस करावें. आणि डिकेमाळी ८८८५ पांच टांक व रानांतील सरडा हे तेलांत घालून तें तेल कढवावें आणि त्याचा लेप दर्दावर करावा.

गंडमाळा (कलिकस).

घोड्याच्या गळ्याखालीं कानामागें दोन्हीकडे सूज येते व गांठी येतात आणि फुटतात. व त्यांतून लस वाहूं लागते. त्यास उपचार—सोनपडवळींचें मूळ, व कडू रानदोडकीचीं मुळें, हीं समभाग घेऊन चूर्ण करून तिळाचे तेलांत भिजवून पाताळ यंत्रांत घालून त्याचें तेल काढावें. हें तेल गंडमालेस लावावें.

जवखार, सज्जीखार, लोणाखार, नवसागर, व सोरमीठ, हे जिन्नस आणावे. प्रथम त्या गाठींवरचे केंस काढून त्यावर कळीच्या चुन्याचा

लेप करावा चोळून आणि दुसरे दिवशीं चोळून गांठ मऊ करावी. त्यावर वर सांगितलेलें औषध वाटून लिंबाचे रसांत कालवून गांठीवर लावावें. तीन दिवसांत गांठ बरी होईल.

फटकी दोन पैसेभार भाजलेली, अदपाव मीठ, गूळ जुना अदपाव, व कांद्याचा रस अदपाव हें सर्व एके ठिकाणीं करून, गंडमालेवर लेप करावा. आणि थोडें ठोकावें. याप्रमाणें तीन दिवस लेप करावा. चौथे दिवशीं लेप धुऊन टाकावा.

घोडा दुबळा होऊन हनवटीखालीं किंवा गळ्याखालीं गांठी होतात. त्याला गुतुद म्हणतात. त्याजवर औषधें—गांठी शस्त्रानें चिराव्या. त्यांतून कांहीं रक्त जाऊं द्यावें. नंतर माजू व डाळिंबाचे फळाची साल बारीक करून जखमेंत भरावी म्हणजे रक्त बंद होईल. नंतर मेण व जंगला सारखे वजन करून द्यावे. आणि शिजवून जैतुनचे तेलांत जखमेस लावावें.

माहाडूक झाडाचीं पानें व मीठ एक ठिकाणीं बारीक वाटून दरदावर बांधावें. तें दोनतीन दिवसपर्यंत सोडूं नये. तितक्यांत बरें न झाल्यास पुन्हा एकवेळ तसेंच करावें.

ब्रॉंकाइटिज.

हा रोग नळींत इनफ्लमेशन म्हणजे गरम सूज आल्यानें किंवा इपिझोटिक किंवा इनफ्लूंझा म्हणजे एकास रोग झाला असतां त्यापासून दुसऱ्यास होतो. ही दर्द फार वाईट आहे. ह्या अजाराचा तीन दिवस फार जोर असतो. सात दिवसांत बरा होईल. बरा न झाल्यास घोडा मरून जाईल. व बारा दिवसपर्यंत तसाच अजारी राहिल्यास चांगला निरोगी होईल.

कारण. एकापासून दुसऱ्यास होतो व दुसरा आजार झाला असल्यास त्यापासून, अशा ह्या दोन कारणांनीं हा रोग उत्पन्न होतो.

लक्षणें:—ताप येतो. पल्स ह्मणजे नाडी कडक लहान किंवा तारे सारखी होते. दम फार मुषकिलीनें येतो. श्वास पाहिला असतां गार हवेसारखा येईल. तोंड व नाक ह्यांचे पडदे लाल होतात. पूं वाहील. दाणा व चारा खात नाहीं. त्रास फार होईल. डोकें खालीं ठेवीत जाईल. जुलाब झाला तर म्युकस मेमरन हा पडदा वंद होतो.

इलाजः—चांगले हवाशीर तबेल्यांत आजार सुरू असतां ठेवावा. ब्लस्टर मारावें. फोमेन्टेशन ह्मणजे गरम पाण्यानें शेकावें. ऊबदार झूल घालावी. गरम ब्यांडेज बांधावें. जुलाब जर होत नसेल तर नायट्रिक ईथर दोन औंस व दोन ड्राम अलोंज मिळवून पाण्यांत द्यावें. जुलाब झाल्यास टिंकचर ओपियम एक औंस व नायट्रिक इथर दीड औंस पाणीं घालून द्यावें किंवा सेडेटिव्ह म्हणजे रक्त स्थिर वाहणारी आणि डायोरेटिक ह्मणजे मूत होणारी दवा द्यावी. नाहीं तर क्यालोमेल एक स्क्रुपल द्यावें. किंवा टिंकचर अकोनाइड द्यावें.

अखेर इलाज.—चांगला होईल किंवा मरून जाईल किंवा थिक् उइन्ड ह्मणजे म्यूकसमेमरन ह्मणजे पातळ पडदा करणारा जो पडदा तो मोठा होऊन हमेषा हरकत होईल.

अंजिराचें बीं, बकरीचें मूत, भिलावे, फटकी (तुरटी) काळा-खजूर, किंवा शिरका, ह्यांची गोळी करून द्यावी, किंवा, बेलफळाचा मगज व दहीं ह्या दोन्ही जिनसा मिळवून सकाळीं व संध्याकाळीं द्यावें.

खांद्यावर गंडमाळा होतात त्यास उपाय.

गंडमाळा नारिंगाएवढ्या होतात त्या कापून त्याजवर औषध

लावणें तें कडू वृंदावन, मरू (कोरफड), व अंजीर हीं तिन्हीं खलब-त्यांत खलून मलमासारखें झाल्यावर त्यावर लावावें.

हा रोग खेंचरास फार होतो. त्याचे तंग आवळतात व खांदे तुटतात ह्मणून गैरउपयोगी होतो व त्यावर ओझेंही फार लादतात. जखम झालेल्या ठिकाणचें पाणी काढावें; नंतर मलम लावावें तें.—

१ डुकराची चर्बी साफ करून त्यांत जैतुनाचें तीन चार वर्षांचें जुनें तेल मिळवावें; मग मुरदाडशिंग, व फटकी, सारखी घेऊन वस्त्रगाळ करून त्यांत मिळवावी व चुलीवर ठेवून खजुरीचे झाडाची हिरवी डहाळी घेऊन तिनें हालवावें. डाहळी सुकल्यास नवी डाहळी घ्यावी. औषध जमेपर्यंत हालवीत जावें. जमल्यावर जखमेवर चोळावें.

२ मेण, मुरदाडशिंग, गोंद सनावर (सुरू) झाडाचा, दूध सात तोळे, व जंगला सर्व औषधांचा चवथा हिस्सा घेऊन वस्त्रगाळ करून जैतुनाचे तेलांत कालवून चोळावें.

३ आळशी (जव), व मुरदाडशिंग हीं कुटून बारीक करावीं; दोहींस शिजवावें व शिजतांना हलवीत जावें. मलमासारखें झाल्यावर दर्दावर लावावें.

खांद्याचें हाड मागें पुढें होतें त्यास उपाय.

१ शेलगमचें तेल व आळशीचें तेल दोन्ही एकत्र करून जखमेवर सात दिवस लावावें नंतर जैतूनचें तेल चवदा दिवस लावावें. त्यानें बरें न झाल्यास चार गोल डाग द्यावे ते येणें प्रमाणें.

लजला ह्मणजे छातींतील व खांद्यावरील जखम त्यांजवर उपचार.

१ लजला खांद्यावर मारल्यानें किंवा दगड मारल्यानें अगर त्याजवर कांहीं वजन पडून जखम होते व लंगडतो व तेणें करून घोडा त्या जखमेवरचें कातडें सुकतें व चालवत नाहीं.

उपचार.—सलगमचें तेल आळशी किंवा गाईचें तूप जखमेवर चोळावें. कातडें सुकलें असल्यास तें चिरून मलई लावावी किंवा तेथील रक्त काढावें व त्याजवर तीन दिवस लावावें. तिळाचें तेल व शेंदूर किंवा शिरका केस येईपर्यंत लावावा.

खांद्याचें मांस कापलें किंवा नाळ पडली तर किंवा फार मार लागल्यानें किंवा ओझें फार घातलें तर, किंवा सक्त स्वारीपासून प्रथम कांहीं वेळानीं गंडमाळेसारखे फोड येतात. कडू इंद्रावण, व कोरफड दोन्हीं बराबर घेऊन शिरक्यांत घालावीं. वर्ते माजूम अदमासानें घालून लावावें.

१ गुडघी होते ती मागील पायांत दर्द होते. गुडघ्यावर दर्द न होतां तेथील मास नरम होतें. त्यावर फोड येतात त्यावर उपचार-गुग्गूळ तोळा एक, हिंग तोळा एक, सोमल एक तोळा, कुचला अर्धा तोळा, बोळ (यलव) किंवा कोरफड एक तोळा, व सोहागी एक तोळा हीं सर्व बारीक करून लिंबाचे रसांत कालवावीं. जेथें दर्द असेल तेथील केंस काढवून त्यावर लेप द्यावे, नंतर चार पदरी कपड्यावरून शेकावें, बरें होईल. ही दवा बरबला आजारावरही लावावी व शेकावें.

चिंचेच्या रसांत गुग्गूळ घालावा, नंतर मीठ टाकावें. कढवावें व दर्द असेल तेथें पांच रोज लेप करावा.

२ कोंबडीचे अंड्यांतील सफेद बलक व कळीचा चुना त्यांत पाणी नसावें, एरंड्याचें बी साल काढून पांढरे गोळे करावे. मध व शेंदूर हें सर्व चोळावें. त्याचा लेप घोड्यास करावा. थोडें थोडें शेकावें. याप्रमाणें तीन रोज करावें, बरें होईल.

३ मैदालकडी चार मासे, सोहागी चार मासे, लसूण अर्धा पैसा भार, गेरू तीन मासे, लिंबें २०, सर्व जिनसा लिंबाचे रसांत घालून खलाव्या, त्याचा लेप दर्दावर घालावा, थोडें थोडें शेकावें अनुभवीक आहे.

४ शेराच्या चिकाच्या डाहाळ्या मूठभर पिकल्या आणाव्या, त्यांत कांहीं मीठ घालावें. कपडछंद करून शिजवावें. मग मध्यम गरम

करून घोड्याचे गुढघ्यावर बांधावें. याप्रमाणें चार दिवस करावें. अनुभव आहे. गुढघ्यास पन्नास जळवा दोन रोज लावाव्या.

छातीचा दोन प्रकारचा दर्द.

१ खुलल व २ सरेसिना.

१ खुलल.—घोडा आंखडतो, छाती वर करीत नाहीं, छातींत दव खातो, छातींतून पिंवळें पाणी निघतें, मानेच्या शिरा आंखडतात.

ईलाज.—त्याला कापून कातडें काढावें. परंतु काळजा जवळचे शिरेस फार जपावें नाहीं तर घोडा मरेल. मग जखमेवर डाग द्यावा. डाग दिल्यावर तीन रोज औषध करवूं नये. नंतर सुरूच्या झाडाच्या चिकाचें तेल काढून व राळ दोन्ही मिळवून दर्दावर लेप करावा. डाग खालीं लिहिल्याप्रमाणें द्यावे.

शिनाबंद खांद्यावर होतो त्रास.

मेंडफळ दाणे १४ चौदा बारीक कुटून नरमूत्रांत भिजवून दंवांत रात्रभर ठेवावे. सकाळीं उडदाचें पीठ, व चण्याचें पीठ, सुमारानें घेऊन त्यांत घोड्यास खाण्यास तीन दिवस द्यावे. बरें होईल. वर लेप करावा. तेणेंकरून पाय लंगडणें व छातीचें दर्द दूर होईल.

उपचार—कोरफड, गेरू, व एरंडीचें तेल एकेजागीं करावें. छातीवर किंवा सांध्यावर चोळावें. लेप करावा. त्याची चाकरी पुष्कळ करावी. शेकावें. लेप सुकेपर्यंत तीन रोजपर्यंत करीत जावें. नंतर फोड होतात ते नरम होतील. अर्ध शेर किंवा पावशेर एरंड्यांचें बीं शिजवून तें लोण्याप्रमाणें वाटावें मग चवथा हिस्सा दहीं कपड्यांत घालून पाणी काढावें. दोन्ही एकत्र करून दर्दाचे ठिकाणीं लेप करावा. थोडें थोडें शेकावें, उन्हांत बांधावें, फोड कापावे, दुसरे तिसरे दिवसपर्यंत तसा क्रम ठेवावा. दहा दिवसांत चवथ्या-

वर केश येतील. १ मीठ खाण्याचें, बारीक करून अंजनासारखें करावें. व त्यांत लोणी टाकून दर्दावर चोळावें. चमडा (कातडें) निघाल्यास करावें. अनुभव आहे.

१ घोडा लंगडतो, छातींत दर्द होतें, त्यास खालीं लिहिलेला मसाला खाण्यास द्यावा.

अंबेहळद, गुग्गूळ, साबूण, गेरू, हलवन, भाजलेली फटकी, गूळ तीन वर्षांचा जुना एक शेर, भिळावें पावशेर, भाजल्या सुहागीचें तेल चार तोळे, जंगळा भाजून त्याची राख चार मासे, हें सर्व बारीक करून घोड्यास अगोदर पाणी पाजून नंतर ह्या औषधांचा पावशेराचा एकेक गोळा करून सकाळीं एक व संध्याकाळीं दाणा खाल्यावर एक याप्रमाणें तीन दिवस द्यावा व लेप करावा तो याप्रमाणें:— कोंबडीचीं अंडीं पंचवीस, लिंबें पंचवीस, कोरफड तोळे २ दोन, उडदाचा आटा (सहा बिलुनी) कुळथी तितकीच, एरंड्याचें तेल सहा (बिलुनी) गाईचें तूप सहा (बिलुनी) तिळाचें तेल सहा (बिलुनी) हळद सहा (बिलोनी) वाघाटी झाडाच्या पानांचा रस सहा (बिलुनी) व नरमूत्र दोन शेर कढवून सर्व जिनसा बारीक करून त्यांत मिळवाव्या. तीन चार मनुष्यांकडून घोड्यास मालीस करावें.

घोडा लंगडतो व छातींत दर्द होतें त्यावर उपाय.

काळ्या मिरच्या तोळे एकवीस २१, गुग्गूळ तोळे एकवीस २१ अंबेहळद एकवीस तोळे २१, व गूळ ३ वर्षांचा जुना, हीं सर्व बारीक करून गुळांत एकेक तोळ्याची गोळी करून सकाळीं दाण्याचे अगोदर एक गोळी द्यावी. अनुभव आहे.

१ एरंड्याचें तेल, कायफळ तोळे ४, गेरू तोळे ४, अफू तोळा १, वेखंड एक तोळा १, लसूण तोळे दोन. अळित्याची पोथी १

सर्व एरंड्याचे तेलांत मिळवून बाटलींत भरून ठेवावें. त्यापैकीं
न पैसेभार घेऊन घोड्याचे छातीवर मालीस करून पट्टी लावावी.
ऊ दिवस किंवा तीन दिवस लेप करावा. अनुभव आहे. १ वाघो-
ीचीं पानें आणून एक शेरभर रस काढावा. तूप छटाक, तिळाचें
ल छटाक,एरंडीचें तेल आतपाव.दहीं चक्का एक शेर,गेरू पावशेर,
हलवन छटाक, कोंबडीचीं अंडीं सात. अंबेहळद छटाक, मैदा लकडी
छटाक, जपाळाच्या बिया ३ तीन, हीं सर्व बारिक करून वाघेटीचे
रसांत दहीं व तूप मिळवून गंधाप्रमाणें करून छातीवर लेप करावा
परंतु त्यांपैकीं कांहींचें शेष घेऊन छातीवर दोन तासपर्यंत चोळावें.
नंतर लेप करावा. तो तीन दिवसपर्यंत रोज शेकीत जावें. तीन दि-
वस झाल्यावर नीळ बारीक करून छातीवर चोळावी. नंतर ऊन पा-
ण्यानें घोडा धुवावा. नंतर मसाला खाण्यास द्यावा. मसाला अगो-
दर करून ठेवावा.

अंबेहळद, साबूण, गुग्गूळ, बिबवे फटकी भाजलेली, गेरू,
सवागी, गूळ तीन वर्षांचा जुना. सर्व बारीक करून गूळ मिळवून
आतपाव सकाळीं पाणी पाजण्यापूर्वीं दोन रोज द्यावें किंवा सात
रोज द्यावें. अनुभव आहे.

बुराणोदीन सवदागर यांणीं औषध केलें असे.

१ दररोज फटकी छटाक, बदाम पांच बारीक करून घोड्यास देणें.
घोड्यास तूप पूर्वींच चारावें. नंतर फटकी व बदाम पांच दिवस द्यावें.
लेप करावा तो खालीं दिल्याप्रमाणें. अनुभविक आहे.

१ राई पावशेर बिलाव छटाक, साबण पावशेर, रक्त-
बोळ तोळे २ दोन, लसूण चार पैसेभार, वाघाटीचा रस व अंतर-
वेलाचा रस छटाक,पांढरी साखर अर्धशेर,व एरंडीचें बीं तिळाचे तेलांत
टाकून बारीक करावें.नंतर छातीवर मालीस करावें.नंतर लेप करावा.
शेक करावा.तो लेप सुका होईपर्यंत तीन दिवस करावा.अनुभव आहे.

१ हाळद अर्धशेर, हलवन पावशेर, साबूण पावशेर, हळद व हलवन बारीक करून साबूण सुरीनें कापून एकत्रकरून त्यापैकीं चार पैसेभार घेऊन तो गुळा बरोबर द्यावा.गूळ अर्धाशेर,हें औषध दाणा-देण्याचे अगोदर द्यावें. लेप करावा तो,गुळी, संभाळूचीं पानें, रुईचीं पानें,तरवडाची पानें,उडदाचें पीठ पावशेर,एलवा छटाक,मीठपावशेरव सेंदेमीठ पावशेर यांना ऊन करून लेप करावा. अनुभविक आहे.

१ साबूण पावशेर, फटकी पावशेर, एकशे एकवीस पानें ।वर्ड्यांची, अफू एक तोळा, गूळ तीनवर्षांचा पावशेर, सर्व बारीक करून तीन गोळ्या कराव्या. सकाळीं एकेक गोळी द्यावी. तीन दिवस ऊन पाण्यांत धुवावें. कपडा ठेवून ऊन पाण्यानें शेकावें. छातीवर तिळाचें तेल व गेरू याचें मालीस करावेंनंतर खाण्यास द्यावें अनुभविक आहे.

घोडा थकला व छातींत दर्द झाल्यास.

१ निळा तोता (जंगला) २ तोळे, कोरफड अर्धशेर, गाईचें तूप पावशेर, व निळाधुरी हे बारीक करून कोरफडीचे रसांत एकत्र करावें. व लेप करावा तो.

गव्हांचा आटा दोन शेर, व गूळ तीन वर्षांचा, हे सर्व निरनिराळे पाण्यांत कालवून शिरा करावा. नंतर तिन्हीं एकत्र करावीं. आणि त्यांनीं छातीवर मालीस करून लेप करावा. तीन दिवसपर्यंत लेप करावा नंतर ऊन पाण्यानीं धुवावें पाणी ऊन करते वेळीं त्यांत आलु झाडाचें लांकूड टाकावें व गरम पाणी करून त्यानें धुवावे. अनुभव आहे.

१ तिळाचें तेल, व तूप, एरंडीचें तेल. प्रत्येक सहा पैसेभार घेऊन मालीस करावें. दुसरे दिवशीं गूळ दोन पैसेभार. जेपाळ ५ पांचबिया तेलांतगंधासारखें छातीवर व खांद्यावर चोळावें.तिसरे दिवशीं गरम पाण्यानें धुवावें. नंतर हळद व तूप एकत्रकरून खांद्यावर व

छातीवर चोळावी नंतर थंड पाण्यानें तीन वेळ त्याच जागेस धुवावें. अनुभव आहे.

घोडा लंगडतो व छातींत दर्द होतें त्यावर उपचार.

१ राई पावशेर, पांढरी साखर पावशेर, एरंडीच्या बीचा मगज आतपाव, हें सर्व बारीक करून (उखळांत कुटून) साखर व राई एकत्र करून पाणी घालावें. तें दोन घटका मालीस करावें. नंतर एरंडीचा बारीक मगज त्यांत टाकून एक घटका मालीस करावें. ज्या पायांनीं घोडा लंगडतो त्या पायांसही मालीस करावें. मालीस करतांना औषधाचे दोन हिस्से करावे. एक हिस्सा लेप करावा. व विस्तवानें दोन घटका शेकावें. तीन दिवसपर्यंत करीत जावें व दुसरा हिस्सा मालीस करावा.

१ साबण आतपाव, भिलाव्याचें तेल दोन तोळे, दोन्ही एकत्र करून मालीस करावें. व त्याचाच लेप करावा. व विस्तवानें शेकावें दोन चार रोज असें करावें. अनुभव आहे. तीन रोज झाल्यावर मग घोड्यास धुवावें व खालीं लिहिलेला मसाला खाण्यास द्यावा.

१ हिंग एक तोळा, गुग्गूळ एक तोळा, लसूण छटाक, काळींमिरें अर्धा तोळा, हळद आतपाव, गूळ पावशेर; हें सर्व बारीक करून गुळांत मिळवून चार गोळ्या कराव्या. त्यापैकीं एक गोळी धुतल्यावर द्यावी. दुसरी रात्रीस, तिसरी सकाळीं दाण्याचें पूर्वीं, चवथी पुन्हा रात्रीं. घोड्यास धुतल्यावर गरम जागीं बांधावें व त्यावर झूल घालावी. अनुभव आहे.

१ अजवन पावशेर, सुंठ पावशेर, काळींमिरें पावशेर, साबण पावशेर, मायफळाची साल कच्ची पावशेर, गूळ पावशेर तीन वर्षांचा, साहागीचें बीं पावशेर, हीं सर्व बारीक करून गोळी आतपावाची करावी. सकाळीं आतपाव व रात्रीं (संध्याकाळीं) आतपाव.

याप्रमाणें सात दिवस पावशेर घोड्यास द्यावें. गोपाळदास मुंबईकर यांणीं अनुभव घेतला आहे.

छातीवर फोड होतात त्यावर किंवा कोणत्याही जागीं फोड झाल्यास उपाय.

वेखंड अतपाव, एलव छटाक, हिंग दोन तोळे, गुग्गूळ छटाक, कोळिंजन छटाक, पिंपळमूळ छटाक, चिराईत छटाक, वावाडिंगें छटाक, पळसपापडि छटाक, अजवान खुरासनी छटाक, सुंठ छटाक, कुटकी छटाक, काळींमिरें छटाक, मालकांगोणी छटाक, इंद्रजव छटाक, लवंग दोन तोळे, अकलकारा छटाक, असगंध छटाक, राई छटाक, मुरूडफळ छटाक, खाण्याचा अजवन छटाक, कुचला वीस, तेलिया सोहागी भाजलेली दोन तोळे, भिलावे वीस, जंगला भाजलेला तीन मासे, आल्याचे रसांत मिळवावें व निला तोता एकत्र करून ठेवावें. किरमाणी ओवा छटाक, काळींजिरें, छटाक अंबेहळद छटाक, जायफळ चार तोळे, समुद्रफेन छटाक, सज्जीखार छटाक, भाजलेला बदाम छटाक, ऊद तोळे चार, अजमोदा छटाक, बाळहिरडे दळ सोनामुखी मिळून अतपाव. बाहव्याची शेंग (अमलतासाची साल) तोळे चार, गेरू छटाक, नरकचूर छटाक, चोख तोळा एक, बांगडखार चार तोळे, जवखार चार तोळे, हिरडा बेहडादळ अतपाव, रिंगणी छटाक हे सर्व जिन्नस बारीक करून कच्चा पावशेर ह्मणजे सत्तावीस तोळे घेऊन दारूंत किंवा द्राक्षाचे शिरक्यांत गोळी बांधून घोड्यास सकाळीं एक द्यावी व संध्याकाळीं एक द्यावी. प्रत्येक गोळी पावशेर ह्मणजे सत्तावीस भार करावी. दाणा घोड्यास देवूं नये. एक कोन्यांत गरम जागेंत बांधावें. अंगावर झूल घालावी. सर्व रोग जातील. अनुभव आहे.

कूटकी सात तोळे, पिंपळमूळ सात तोळे, एक तोळा हिंग, बारीक करून

दारू पावशेर मिळवून घोड्यास द्यावी. तीन दिवस दोन वेळां द्यावी.
अजमोदा बाजरीचे पिठांत घोड्यास द्यावा. प्रथम सकाळीं एक अजमूद व संध्याकाळीं एक अजमूद याप्रमाणें द्यावी. अगोदर फोड कापून रक्त काढून टाकल्यानंतर सदहू औषध द्यावें.

१ हिंग तोळा एक, सोहागी भाजली तोळा एक, अफू तीन मासे सर्व एक ठिकाणीं करून चार गोळ्या कराव्या. एक सकाळीं व दुसरी संध्याकाळीं दोन दिवस द्यावीं.

१ हळद शेर १ एक, साबूण शेर १ एक, गुग्गुळ शेर १ एक, लसूण शेर एक, काळजिरें १ शेर एक, गूळ शेर १ एक, रुईचे झाडाचीं पानें पन्नास पिकलेलीं हीं सर्व बारीक करून गुळामध्यें ३ गोळ्या कराव्या व खाण्यास द्याव्या. अनुभव आहे.

२ साबूण अतपाव, गूळ जुना अतपाव, गुगूळ अतपाव, गुग्ळी अतपाव, फटकी भाजली अतपाव, अफू तोळे दोन, व सज्जीखार काळा टाक भाजला, हीं सर्व बारीक करून सावलींत सुकवावीं. पाण्यांत साबूण वगैरे मिळवून रुईचीं शंभर पानें तयार ठेवून लिंबाएवढी गोळी करावी. सकाळीं व संध्याकाळीं एक एक गोळी द्यावी. गरम पाणी पिण्यास एक वेळ द्यावें. अनुभव आहे.

३ अफू एक तोळा, हिंग दोन तोळे, सोहागी दोन तोळे, काळींमिरें एक शेर, पिंपळमूळ अतपाव, व गूळ जुना हीं सर्व बारीक करून गुळांत गोळ्या कराव्या. सकाळीं व संध्याकाळीं एकेक द्यावी. ऊन पाणी एक वेळ द्यावें. अनुभव आहे.

४ सज्जीखार अर्धाशेर, हळद अर्धाशेर, गेरू पावशेर, हीं सर्व बारीक करून सात गोळ्या, एक दिवशीं एक गोळी द्यावी. अनुभव आहे.

५ धत्तूर पिंवळा झाडा सुद्धां ध्यावा. बांगडखार एक तोळा बारीक करून धोतऱ्याचे पावशेर रसांत मिळवून घोड्यास पाजावा. अनुभव फार आहे.

६ सुंठ पावशेर, काळींमिरें पावशेर, पिंपळी व पिंपळमूळ पावशेर, माळकांगोणी छटाक, अक्कलकारा छटाक, नागोरी इसगंध,छटाक, लवंग छटाक, जेष्ठमध तीन तोळे, कायफळ छटाक,मध चांगली अर्धशेर, व विड्याचीं पानें एकशेंवीस हें सर्व बारीक एकत्र करावें.अतपाव दर वेळेस सकाळीं व संध्याकाळीं खाण्यास देणें.

७ भीठ खाण्याचें पावशेर, हळद पावशेर, व गुग्गुळ पावशेर हीं तिन्हीं बारीक करून एक गोळी करावी. आणि घोड्यास एकवेळ द्यावी. याप्रमाणें तीन दिवस करावें. अनुभव आहे.

८ जंगला एक तोळा, बारीक करून गव्हांच्या दोन भाकरींत शिजवून ह्मणजे भाजून घोड्यास खाण्यास द्यावा. एक दिवसपर्यंत.

९ वेखंड एक तोळा, हिंग एक तोळा, गुग्गुळ एक तोळा, आणि कानेफळ एक तोळा,थुवर (शेराच्या डिंगऱ्या)एक तोळा,खोबरें तोळा एक. सर्व बारीक करून जंगलीबोरा एवढ्या गोळ्या कराव्या. एक गोळी कांद्यांत ठेवून तो कांदा वर गव्हांचा आटा(पीठ) लावून विस्तवामध्यें भाजावा. आणि तो ऊन दुधांत घोड्यास सकाळीं चारावा.

घोड्यास गरमी झाली तर कापूर तोळे २, सोरा एक मासा,व सुंठ अतपाव हें बारीक करून पावशेर दह्यामध्यें मिळवून घोड्यास देणें.

छातीवर किंवा सर्व शरीरावर फोड येतात.

१ शरीर आंखडतें, दाणा घास खाववत नाहीं, वायूनें बिमार होतो, त्यास उपाय—सुंठ पावशेर, तांबड्या मिरच्या पावशेर, काळीं मिरें पावशेर, कुटकी पावशेर,सोहागीखडीया अतपाव,फटकी अतपाव भाजलेली, जायफळ अतपाव, लवंगा अतपाव, सज्जिखार अतपाव, अंबेहळद अतपाव, नरकचूरा अतपाव, माळकांगोणी अतपाव, लसूण एकशेर, गूळ जुना अर्धशेर, व विड्याचीं पिकलीं पानें एकशें पंचवीस. हीं सर्व बारीक करून दारूंत मिळवून मग विड्याचीं

पानें मिळवावीं. सकाळीं पावशेर व संध्याकाळीं छटाक गोळा द्यावा. एकवेळ गरमपाणी द्यावें. परंतु कमी द्यावें. पाणी न दिलें तर फारच उत्तम आहे.

१ ऊद उत्तम एक तोळा, बारिक करून दारूंत किंवा शिरक्यांत गोळ्या होण्यापुरता टाकावा. नंतर घोड्याच्या मांड्या चोळाव्या व त्यावर डागही द्यावे. ते डाग दोन किंवा चार द्यावे.

शूळाविषयीं.

शूळ २१ प्रकारचे आहेत. त्यांचीं नांवें व त्यांजवर उपचार खालीं लिहिल्याप्रमाणें.

पारकिडाशूळ.

हा शूळ असा समजावा कीं, पंधरा दिवस किंवा एक महिना पोटांत किडा होतो. त्यास उपाय—खसखसीचीं बोंडें, पळसाचें बीं, बाळओंवा, हें प्रत्येक ९ टांक घेऊन गुळांत कालवून ३ दिवस चारावें.

२–पळसबीज ०००९ व चोखावा०००९ हीं दोन्ही औषधें एकत्र करून चूर्ण करावें आणि गुळांत द्यावें.

३–हिंग ०००९, पळसबीज ०००९, वावडिंग ०००९, हीं औषधें एकत्र करून सौदनीचे पाण्यांत द्यावीं.

कोलंज.

१ आतड्यांत वायू बंद होतो. त्यामुळें पोटांत मुरडतें, लीद व मूत्र बंद होतें. त्यावर इलाज.

हिंगाची पूड करून पाणी घालून कढवावी. थोडी दारू टाकावी. व साबूण व खारीक घालावी. घोड्यास पाजावें.

दुसरा प्रकार.—घोड्याचें पोट फुगतें व गुडगुड होतें. हातपाय सुकतात. जमिनीवर पडल्यावर उठूं शकत नाहीं. सर्व शरीर कांपतें. त्यावर.-सुंठ बारीक करून डोळ्यांत घालावी. आणि सुंठ, पिंपळीं, गेरू, अजवान, व चित्रकसाल प्रत्येक तीन टांक द्यावें. कण्हेर झाडाचीं पानें सहापैसे भार, दगडी मीठ, सालन मीठ, काळें मीठ, काखांचे मीठ, व खाण्याचें मीट दोनदोन पैसेभार बारीक करून वस्त्रगाळ करावें. मग गुळाचे दारूंत एकत्र करावें. आणि घोड्यास द्यावें. किती द्यावें हें लिहिलें नाहीं. दारू एक शेर नंतर पाजावी. दारू न मिळाली तर दोन शेर शिरका द्यावा. अनुभव आहे.

तिसरा प्रकार.—मूत व लीद लवकर होत नाहीं, बहुतकरून बंद होतें, पोटांत आवाज होतो, घोडा बेहोष होतो व दुबळा होतो. बेंबीवर व पोटाखालीं डाग द्यावे. डागानें हुशार न झाल्यास मरेल.

उपचार.–नागरमोथ्याचीं मुळें,वावडिंग,गेरू,हिंग,सुंठ, पिंपळपानें, व पिंपळी,प्रत्येक चार पैसेभार घेऊन बारीक वस्त्रगाळ करून गुळाची दारू १ शेर घेऊन द्यावें. कांहीं दिवसांनीं बरें होईल. अनुभव आहे.

दुसरा उपचार.—मेथी पावशेर, कुटकी अतपाव, खारीक अतपाव बियांसुद्धां, मध पावशेर, कोष्टकोळिंजन दोन तोळे, इसबंद नागोरी एक तोळा, हिराहिंग एक तोळा, गुग्गुळ एक तोळा, हालवान एक तोळा, राई एक तोळा, सुंठ एक तोळा, मिरें काळीं एक तोळा, अजवान खुरासणी अतपाव, खाण्याचें अजवान अतपाव, प्रत्येक निराळें बारीक करून मध मिळवून चवदा गोळ्या कराव्या. दरदिवशीं दाणा दिल्यावर एक गोळी द्यावी. अनुभव आहे.

अतिसार—ह्मणजे घोड्याचें पोट नेहमीं मऊ असतें. त्यास उपाय—पांढरा वाळा, बेलजी हरभऱ्याची डाळ, धणे हें सर्व बरोबर घेऊन एकत्र करून मडक्यांत पाणी घालून शिजवावें. आणि दह्यामध्यें सात दिवस चारावें. उपशमन होईल.

२ हिरडे, जिरे, मेथ्या, नेर्ळीचे झाडाची साल, हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन दह्यांत कालवून चारावे.

३ बाळवेल, धायटी फूल, प्रत्येक १८ टांक घेऊन वाटून दह्यांत कालवून द्यावें.

पोटशूळास औषध.

तिंगडी ००॥०, सिलारस ६ टांक, चित्रकमूळ ९ टांक, बिंद्रावनाचा बिळ ००।०, व उडदाचें पीठ ००।० एकत्र करून रानबोराप्रमाणें गोळ्या कराव्या व गोळ्या सावलींत वाळवून लोटींत घालून ठेवाव्या. पोटशूळ जहाला तर दोन गोळ्या पोटांत द्याव्या ह्मणजे शूळ बरा होईल.

२–घोड्याचे पोटांत तिडका उठतात, ह्मणजे पोटांत दुखतें, त्या योगानें घोडा उठबस करितो, आणि पोट फुगतें, त्यास उपचार–तूप ९ टांक, व मिरपूड २॥। टांक, एकत्र करून पाजावें. ह्मणजे पोट दुखतांनां राहील.(२) येरंडमुळ्या शस्त्र न लावितां उपटाव्या, त्याची साल काढून दगडांनीं कुटून बाजरीचे पिठांत गोळा करून चारावा. (३) पिकलेलें वांगें, आगस्त्याची वाळलेली उसरी (शेंग), हिंग १ टांक, मीठ २॥ टांक, एकत्र करून चारावें.

चित्रकशूळ.

पाठ व कंबर वांकडी होते, तिरपा चालतो.त्यास उपचार–बेहडा, आवळा, वेखंड, लसूण, हिरडे, निर्गुडी, टाकळी हीं प्रत्येक पावशेर पावशेरप्रमाणें घेऊन, पाणी घालून त्याचा रस काढावा. आणि हा रस पाठीस चोळावा. दोन्ही थोबाडांचे व पाठीचें रक्त काढावें. आणि उन्हांत बांधावें. मग वेखंड, सुंठ, पिंपळमूळ, हीं प्रत्येक ९ टांक, घेऊन चूर्ण करून तुपाबरोबर ७ सात दिवस द्यावें.

मायाजवर्तशूळ.

घोडा दांडी फिरवितो,व जमिनिवर लोळतो, त्यास उपचार—भाजीचे मुळे आणून त्यांचा रस काढावा. त्यांत समुद्रफळ व गूळ कालवून चाटण द्यावें· तीन दिवसांत आराम पडेल.

अंजनशूळ.

घोडा जमिनीवर पडतो, डोळे मिटलेले ठेवितो, त्यास उपाय–भुईनिंब अर्धाशेर घेऊन त्याची पूड करून चिंचेच्या रसांत मिळवून तीन दिवस द्यावी.

वर्तशूळ.

घोडा जमिनीवर पडतो, मान लांब टाकतो, जमीन हुंगून बसतो, उभा राहतो, पुन्हा बसतो,अशीं लक्षणें असतात. त्यास उपाय—जुनी घोंगडी जाळून त्याची राख तूप व गूळ या बरोबर कालवून ३ दिवस द्यावी. शूळ बरा होईल.

पाणीशूळ.

घोड्यास पुष्कळ दामटून आणून लागलेंच पाणी पाजितात. त्या योगानें पाणीशूळ उत्पन्न होतो. त्यामुळें पोटांत गडगडतें, बसून फार वेळ राहतो. बसला म्हणजे पाय पसरतो. त्यास उपचार-सुंठ, मिरें, पिंपळी, लसूण, गजपिंपळी, वेखंड, सैंधव, हीं प्रत्येक नऊ नऊ टांक घेऊन, त्याचें चूर्ण करून गुळांत कालवून पोटांत द्यावें. (२) वरील औषधांत सांगितलेले सर्व जिन्नस घेऊन त्यांत बावाडिंगें व ओंवा घालून गाईचें तूप पाऊणशेर घेऊन एकत्र करून तीन दिवस पोटांत द्यावें.

नासावर्तशूळ.

घोडा नाकपुड्या ताणूं लागतो. उष्ण श्वासोच्छ्वास करितो, दोन्ही कुशींला हुका मारतो. व सर्व अंग वांकवितो. तेव्हां त्यास नासावर्तशूळ झाला असें समजावें. त्यास उपचार—पळसाचें बीं, किंवा बेलफळाचें बीं ९ टांक, शोपा ९ टांक, पिंपळी ९ टांक, अश्वगंध ९ टांक, बाळओंवा ९ टांक, हिंग ३ टांक, महाळुंगाचा रस ४ टांक, हीं सर्व औषधें एकत्र करून व त्यांत ९ टांक गूळ घालून १ शेर तुपांत मिळवून, ३ दिवस पोटांत द्यावें.

मूत्रावर्तशूळ.

मूत्र फार थोडें होतें किंवा अगदींच होत नाहीं, आपल्या भोंवतीं फिरतो, आणि वारंवार हुंगतो, कुशींत दुखूं लागतें, अशीं लक्षणें होतात त्यास उपचार,—पिंपळी, गजपिंपळी, भुईनिंबाची साल, आणि लसूण हीं प्रत्येक नऊ नऊ टांकप्रमाणें घेऊन, एकत्रकरून तुपाबरोबर द्यावीं. (२) तांबडी मिरची व गुळवेल हीं नऊ नऊ टांकप्रमाणें घेऊन, पूड करून १ शेर तुपांत तीन दिवस द्यावीं.

२—घोड्याचें मूत बंद होतें व तो जमिनीवर पडतो, दम टाकतो, उठतो, पुन्हा बसतो, त्यास उपचार.—मोहऱ्या व साबण वाटून घोड्याचे दांडीचे केंस घेऊन त्यावर चिरगुट गुंडाळून त्याची वात करावी. त्या वातीस सदरीं लिहिलेलें औषध लावून ती वात घोड्याचे शिस्नांत अगर घोडीचे योनींत घालावी. ह्मणजे बंद झालेलें मूत्र खुलें होईल.

क्षुधावर्तशूळ.

वारंवार हिंसतो, जमिनीवर पाय हाणतो, कुशी मारतो, त्यास क्षुधावर्त ह्मणतात. त्यास उपचार.—पांगाऱ्याची साल, पळसाचें बीं,

मीठ, डोरलीचें बीं, कडसराचें बीं, सैंधव हीं प्रत्येक ९ टांकप्रमाणें घेऊन, तिळाचे तेलाबरोबर द्यावीं. किंवा १ शेर तुपांत ३ दिवस द्यावीं.

वातोदरीशूळ.

घोडा वारंवार उठतो, बसतो, कुंथतो, ओठ व दांत जमिनीवर घट्टपणें टेंकतो व जोरानें दम टाकतो, त्यास उपचार.—वेखंड, कोष्ट, पाषाणभेद, तीन्ही नऊ नऊ टांक, व दाती मुळाचा रस ६ टांक, तर्वटाचें मूळ व सैंधव ९ टांक, हीं एकत्र करून कांजीबरोबर द्यावीं.

रक्तप्रमेहशूळ.

उराच्या शिरा काढल्या असतां जसें रक्त वाहतें, तसें रक्त घोड्याच्या नाकपुड्यांतून वांहातें. त्यास उपचार.—कांडळीच्या मुळीचा रस व गाईचें दूध अर्ध अर्ध शेर एकत्र करून अर्धे नाकांत घालावें व अर्धे पोटांत द्यावें. नंतर बोळ ९ टांक, तिळाचें तेल ९ टांक, घेऊन बोळाची पूड करावी, आणि दोन्ही एकत्र चारावीं.

कृमिशूळ.

हा शूळ झाला असतां नाभी उडते, दांतांनीं आपली बेंबी धरतो, लाळ गाळतो, त्यास उपचार.—सुंठ, मिरे, पिंपळी, ओवा, पळसाचें बीं, वेखंड, कोष्टकोळींजन हीं प्रत्येक नऊ नऊ टांक, निर्गुडी ०॥० गूळ ०॥० हें सर्व एकत्र वाटून, २॥ शेर गुळांत कालवून गोळा करून द्यावें.

स्नेहावर्तशूळ.

घोडा जमीनीवर पडून लोळतो, आणि हातपाय कांपवितों, पोट उडूं लागतें, तेव्हां त्यास स्नेहावर्त शूळ झाला असें समजावें.

त्यास उपचार.—लसूण, सैंधव, हिंगणमूळ, पळसाचें बीं, बालऔंवा, हीं प्रत्येक ९ टांक, गूळ पावशेर, दहीं अच्छेर, सर्व एकत्रकरून ३ दिवस पोटांत द्यावें. (२) हिंग ४ टांक, लसूण ९ टांक, गूळ पावशेर एकत्र करून ३ दिवस द्यावें.

बिंबावर्तशूळ.

वारंवार भूमी हुंगतो, जमिनीवर पडतो, पुन्हा उठतो, पुन्हा जमिनीवर पडतो, अशीं लक्षणें होतात. त्यास उपचार.—रगल्याची राख, हिंग ९ टांक, पळसाचें बीं ९ टांक, चेनीचें पाणी, सेरीचें पाणी (संवदणीचें पाणी) १ शेर घेऊन त्यांत देणें. ३ दिवसांत बरें होईल.

विभ्रमशूळ.

घोडा अगदीं निचेष्ट राहातो, किंवा वारंवार अंग टाकतो, घोड्यास ताप येतो, उभा राहतो, कांहीं खात नाहीं, पुन्हां पुन्हां उठतो; घोड्याचे अंगास तेल तूप समभाग घेऊन चोळावें. घोडा तीन दिवस उन्हांत बांधावा. आणि गूळ, ओंवा, सुंठ, हिरडे, हे प्रत्येक ९ टांक घेऊन चूर्ण करून, तुपांत कालवून पोटांत द्यावें. (२) गूळ १ शेर, हाळद ९ टांक, ओंवा ९ टांक, सुंठ ९ टांक, हिरडे ९ टांक, काळी टाकळी अर्धा शेर, पांढरी टाकळी अर्धा शेर निर्गुडीचा पाला ०॥ याप्रमाणें घेऊन १ शेर तुपांत कालवून तीन दिवस पोटांत द्यावें. (३)—गूळ, राई (मोहरी) हाळद, लसूण, ओंवा, सुंठ हीं प्रत्येक ६ टांक घेऊन कुटून तुपांत द्यावीं.

कासावर्तशूळ.

घोड्याचा गळा घर घर वाजतो व बरचेवर अंग टाकतो, त्यास उपचार-

पांगाऱ्याच्या मुळ्यांचा रस १ शेर, गोखरू मुळाचा रस१ शेर, गाईचें तापळेलें दूध १ शेर, सुंठ छटाक, व पिंपळी छटाक, एकत्र करून दर रोज दोन वेळ देत जावें. असें तीन दिवस करावें.

कुशावर्तशूळ (शुक्रावर्त).

घोड्याचे तोंडांतून पिवळें पाणी पडतें, अंगांतून घाम येतो व अंगांवरचे केश उभे राहतात, त्यास उपचार—अश्वगंधाची मुळी छटाक, पिंपळी, मिरें, सुंठ,व कोष्ठ प्रत्येक छटाक घेऊन एकत्र करून गाईचे दुधाशीं किंवा तुपाशीं ३ दिवस द्यावें.

गळग्रही शूळ.

नाकांतून आणि तोंडांतून पिवळें पाणी पडतें, पोटांत कांहीं वाजतें व अंग (गात्र) ताणतो, त्यास उपचार—खोडराची राख ३ टांक, संवदणीचें पाणी १ शेर, पळसाचें बीं ९ टांक व हिंग ४ टांक हीं एकत्र करून पोटांत द्यावीं. (२) दोन्ही कुशीच्या बाजूच्या चार व छातीच्या चार अशा शिरांचें रक्त काढावें; नंतर वेखंड १२ टांक व सुंठ छटाक, ह्याचें चूर्ण मदांत कालवून तीन दिवस द्यावें.

वायुशूळ.

पोट फुगून अवरोध होतो, कुंथतो, मूत्र बंद होतें, व जोरानें दमटाकतो, त्यास वायुशूळ ह्मणतात. त्यास उपचार—रामयाची साली ९ टांक, वेखंड ९ टांक, सुंठ९ टांक, दांतीचा रस पावशेर, हीं एकत्र करून गुळाबरोबर पोटांत द्यावीं. (२) पांगाऱ्याची साल, तरवटाची साल, वेखंड, सुंठ, हीं प्रत्येक ९ टांक, हिरडा ८ टांक, गूळ शेर १, तिळाचें तेल १शेर एकत्र करून तीन दिवस द्यावें.

रूक्षावर्त शूळ.

पुढल्या पायांनीं भूय खणतो, जमीन वारंवार हुंगतो, त्यास उपचार—सुंठ, मिरें, पिंपळी, वावडिंग, ओंवा, हीं प्रत्येक नऊ टांक, एकत्र करून गाईचें तूप ०॥- घेऊन त्यांत कालवून ३ दिवस पोटांत द्यावें.

रसावर्तशूळ.

घोडा आडवा पडतो, पोट गडगडतें, त्यास उपचार—उरावरील शिरांचें व मांड्यावरच्या शिरांचें तसेंच छातीवरच्या शिरांचें रक्त काढणें. मग ओंवा छटाक, हिरडे, जिरें, भुईतरवड, निंबाची साल, राळ, हीं प्रत्येक ९ टांक घेऊन एकत्र करून तुपांत किंवा १ शेर गुळांत कालवून तीन दिवस द्यावी.

खडशूळ.

पोट फुगतें, अंग टाकतो, अवरोध होतो, पोट मऊ असतें, लीद केली तर पायांवर पडते व आपल्या कुशी पहातो, अशीं लक्षणें होतात. त्यास उपाय—कांटेशेंवरीची साल,आणि दातीचा रस,तेलांत घालून द्यावा.हिंगण्याची साल,वावडिंगें व पांगाऱ्याची साल,हीं प्रत्येक १२ टांक, हिंग ९ टांक, व गूळ एक शेर एकत्र करून चारावें. त्यांत घोडा आपल्या कुशी पाहत नसेल तर उपाय करावा, पहात असल्यास असाध्य समजावें.

अजीर्ण शूळ.

अतिसार होतो, वरचेवर अंग टाकतो व पोट मऊ असतें त्यास उपचार—हिंग,सविचळ,वेखंड हीं प्रत्येक९टांक,आणि सुंठ, जायफळें हीं ६ टांक, एकत्र करून कांजीबरोबर द्यावीं. (२) वर सांगि-

तळेलीं औषधें घेऊन त्यांत पादेलोण, कचोरा, सैंधव नऊ नऊ टांक मिळून पोटांत द्यावें.

सर्व प्रकारचे शूळांस औषध.

सैंधव, सविचळ, गंधबीड, मीठ, सुंठ, मिरें, ओंवा, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकटी, दुर्लभा, कोष्ठ, वेखंड, वावडिंगें, भारंगी, हिंगणाची साल, पळसबीज, अस्कंद, रिंगणीमूळ, गुंजाच्या झाडाची साल, निर्गुडी, रानओंवा, हीं सर्व औषधें समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून, तूप किंवा गूळ अगर चिंचेचें बरबट ह्यांत कालवून दर रोज सकाळीं देत जावें. दोन सप्तकें दिलें असतां सर्व प्रकारचे शूळ जातील. (२) सैंधव, ओंवा, कोष्ठ, वावडिंगें, लसूण, जमालगोटा, डोरली, गंधानचा पाला, पत्री, शेवग्याची साल, चित्रकमूळ, हीं सर्व औषधें प्रत्येकीं छटाक, व सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, बेहडा, आवळकटी, भारंगी, कडुवृंदावन, सागरगोटा, सब्जाचा पाला, भुईतरवड, कडुनिंबाचा पाला, हीं प्रत्येक ३ टांक, आणि वेखंड ९ टांक, हीं सर्व औषधें कुटून एकत्र करून १ शेर गुळांत कालवून तीन दिवस द्यावीं. सर्व प्रकारचे शूळ जातील.

निदाकणी रोग.

घोड्याला तहान लागत नाहीं, झोंप येत नाहीं, खात नाहीं, व सर्व अंग अगदीं कृश होतें त्यास उपाय—हिरड्याचे झाडाची साल, चित्रक, डोरलीचीं मुळें, जिरें, वेखंड, भुईतरवड, भुईनिंब, सैंधव, मीठ, सोरमीठ, हळद, निर्गुडी, ओंवा, सुंठ, पिंपळमूळ, पिंपळी, काडेचिराईत व माका, हे सर्व जिन्नस समभाग घेऊन पूड करून गुळांत कालवून सात दिवस द्यावें.

वायाळ घोड्यास उपचार.

वातामुळें घोड्याच्यानें हालवत नाहीं, व चालतांना अंग हालत नाहीं. त्यास उपचार—गुग्गुळ पावशेर गूळ २९ शेर आणि हिरडे, बेहडे, आवळकटी, सुंठ, पिंपळी, इंद्रजव, पित्तपापडा, पिंपळमूळ, पळसाचें बीं, आंबेहाळद, चित्रक, पाहाडमूळ, हाळद, आजमोदा, भारंगी, कोष्ट, वेखंड, भद्रमोथा, बाफळी, कचोरा, सैंधव, कांच, संचळ, गंधबीड, मीठ, व अस्कंद, हीं सर्व प्रत्येकीं पावशेर प्रमाणें घेऊन एकत्र चूर्ण करावें. मग निर्गुडीचा व शेवग्याचा पाला, दोन दोन शेर किंवा त्यांची साल २ शेर घेऊन ती सर्व मडक्यांत घालून दादरा बांधावा. त्या मडक्यांत अगोदर एक शेर पाणी घालावें. आणि मडकें चुलीवर ठेवावें. सर्व पाणी अटलें ह्मणजे चुलीवरून काढून त्यांतील औषधें तूप अगर गूळ याजबरोबर पोटांत एक सप्तक द्यावें.

घोडा लढाईंत जाऊन थकून आला, अगर उन्हांत स्वारीस अथवा घोडे घोडे एकमेक झोंबी लागून शिणले तर त्या योगानें शोषलेला दिसेल. आणि त्या योगानें चरवत नाहीं व कांहीं खाववत नाहीं, स्तब्ध राहतो. त्यास उपचार—पिंपळी, सुंठ, देवदार, पद्मकोष्ठ, हिरडे, आवळकटी, डाळिंबाची साल, जेष्ठमध, जवखार, खजूर, व द्राक्ष, ह्या सर्वांचें चूर्ण चिंचेच्या बरबटांत कालवून, द्यावें. (२) वेखंड, ओंवा, शोपा, धणे, पांढरें जीरें, हळद, मेथ्या, भारंगीच्या मुळीची साल, शेवतीचीं फुलें,कडू पडवळ, भद्रमोथा,व एरंडमूळ, हें सर्व दोनशेरप्रमाणें घेऊन, गाडग्यांत चार शेर पाणी घालून त्यांत सर्व औषधें घालावीं. त्याचा काढा चतुर्थांश उरवावा. त्या काढ्यांत१ तोळा पिंपळीची पूड घालावी. तो काढा द्यावा. घोडा चार दिवसांत बरा होईल.

घोडा फार चरत नाहीं त्यास उपचार.

हिरडे, आजमोदा, ओवा, लसूण, वेखंड, वावडिंगें, हिंग हळद, भांग, सैंधव, हीं सम भाग घेऊन चूर्ण करावें. अर्धा शेरप्रमाणें रोज द्यावें. असें दोन सतकें करावें. असें केलें असतां घोडा चरूं लागेल. (२) जोंधळ्याचा घाटा, भांग, व मीठ, सर्व समभाग मिळवून दोन मुठीप्रमाणें घेऊन अच्छेर गुळांत कालवून द्यावें.

मंदाग्निशोष.

पाण्यावर मन नसतें, घोडा अगदीं कृश होतो, त्यास उपचार. हिरड्याची साल, चित्रक, डोरलीमूळ, जिरें, वेखंड, भुईनिंब, भुईतरवट, रिंगणीमूळ, सैंधव, संचळ, वावडिंग, हाळद, निर्गुडीचा पाला, ओंवा, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, किराईत, व माका हीं सर्व तीन टांकप्रमाणें घेऊन, चूर्ण करून गुळांत कालवून पोटांत द्यावें. एक सप्तकपर्यंत, दिलें असतां मंदाग्निशोष जाईल.

घोडें शिणलें असतां अंगाचें कातडें हालत नाहींसें होतें, अगदीं आवळून जातें त्यास उपचार.

प्रथम अंगास चोपड करावें. त्या चोपडीचा प्रकारः रुईचीं पानें, वारुळांतील तांबडी माती, साबणाची अर्धी वडी, हाळद, व आंबेहाळद, हीं प्रत्येक ९ टांक, व करंज्याचा पाला हीं औषधें कुटून हशीचे मूत्रांत शिजवून चिरगुटांचा अगर वाखाचा कुंचा घेऊन त्याणें वर चांगलें शेकावें, उन्हांत बांधावें, असें तीन दिवस करावें. चौथ्या दिवशीं पाण्यानें अंग धुवावें. मग संध्याकाळीं हाळद, मीठ, व गूळ हीं प्रत्येक ९ टांक, भांग २ टांक आणि अफू १ मासा, हें सर्व बाजरीचे पिठांत कालवून द्यावें. (२) चांगल्या रक्ताचें बकरें

मारावें व त्याचें रक्त पितळींत धरून तें घोड्याचे अंगास चोपडावें. ३ दिवस राहूं द्यावें, चौथे दिवशीं धुवावें.

डायाफ्रम.

डायाफ्रम या पडद्यांत स्पयाझम या नांवाचीं हरकत येते. हा रोग चांगले तयार असणारे घोड्यास फार काम घेतल्यानें होतो.

लक्षण.—पोटांतून आवाज फार जोरानें येतो,बहुतकरून लोक असें ह्मणतात कीं,जर त्यास ही इजा आहे तर कान लाऊन ऐकलें असतां दोन अवाज ऐकूं येतात. हा लवकर बरा होतो.

इलाज.—सलफ्यूरिक ईथर, टिंकचरओपियम हें द्यावें. उत्तम दाणा व पाणी द्यावें. पोटदुखीचे उपाय करावे.

हेपिटायटिज पहिला.

काळजांत गरम सूज येते, ह्यांचे भाग आहेत. पहिला आक्यूट (फार)व दुसरा क्रानिक (हलका) ह्याच्या योगानें काळजांत कोणतीही हरकत होत नाहीं. परंतु कामांत होते.

कारण.—खुराक जास्त झाल्यानें, मेहनत कमी झाल्यानें, पडदा (मेम्ब्रन) पिंवळा झाल्यानें डोळ्याचें तेज कमी होतें, खाणें खात नाहीं, लीद थोडी थोडी खराब व घाण येणारी होते, मूत्र थोडें व काळें, जर जास्तही इजा वाढली तर अकव्हीयस ह्यूमर (डोळ्यांत पाणी येणारा पहिला पडदा) यांत पिवळी वस्तु आड येते, नाडी फार जलद किंवा मंद वाहते,पुढून दबावल्यास भितो, किंवा उजवे पायानें लंगडतो व बेफाम होऊन पडतो,

इलाज.—जुगलरव्हेन ह्मणजे मानेच्या काळ्या रक्ताची शीर हिचें रक्त काढावें, राईचें प्लस्तर उजवे बाजूस मारावें, कडक जुलाब द्यावा, तो.—सल्फेट ऑफ म्यागनेशिया एक पाऊन्ड, नायट्रिक

इथर एक औंस, व पाणी दीड बाटली मिश्रण करून द्यावें. गरम झूल व गरम बांडीस बांधावें, किंवा चार चार तासांनीं नायट्रिक इथर एक औंस प्रमाणें एक दिवस द्यावें, रक्त काढावें, जुलाब द्यावे, इपिकाक्कायना दीड ड्राम द्यावा, हा न मिळेल तर मांदार झाडाच्या मुळीची बुकणी द्यावी, किंवा टर्किशबॉथ देऊन उबदार कोठडींत बांधुन अंगांतून घाम निघण्याची तजवीज करावी.

हेपिटायटीज, दुसरा.

क्रानिक (हलका) हा रोग फार प्रयासानें ओळखतां येतो.

लक्षण.—दाणा खात नाहीं, गवतच खातो, मेमरन (पडदा) पिंवळा, किंवा खराब होतो.

इलाज.—सल्फेट आफ् म्यागनेशिया सहा औंस व नायट्रिक इथर एक औंस द्यावें. जुलाब द्यावा. हिरवा घास किंवा, भुस्सा वगैरे द्यावा. इपिकाक्कायना दीड ड्राम गोळी तयार करून सकाळीं व संध्याकाळीं द्यावी, प्रकृत नीट झाली तर नायट्रिक स्युऱ्याटिक आसिड पुष्कळ पाणी मिळवून द्यावें. थोडी मेहनत घेत जावी. जुलाब दुधाचा किंवा तुपाचा द्यावा, संख्यासोंमल चार आणेभार सहा हप्तेपर्यंत व बचनाग एक रुपयाभार आठ दिवसपर्यंत द्यावा.

या रोगानें घोडा मरण्याचीं लक्षणें: लिव्हर(काळीजाचा) रंग खराब मातिसारखा होतो, किंवा तें कडक कातड्याप्रमाणें होतें, किंवा पिंवळे चट्टे पडतात, किंवा गांठी गांठी होतात. मनुष्यास हा रोग झाल्यास सूज येऊन पू होतो.

वायूविषयीं.

वायूचे प्रकार १६ आहेत, त्यांचीं लक्षणें व त्यांजवर उपचार खालीं लिहिल्याप्रमाणें.

वटकिलंक वायु.

हा असा होतो कीं, घोडयाचे छातीवर मोठ्या गांठी होतात; त्यास उपाय–निगुर्डीचा पाला, टाकळीचा पाला, वेळूचा पाला, शेवग्याची साल, ओंवा, लसूण, हे सर्व जिन्नस समभाग घेऊन तुपांत मिसळून घोडयास चारावे. मग अंकोल्याचा पाला, चिंचेचा पाला, व पांगाऱ्याचा पाला आणून गाडग्यांत पाणी घालून त्यांत हे सर्व पाले घालून शिजवावे. आणि ज्या ठिकाणीं गांठी असतील त्या ठिकाणीं ऊनऊन बांधावें. असें एक सप्तक केलें असतां वटकिलंकवायु बरा होतो.

मृगमुखदुःखवायु.

घोड्याचें सर्व तोंड सुजतें. त्यास उपाय–जवखार, मोहोरी, सिरसाचें बीं, सेंधेलोण,व हाळद,हे सर्व जिन्नस समभाग घेऊन वाटून चिंचेचे रसांत ऊन करून त्याचा घोड्याचे तोंडास लेप करावा. लेप करण्याचे पूर्वी घोड्याचे तोंडास तिळाचें तेल चोळावें. मग ओंवा, लसूण,व सुंठ हीं समभाग घेऊन गुळांत कालवून, पोटांत सात दिवस द्यावीं.

गोलवायु.

घोड्याचे सर्व अंगास गांठि येतात व त्या सर्व गांठींतून पिवळें पाणी वाहूं लागतें. त्यास उपाय–तिळाचें तेल व तूप गांठीवर चोळावें. नंतर निर्गुडीचा पाला पाण्यांत घालून पाणी तापवून त्यांनीं गांठी शेकाव्या. व लसूण, सुंठ, ओंवा, वेखंड, हे सर्व समभाग घेऊन गुळांत कालवून चारावे. असें एक सप्तक केलें असतां गोलवायु नाहींसा होईल.

सन्निपातवायु.

घोड्याचे पोटाखालीं सूज येते व पोटांत गडबडतें, घोडा कांहींच खात नाहीं, उभा राहून झोंप घेतो व कांपूं लागतो. त्यास उपचार-सुंठ, ओंवा, लसूण, हे सर्व समभाग घेऊन, गुळांत कालवून खाण्यास द्यावें. व तिळाचें तेल व तूप एक ठिकाणीं करून पोटाखालीं चोळावें. आणि वारुळाची माती व मीठ एकत्र करून पोटाखालीं लेप द्यावा. २ ओंवा, लसूण अच्छेर, हिंग ३ टांक, व निर्गुडी ९ टांक, हीं एकत्र करून तुपाबरोबर द्यावीं. हिंगाची पूड, हिंगाचा नस ओढण्यास द्यावा. ३ सैंधव, वावडिंग ४॥ टांक, सुंठ, पिंपळ-मूळ, ओंवा, हीं चार टांक, निर्गुडी, भारंगी ९ टांक, या सर्वांचे चूर्ण करून गुळाबरोबर ४ दिवस पोटांत द्यावें.

तळवायु.

घोडा भूमीवर पाय चांगला न ठेवितां भित भीत ठेवितो व पाया-खालीं तळाशीं मास वाढतें, त्यास तळवायु ह्मणतात. त्यास उपचार-मेण, ह्मशागुग्गुळ, राळ, भुईनिंब, काळेंजिरें, लाख, कांबिया शेंदूर, मिरें, व गूळ हीं समभाग घेऊन चूर्ण करून त्यांत तेल किंवा तूप सारखें मिसळून तळावर घांसावें. त्यावर लोखंड तापवून त्याचा वर शेक द्यावा. सात दिवसांत तळवायु जाईल.

अवयवहीनवायु.

हा वायु होण्याचा प्रकार—घोड्याची छाती सुजते व मान एकीकडे वाकडी होते व घोड्यास चालतां येत नाहीं. त्यास उपाय—दोन्ही पुढील पायांचें रक्त काढावें व वामि व परळीचा पाला (माक्याचा पाला) हे सर्व जिन्नस समभाग घेऊन गाडग्यांत पाणी घालून त्यांत शिजवावें. व त्या ऊन पाण्यानें शेकावें. आणि

आंतील उन्हून चोथा चिरगुटांत घालून त्याणें छाती शेकावी. ह्मणजे उबारा येईल. आणि सैंधव, सुंठ, हिंग सर्व सममाग घेऊन तुपांत कालवून घोड्यास ४ दिवस चारावें.

द्विपदवायु.

पुढील एक पाय व मागील एक पाय सुजतो. त्यास उपचार—निर्गुडीचा पाला ॥, टाकळीचा पाला ॥, सेगूरतीचा पाला॥, हे पाले घेऊन वाटून त्यांत मीठ अच्छेर घालावें. आणि खापरांत घालून ऊन करावें आणि पायावर त्याचा लेप करावा व चासणीचा शेक सात दिवस द्यावा आणि ओंवा १, व लसूण ९ हे घेऊन २४ तोळे गुळांत कालवून द्यावें. (२) निर्गुडी, टाकळी, शेवगा यांचा पाला अर्धा शेर वजनप्रमाणें घेऊन त्यांत अर्धा शेर मीठ घालावें. हें सर्व खापरांत घालून ऊन करावें. आणि उन्हून पायास चोळावें व विटेचा शेक द्यावा. नंतर सुंठ, पिंपळमूळ, लसूण, हीं प्रत्येक ९ टांक आणि ओंवा पावशेर, हीं एकत्र करून १॥ शेर गुळांत कालवून द्यावीं.

अद्भुतवायु.

घोडा मान वांकडी करितो, त्याच्यानें चालवत नाहीं, त्यास उपचार—उराच्या बेंबीच्या शिरांचें रक्त काढावें. त्याचप्रमाणें पायाच्या शिरांचें रक्त काढावें. ओंवा व पर्यळू (माका) हें एकत्र वाटून पाजावें. व हेंच औषध ऊन करून पायावर व उरावर लेप करावा. मग ओंवा शेपा अर्धा अर्धा शेर घेऊन, त्यांत सुंठ २ टांक, सैंधव १ टांक एकत्र करून तुपाबरोबर द्यावें.

वायुस्तंभ.

घोड्याच्या सर्व अंगावर मोठमोठ्या गांठी होतात, व घोडा दम बाहेर टाकतो, जांभई देऊन पुढील दोन्ही पायांनीं जमीन धरितो. त्यास उपाय–सुंठ, काळेंमिरें, पिंपळी, शेवग्याचे झाडाची साल, काडेचिराईत, लसूण, हिंग हे सर्व समभाग घेऊन तुपांत कालवून द्यावें. व परळाचा (माक्याचा) पाला, निर्गुडीचा पाला, टाकळीचा पाला, या तिन्हींचा रस काढून खापरांत ऊन करून दोन्ही पायास ४ दिवस लेप करावा.

चौरंगवायु.

चारी पाय सुजतात. त्यास उपचार—सुंठ, लसूण, राई, सैंधव, हीं लिंबाचे रसांत वाटून त्याचा लेप करावा. आणि पिंपळमूळ, सुंठ, चिराईत, हिंग, ओंवा, सैंधव, हीं प्रत्येक ९ टांकप्रमाणें घेऊन चूर्ण करून गुळाबरोबर द्यावें. वारुळाच्या आंतील माती, लसूण, मोहऱ्या, हीं सर्व समभाग घेऊन निर्गुडीचे रसांत वाटून त्याचा चारी पायांस लेप करावा. वीट तापवून शेक द्यावा. असें सात दिवस करावें. आणि टाकळीचा पाला, लसूण, ओंवा, हे सर्व जिन्नस बरोबर समभाग घेऊन तुपांत कालवून द्यावें. एक सप्तक दिलें असतां बरें होईल.

वेलिदोषवायु.

एक वृषण वर चढतो आणि मागला पाय लंगडतो आणि अंगावर गांठी उठतात व त्यांतून लस वाहते. त्या गांठीस वेली असें म्हणतात. ती वेली परीक्षा करण्याकरितां असें करावें कीं, केळीचा मोक हरभऱ्यायेवढा घेऊन व दाळिंबा सोमल जोंधळ्यायेवढा त्यांत घालून गांठ चिरून त्यांत हें औषध संध्याकाळीं घालावें. दुसरे दिवशीं गोळा निघाला तर

वेलिदोष खरा आहे ह्मणून समजावें. यास उपचार—दोन्ही नाक-पुड्या मध्यें चिरून अरीच्या योगानें शीर उचलावी. आणि त्यांत गोखरूची पूड व मीठ भरावें. डाहाणा (दांडा) तापवून डाग द्यावा. मग गूळ २ शेर, सवागी ९ टांक, एरंडाच्या डिच्या पावशेर, शेळी-चें मास दोन शेर, इतकें एकत्र शिजवून सात दिवस ह्याप्रमाणें द्यावें. (२) कडू पडवळ, चिंचोके, पिंपळमूळ, अजमोदा, वावडिंग, पापडा, गाजराचें बीं, भुईनिंब, वोवा, लसूण, सुंठ, शिरसाची साल, हे सर्व जिन्नस बरोबर घेऊन, तुपांत द्यावे. व तिळाचें तेल सर्व अंगास चोळावें. हिंगाची पूड करून नाकांत तपकिरीप्रमाणें ओढण्यास द्यावी लहान (पारोशा) पिंपळाची साल आंतून तांबडी असते ती आणून सेबळीचे (निर्गुडी) रसांत मीठ घालून त्यांत साल घालून भगरा ऊन करून अंडावर सात दिवस लेप करावा.

कंपवायु.

दोनी वृषण सुजतात, त्यास उपचार—सुंठ, व दुर्लभा हीं औषधें ९ टांक घेऊन व तितकीच शेवग्याची साल घालून, सर्वांचें चूर्ण करून तूप अथवा गूळ अगर तिळाचें तेल ह्यांत एक सप्तकपर्यंत पोटांत द्यावें. (२) डोरली, येरंडमूळ, उमराची साल, वेखंड, मुर्दाडशिंग, निर्गुडीचा पाला, हे सर्व समभाग जिन्नस तिळाचें तेल आणि तूप ह्यांत एकत्र करून पोटांत द्यावें. वृषण तेलानें चोळावें. निर्गुडी व पांगाऱ्याच्या पाल्याच्या रसाचा वृषणास लेप करावा व वर विटाचा शेक द्यावा.

उत्कर्णवायु.

डोळे वर चढवितो, चारी गात्रें ताणतो, मान ताठते, गळा ताठतो, दांतखिळी बसते, मागले व पुढले पाय लांब करितो. आणि हातपाय वळतात. अशीं लक्षणें होतात. यांत हातपाय वळत

नसल्यास साध्य, वळत असल्यास असाध्य असें लक्षण समजावें. या वायूला चढाव वायु असेंही ह्मणतात. आतां हा उत्पन्न होण्याचें कारण सांगतों. घोडा बांधले जागीं उभा असतां एकदम कुत्रा, उंदीर अगर मांजर वगैरे पाहून डचकतो त्या डचक्यासरसा हा उत्पन्न होतो. पाठीवर मोठी नाळ पडलेली असतां उत्पन्न होतो. किंवा पायास मद्रा फुटतो आणि तशांत स्वारीस नेला असतां त्यामध्यें पायास खडा लागून एकदम दचकतो. त्या योगानेंही उत्पन्न होतो. त्यास उपचार—शेवग्याचे मुळीची साल, निर्गुडीचा पाला, लसूण, हिंग, सैंधव, संचळ, वावडिंग, ओंवा, पिंपळमूळ, किराईत, पळसाचें बीं हीं सर्व औषधें प्रत्येकीं ९ टांक घेऊन चूर्ण करून त्यांत मद ९ टांक घालून तुपाबरोबर द्यावें. नंतर येरंड, धतूरा, टाकळी, आरणी, शेवगा, निर्गुडी, यांचा पाला आणून त्यांत हळद, कोष्ट, वेखंड, नागसैंधव याचें चूर्ण घालावें. आणि सर्वांचा काढा करून ऊनऊन अंगास चोळावा. वर विटेचा शेक द्यावा. एक सप्तकपर्यंत सूंठगूळ देत जावी. किंवा तिळाचें तेल सर्व अंगास चोळावें. पोटाखालीं विस्तव ठेवून शेक द्यावा. इतकेंही करून बरा न झाल्यास तोंडावर डाग द्यावा.

गिरपथा.

जर घोड्याच्या शिरा आंखडलेल्या असतील तर त्यास उपचार—तिळाचें तेल, व काळ्याधोत्र्याचा रस हे दोन्ही बराबर घेऊन एकत्र करून घोड्याचे सर्व अंगावर लेप करावा. व चांगला चोळावा. घोड्याला उन्हांत बांधावें. (२) टाकळीचा रस, व तिळाचें तेल, एकत्र करून नाकांत घालावें. त्याच दिवशीं संभाळीचा रस व तिळावणीचा रस, दोन्ही बराबर सुमारें दोन शेर घेऊन, घोड्याला चारावें. तीन दिवसपर्यंत नास ह्मणजे तपकिरीचे लेप

द्यावे. उपशमन आणील. (३) टाकणखार आणि लसूण एके ठिकाणीं कांडून बारीक कापडामध्यें पोतांडी बांधून ठेवावी. आणि कानावर चिरगुटें गुंडाळून तीन दिवसपर्यंत कान बांधून ठेवावे. नंतर सोडावे. चारी पायांच्या तळव्यांस डाग द्यावे. व ऊन पाणी तीन दिवस पाजावें ह्मणजे उपशमन पावेल.

एकांगवायु.

चारीपाय व पोट सुजतें, गळा ताठतो, त्यास उपचार—पहाड, तेवडा, अस्कंद, हिंग, सुंठ, गंधबीड, सैंधव, ओंवा, वावाडिंग, हिरडे, हीं प्रत्येक ६ टांक घेऊन चूर्ण करून गुळाबरोबर एक सप्तक द्यावें.

२ हिंग, गंधबीड, सैंधव, ओंवा, वावडिंगें, बेहड्याचें टरफल, अश्वगंध, लसूण, वेखंड, मीठ, सुंठ, हिरडा, हे सर्व जिन्नस समभाग घेऊन गुळाबरोबर खाण्यास द्यावें. तूप व तिळाचें तेल सर्व अंगास चोळावें. टाकळी, निर्गुडी, चिंच याचा पाला वाटून तेल किंवा तूप कढवून त्याचा अंगास लेप करावा. किंवा हे पाले कुटून त्या रसाचा चारी पायांस लेप करावा. एक सप्तकपर्यंत द्यावा.

घोड्याचे अंगावर पाऊस पडून घोडा भिजतो. आणि पायाखालींही चिखल असतो. त्या योगानें त्यास थंडी वाजते, स्तब्ध राहतो, व कृश होतो. त्यास उपाय–निर्गुडीचा पाला पाण्याशीं वाटून ४ शेर रस काढावा. त्यांत वारूळाची माती आणि ह्मशीचें शेण कालवून ऊन करून अंगास मर्दावा. घोड्यास उन्हांत बांधावा आणि येरंडाचा पाला अर्धाशेर पोटांत द्यावा.

त्रिकस्तंभवायु.

घोड्याचें मागलें अंग थरथरा कांपतें. त्यास शेवग्याच्या मुळाची साल, टाकळीचा पाला, निर्गुडीचा पाला, सुंठ, लसूण, चि-

राईत, पिंपळमूळ, पिंपळी, हिंग, हीं औषधें ९ टांकप्रमाणें घेऊन चूर्ण करून तुपाबरोबर सात दिवस द्यावें. हिंगाची पूड तपकिरी-प्रमाणें ओढण्यास द्यावी. तेल व तूप एकत्र करून चांगलें अंग मर्दन करावें. असें तीन दिवस करावें. वर विटेचा शेक द्यावा. व उन्हांत बांधावें. ह्मणजे त्रिकस्तंभवायु जाईल.

मनस्तंभवायु.

पुढचा पाय ताठतो, पायाचा पुठा सुजतो, मान ताठते, गळा ताणतो व घसा बंद होतो, त्यास उपचार—वेखंड, वावडिंग, पिंपळी, पिंपळमूळ, हिंग, शेवग्याचा पाला, ओंवा व पित्तपापडा, हीं प्रत्येकीं ९ टांकप्रमाणें घेऊन चूर्ण करून तुपाबरोबर सात दिवस द्यावें. आणि अंगास तिळाचें तेल चोळावें. सात दिवस उन्हांत बांधावें. आठवे दिवशीं पांगाऱ्याचा पाला पाण्यांत घालून पाणी तापवून तें पाणी घोड्याचे पाठीवर वस्त्राची घडी घालून त्यावर शेकत शेकत घालावें. असें तीन दिवस करावें. किंवा पांगाऱ्याचा पाला, निर्गुडीचा पाला व आडोळशाचा पाला,हे पाले गाडग्यांत घालून ऊन करून तें गाडगें घोड्याचे तोंडाजवळ नेऊन त्याचा वाफारा द्यावा.

तळवायु.

सहज भीत भीत पाय ठेवतो व तळहीन होतो.त्यास मेण,मस, गुग्गुळ, राळ, भुईनिंब, काळीजिरें, लाख, कांब्या शेंदूर ,मिरें व गूळ, हें एकत्र करून चूर्ण कीजे. मध्यें तूप व तेल मिळवावें.तळावर घासून मग वीठ तावून एक सतक शेक द्यावा. साध्य.

२ राळ पावशेर, मेण पावशेर, लाख पावशेर, कांबिया शेंदूर व बोळ तोळे ९ हें एकत्र चूर्ण करून त्याचे तीन भाग करावे. एकेक

भाग तेलांत कालवून तळावर लावावा. वर विटेचा शेक द्यावा. असें तीन दिवस करावें.

वेल ह्मणजे घोड्याच्या सर्व शिरा आंखडतात त्याजवर उपचार.

मोठें डोरलें, लहान डोरलें, वेहडा, गुळवेळ, निंबाची साल, आडुळसा, सुंठ, मिरें, पिंपळी, सेंदेलोण, हे सर्व जिन्नस एकएक तोळा ध्यावे. नंतर १॥ शेर मूग घेऊन ६ शेर पाण्यांत भिजत घालावे. त्यांत वरील जिन्नस घालावे. त्यांत पावशेर मध घालून कालवावें. त्याच्या २१ गोळ्या कराव्या. दररोज एक गोळी चारावी. नंतर मासे धुऊन पाणी पाजावें. बरें होई तोंपर्यंत निर्मळ पाणी पाजूं नये. (२) तिळाचें तेल, व काळे धोत्र्याचा रस एकत्र करून त्याचा घोड्याचे अंगास लेप करावा. खूप चोळावें व घोड्यास उन्हांत बांधावें (३) टाकळीचा रस आणि तिळाचें तेल एकत्र करून नाकांत नस्य द्यावें. व निर्गुडीच्या पाल्याचा रस, तिलवणीचे पाल्याचा रस २ शेर सुमार घेऊन घोड्याला चारावे. तीन दिवस नस्य द्यावें. (४) टाकणखार व लसूण एक ठिकाणीं कुटून बारीक कापडामध्यें पुरचुंडी करून घोड्याचे नाकांत ठेवावी. आणि वर चिरगूट गुंढाळून तीन दिवस नाक बांधून ठेवावें. नंतर सोडावें. आणि चारी तळव्यांस डाग द्यावे.

ग्लयांडर्स (सेंबा).

हा रोग फार करून पंजाब व नगर ह्या ठिकाणीं फार होतो. कारण, कित्येकांस तो जन्मापासूनच जडलेला असतो, कित्येकांस आईबापांपासून उद्भवतो, एकापासून दुसऱ्यास उत्पन्न होतो. हा रोग फार खराब आहे, बहुतकरून बरा होत नाहीं.

ह्याचे चार प्रकार आहेतः आक्यूट ह्मणजे एकदम उत्पन्न

होऊन फार बळावतो, सबआक्यूट ह्मणजे सावकाशीनें बळावत जातो, क्रानिक हा रोग फार मेहनतीनें समजतो, आणि इनसिडेशियस हा समजण्यांत येत नाहीं. लक्षण.—आक्यूटचें: एका नाकपुडींतून पाणी पडतें, तीन रोजांचे आंत तें पाणी पिंवळें होतो. ग्लचांड हे मांसाचे गोळे आहेत. हे सडून टणक होऊन चिकटून जातात, सेंबा रशीसारखा लटकून राहतो, परंतु ही इजा फारच बळावली असेल तर, पू चिकट होऊन नाकाचे आंत जमून बसल्यानें दम घेण्यास अडथळा होतो. नाकास खराब घाण येते. एकादे वेळेस सेंबा फुटून नासरू होतें. फारसींत बेल किंवा उंदरी ह्मणतात त्या रोगाप्रमाणें पाय सुजतात. नाकांतून काळसर पाणी येतें. नाकाचें हाड सडून पडतें, या लक्षणाचा घोडा मरतो.

लक्षण.—सबआक्यूटचें: प्रथम पाणी येतें, नंतर पू तारेसारखा होतो, नासरू होतें, ग्लचांड (मांसाचे गोळे) टणक होतात, तब्बेत चांगली राहत नाहीं, बेली रोगासारखीं लक्षणें होतात.

लक्षणें.—क्रानिकचीं: हा रोग समजून येत नाहीं, फक्त दोन्ही नाकपुड्यांतून चिकट पाणी निघतें.

लक्षणें.—इनसिडीशियसचीं दोन्ही किंवा एका नाकपुडींतून पाणी निघतें. ग्ळयांड (मांसाचे गोळे) सुजून चट्टे पडल्यासारखे दिसतात व कठीण होतात, किंवा चिकटत नाहींत, नाकाचे आंत बारीक चट्टे पडतात, रक्ताचे आंत विषारी वस्तु मिश्रण होऊन फुप्फुसाचे आंत गांठ होते.

इलाज—गोळी घालून मारावा, वाफ द्यावी, राई, काळेजिरें, सुंठ, गुग्गुळ, हिंग सफेद, मोरतोतिया, पिंपळीलेंडी, एक तोळा घेऊन गोळी करून द्यावी.

कच्चें धान्य खाल्यानें किंवा मठ खाल्यानें अजीर्ण होतें त्यावर.

अजमोदा, पिंपळी, व भांग हें चार चार टांक घ्यावें. दगडी मीठ नऊ टांक घ्यावें. सर्व बारीक वस्त्रगाळ करावें व घोड्यास एकदम द्यावें. कोद्रु खाल्यानें कफ व खोकला होतो. तेव्हां चाल सोडतो. व गरम शरीर होतें, बेशुद्ध होतो,केव्हां नीट असतो, बसतो, त्यावर इलाज.—कमळ (तळ्यांतील फूल) गरम करून घोड्याचे अंगास चोळावें. एक शेर दशमूळ, नऊ टांक दगडी मीठ, सहा टांक राई, व तिळाचें तेल अर्धाशेर हें सर्व एकदम घोड्यास पाजावें.जुलाब होईल. अनुभव आहे.

घोडा दुबळा होतो, मवत खातांना तोंडांतून पाणी फार जातें. चारा खाऊं शकत नाहीं. ढांसतो व त्याचे हातपाय बारीक होतात. त्यावर उपाय: शिरका जुना, व तिळाचें तेल दोन्ही सारखें वजन घ्यावें, जिरें एक भाग तिन्ही कढवून व तीन अंड्यांची सफेदी घालून पाजावें.

दुसरा इलाज—ताजें दूध, रेवाचिनी व एलवा ह्मणजे बोळ हें कढवून मऊ करावें व घोड्यास द्यावें. अनुभव आहे.

खिजान ह्मणजे शरीर वाळतें व केंस जातात, रात्रीस नाकांतून श्वास चालतो, त्यावर इलाज फार होत नाहीं. बकरीचा बच्च्या घ्यावा, त्याचे हातपाय बांधावे, मोठे भाड्यांत घालावें. त्यावर ज्वारीचा आटा व घास घालून कढवावें. तें असें कीं, त्याचे सांधे आपोआप गळून पडतील. मग त्याचा शिरका घोड्यास पाजावा. त्यावर गाईचें तूप दोन रत्तल रोज पाजावें. अनुभव आहे.

खिनानतीर ह्मणजे अंगावर फोड होतात, सांधे ढळतात, शरीरांतून पिंवळें पाणी निघतें. नाकांतून निळें पाणी निघतें, घाण येते, व माशी फार बसते, असा प्रकार कांहीं एक प्रकारची मुळी असते ती

खाल्यानें होतो. नाकाजवळच्या दोन शिरा असतात त्यांचें रक्त काढावें. नाकांत तेल घालावें. ते बदाम वगैरेंचें घालावें व डाग द्यावा. तीन दिवस घोड्यास सोडावें व बुरा अरमनी रक्त काढलेलें ठिकाणीं घालावी. वर लिहिल्याप्रमाणें बकरीचे बच्याचें पाणी करून एक रत्तल पाजावें, नाकांत बदामाचें तेल घालावें,कांहीं लोक कपाळावर डाग देतात. कानशिलावर व कांहीं टाळूवर डाग देतात व कोणी बेंबीवर डाग देतात.

काळजाजवळ बेमारी होते ती तीन प्रकारची आहे: पहिलें काळजांत दर्द होतें, दुसरें दिल सुकून जातो, आणि तिसरा खपलाल ह्मणजे मन हालणें (मन घाबरणें.)

पहिला प्रकार—घोडा आपले सुंभावर मारतो. जमीनीवर पडतो, फार पशिना (घाम) जातो. पहिल्यानें डावे फासल्यापासून घाम येतो, घोड्याचें शिश्न व अंड सुस्त होतात, लघवी थेंब थेंब होते व होतही नाहीं. त्यावर उपचार.

शिरा काढाव्या. तंगाचे जाग्यावरच्या शिरांचें रक्त काढावें. रेवाचिनी कित्राबरावर घेऊन बारीक करून साडेसात रति द्यावी व २६० दोनशेंसाठ रति वजन दुधांत पाजावी.

दुसरा इलाज—वेताच्या झाडाचें बीं, व साखर सफेद, बराबर घेऊन पाण्यांत घोडयास पाजावें. सात दिवस नाकांत केशर व गुलाबपाणी घालावें; गुलाबशिरका पाण्यांत मिळवून नाकांत घालावा. अनुभव आहे.

दुसरा प्रकार—काळीज सुकून जातें त्याची खूण अंगाचें कातडें सखत होतें, घोडा दुबळा होतो, घांस खाऊं शकत नाहीं व छातीवर फोड होतात.

तिसरा प्रकार—दिल घाबरतो, छाती उडते, कंप होतो; नाकांतून अवाज निघतो त्यास श्वास ह्मणतात.

कासनीचें पाणी साखर मिळवून पाजावें. नाकांत रेवाचिनी व वेताच्या झाडाचे पानाचा रस घालावा. तंगाजवळचें रक्त काढावें.

आंतडयांतील बेमारीवरचे दोन प्रकार.—

पहिला प्रकार—कराहा (ढांस).

दुसरा प्रकार—जिकूनपस (दम खालीं वर होतो).

पहिला प्रकार–घोडा ढांसतो. परंतु दाणा पाणी खाते पिते वेळेस फारच ढांसतो. खासीबराबर तोंडांतून कफ येतो. त्यावर इलाज.

जवाचा आटा बकरीचे दुधाबरोवर द्यावा. खडीसाखरेचें पाणी पाजावें. शिरका व मध नाकांत घालावा. मटार कढवून पाणी पाजावें किंवा जवाचे आल्यांत बोराअरमणी द्यावी. फटकी व बोरा अरमणी सात दिवसपर्यंत पाजावी.

दुसरा प्रकार—दम होतो. ही फार वाईट बेमारी आहे.

घोडा लाच्यार होतो. व घोडयावर स्वारी केली ह्मणजे तोंडांतून पाणी निघतें. दम फार चढतो, घोडा घाबरतो, तोंडांतून थुंका व कफ निघतो, तो शेंबडाप्रमाणें निवतो. तंगापाशीं * याप्रमाणें डाग द्यावा. पोटावरही ह्याप्रमाणेंच डाग द्यावे. दवा देणें तोः

रुईच्या झाडाचें मूळ, इंद्रावणीचें मूळ, काळाबोळ, पिंपळी, पिंपळमूळ, पिंपळपान, सुंठ, मीठ, सोरा, अजवान, रिंगणीचें बीं, उटकटराचें बीं, चित्रक, धमासा, डाळिंबाचे फळाची साल, शहाजिरें, सातू, निळातोता (जंगला), बदाल, अजमोदा, जमालगोट्याची साल, लवंगा, हिरडे, बाळहिर्डे, कोळिंजन, रुईचीं पानें पिकलीं, रुईचे झाडाची साल, अकलकारा, व शेराचा चीक पावशेर, हे सर्व जिन्नस बारीक करून भांड्यांत घालून झांकून ठेवावे. त्यावर विस्तव ठेवावा. शिजल्यावर बारीक करावें. नऊ पैसेभार त्या पैकीं घेऊन व वेखंड नऊ पैसे भार घेऊन एकत्र करून सकाळीं चाळीस दिवसपर्यंत द्यावें, अनुभव आहे.

दम्याविषयीं.

दमा कफापासून होतो. फार मजल केल्यानें दम लागतो त्यावरून समजणें. दम छाटतां येत नाहीं. डोळे लाल होतात. शरीर गरम होतें. घाम फार येतो. नाकांतून पाणी जाऊं लागतें व दम छाटतां येत नाहीं. असें असेल तर बरा होण्यास मुष्कील आहे.

उपचार.—हिरडे, बाळहिरडे,व आमळा,सहा सहा पैसेभार घेऊन बारीक वस्त्रगाळ करून पावशेर तांदूळ व पावशेर साखर मिळवून घोंट्यास द्यावे.

इलाज दुसरा.—केळें, साखर, व मध, पावशेर प्रमाणानें घेऊन व नऊ पैसेभार तांबड्या मिरच्या आणि डाळिंबाचे दाणे नऊ पैसेभार एकत्र करून खाण्यास द्यावें.

इलाज ३ रा.—एक शेर खजूर, व बांबूचीं पानें नऊ पैसेभार एके ठिकाणीं करून खाण्यास द्यावें.

इलाज ४ था.—पित्तपापडा, नऊ पैसेभार, बांबूचीं हिरवीं, पानें नऊ पैसेभार, दूध व मध यांत विळवून खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

हरएक प्रकारचे रोगावर.—दमा, मिरगी, व कुरकुरी, वगैरेंवर साबणाची गोळी द्यावी. संख्या सोमल एक तोळा, उंबरवेलीचा रस एक शेर, तव्यावर सदर्हू रस घालून चुन्याचे कळी प्रमाणें सोमल शिजवावा.नंतर खाक झाल्यार दररोज एक मासा घोंट्यास द्यावा. गरमी फार झाली तर पावशेर तूप तीन दिवसपर्यंत द्यावें. गरमी न झाली तर तूप देऊंनये.

दुसरे कोणतेही प्रकारचे रोगावर ही उपयोगी व अनुभविक गोळी आहे. संख्या सोमल दोन तोळे, जायफळ तीन मासे, व जायपत्री, वेलची, लवंग तीन तीन मासे, घेऊन अदपाव लसुणांत खल करावा. गोळ्या रतीप्रमाणें कराव्या. दररोज एक गोळी द्यावी. रोग कसाही असल्यास दूर होईल. अनुभव आहे.

मनुष्यास शक्ति येण्यास पाहिजे तर त्यांत कस्तुरी तीन मासे वांटून रती एवढ्या गोळ्या कराव्या. त्यांतील एक घेऊन ती लसूण किंवा आलें किंवा विड्याचीं पानें यांत घालून द्यावी. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—कसेही प्रकारचे रोगावर हळदींचीं पानें, भिलावे चार तोळे,गुग्गुळ चार तोळे,सज्जिखार चार तोळे,एलवा बोळ४तोळे, खजूरबीसुद्धां चार,पुराणा गूळ अर्धशेर, लसूणबिया चार तोळे,पांढरा काथ चार तोळे,साबूण चार तोळे,व अकलकारा चार तोळे,हीं सर्व बारीक करून एकेक गोळी तोळ्याची करावी. दर दिवशीं एक गोळी सकाळीं व संध्याकाळीं गुळांत द्यावी. अनुभव आहे. यास काळी गोळी ह्मणतात.

तिसरा इलाज.—कोणतेही रोगावर. सुंठ, मिरच्या, चित्रकाची साल, हिरडे, बाळहिरडे, अमला, वावडिंग, धने, वेखंड, पिंपळपानें, कोरफडीची साल, हळद, धमासा, नागरमोथे,समली, गेरू , भारंगी, दांतवण, मालकांगोणी, चिराईत, चित्रकसाल, अजवान व आवळकठी, शिरस अजमोदा, काळेजिरें, सफेदजिरें, व पित्तपापडा. हे सर्व जिन्नस नऊ नऊ टांक घेऊन बारीक करावे. मोठे घोड्यास कांहीं कमी द्यावें. तेंच गाईचे मुतांत दिलें तर पडसें व खाशि, गरमी, दमा वगैरे बिमारी जाईल व घोडा मोठा होऊन शक्ति येईल. हेंच जर तुपांत दिलें तर कफ होईल.

चौथा इलाज.—जुलाब होण्यास. सुंठ, मिरच्या, वावडिंगें, चित्रकसाळ, चोक, बदाम, नागरमोथें, पिंपळपानें, मांजिष्ठ, हाळद, कलू, धमासा, वसा, नलूफर, गुग्गुळ, हें प्रत्येक छटांक घ्यावें. बारीक करून आठशेर पाण्यांत कढवावें. एक शेर राहिल्यावर वस्त्रगाळ करून घोड्यास द्यावें. दोन आठवडे याप्रमाणें करावें. अनुभव आहे.

पांचवा इलाज. कसेही प्रकारचे रोगावर–नसा, दमा, शिंगाडा, कुरकूरी, शूळ, सरदी, गरमी बदकसर, वगैरें वर सोमलाची गोळी सांगितली आहे ती द्यावी. संख्या सोमल एक तोळा. काळीमिरीं एकतोळा, काथ तीन तोळे, अलें (अद्रक) पावशेर त्याचा रस काढून मग मिरच्या बारीक कराव्या. व सोमलही बारीक करावा. दोन्हीं एकत्रकरून नंतर काथ व आल्याचा रस घालून खल करावा. दोन तास खल करून मग आल्याचा रस जिरला ह्मणजे हरभऱ्याएवढ्या गोळ्या कराव्या. आणि घोडयास रोटींत घालून गोळी द्यावी. सात दिवस याप्रमाणें द्यावें. अनुभव असे.

वरील गोळीपासून गरमी फार होईल तर तांदूळ अर्धशेर शिजवून दहीं एक शेर मिळवून खाण्यास द्यावें.

लिंबाचे झाडाच्या पानाचा रस कोरफडीचा रस, दोन्ही एकत्र करून खाण्यास द्यावें. गरमी निवेल. जर गरमी न होईल तर देऊंनये. कसेही प्रकारचे रोगावर मसाला.–दमा, चांदणी, धडकी, बरसात, छाला, कुरकुरी, ज्वर, मुतरा वगैरेंवर इलाजः

वेखंड, ००।० पावशेर, अंबेहळद ००।० पावशेर, चित्रकमूळ ००।० पावशेर, कुचला ००।० पावशेर, इंद्रावन खार ००।० पावशेर, काटेइंद्रावणीचा मगज ००।० पावशेर, मुरदडाशिंग ००।० पावशेर. लसूण ००।० पावशेर, कांदे पांढरे ००।० पावशेर, वाघाचे मांस एक तोळा, चिमणींचें मांस व हाडें पावशेर, तरसाचे कपाळाचीं हाडें ००।० पावशेर, बिल्लीचीं (मांजरीचीं) सर्व हाडें ००।० पावशेर, तेलिया सुहागी १ एक तोळा, हिराहिंग १ एक तोळा, कापूर एक तोळा, पिंपळपानें व पिंपळमूळ ४ चार तोळे, सज्जिखार तीन तोळे, मोराची चर्बी एक तोळा, घोरपड या जनावराची चर्बी एक तोळा, आजवानखुरासनी तोळे ६, वावडिंग तोळे ६, अकलकारा तोळे ६, तंबाखू तोळे ६, बकरीचें पित्त १२५ एकशेपंचवीस तोळे,

रूईचीं फुलें एक शेर, बांबाचे झाडाचीं पानें एक शेर, बांबूचीं पानें एक शेर, काळीं जिरें एक शेर, मेथ्यांचें पीठ दोन शेर, काळे धोतऱ्याचें बीं अतपाव, आणि कोंबडें एकरंगी कांपून पोटांतील मैल काढून त्याचे पर, दोन्हीं पाय, व चोंच, अशीं घ्यावीं. नंतर पित्त मात्र निराळें ठेवून बारीक करून त्यांत सर्व औषधें घालावीं. परंतु मांस व औषधें तुपांत भाजावीं. एकवीस विंचू घेऊन त्यांचे नांगे कांपून टाकावे व तूप, व चर्बी एकत्रकरून शिजवावे. बाकी सर्व घालून भाजावें. नंतर मेथीचें पीठ त्यांत घालून काकवी मिसळून एकत्र करावें. दररोज घोड्यास सकाळीं व संध्याकाळीं एकेक अदपाव गोळी. सातदिवसपर्यंत द्यावी. बरे झाल्यावर, देऊं नये. नाहीं तर पंधरा दिवस दाण्यापूर्वीं सकाळीं द्यावी. सर्व रोग बरे होतात. अनुभव आहे.

घोड्यास उचकी लागते त्यास.

देवदाराचीं पानें दोन पैसेभार बारीक करावीं. भुईरिंगणी व सुंठ नऊ नऊ पैसेभार बारीक करून वस्त्रगाळ करावी. त्यांत पावशेर तिळाचें तेल घालून घोड्यास पाजावें.

इलाज २ रा.—मोराचे पर जाळून त्याची राख नऊ पैसेभार घेऊन त्यांत मध दीड पाव एकत्र करून घोड्यास द्यावी. अनुभव आहे.

सुक्या उचकीवर.—साखर पावशेर, व मलई पावशेर, दोन्हीं एकाजागीं मिळवून हें औषध घोड्यास पाजावें.

दुसरा इलाज—दाणा न जिरल्यानें उचकी लागते त्यावर.—एरंडाचें मूळ, बेलमूळ व अजसुंदाचें मूळ, प्रत्येक नऊ पैसे भार घेऊन एकत्र करून कुटावे व अर्धाशेर तिळाचें तेल आणि सवाशेर मध एकत्र करून द्यावे. नंतर त्याजवर खालीं लिहिलेलें औषध द्यावें.

एक शेर बकरीचें मूत पाजावें. भुईरिंगणी, कलुंजी, बावची व देवदार प्रत्येक बराबर घेऊन सर्व शेरभर करावे. वीसशेर पाण्यांत कढ-

वावे. दहाशेर राहिल्यावर पाणी साफ करावें. त्यांत चार शेर तेल, व एकशेर सुंठ बारीक करून त्या पाण्यांत घालावी. अर्धशेर पाणी दररोज द्यावें.

काळजाजवळ गुडदे होतात त्यावर—घोडा मुस्कीलीनें मूत्र करितो. तें मूत्र लाल होतें. व कांहीं वेळानीं फार लाल होतो. गुडघ्याजवळ उजवे अंगास फोड येतात, व त्याचें डोकें फिरतें, खालीं पडतो. फोड डावीकडे झाले तर फार होतात. डोकें हालवितो व डावीकडे पाहतो. त्यास उपाय—

थंडीचे दिवसांत गहूं व गरमीचे दिवसांत जवाचा आटा पाणी घालून पाजावा. २४ डाग द्यावे ते गुडदेचे जागेवर बारा बारा दरबाजूस. हरळी, नागजु, व साफाचें लांकूड ही दोन्ही दारूंत घालून पांढऱ्या मिरच्या घालाव्या व घोड्यास पाजावें.

दुसरा इलाज—बेंबीचें रक्त काढावें.

तिसरा इलाज—महग झाडाचें मूळ—त्याचा रंग पिंवळा असतो.—तें पाण्यांत कढवावें. त्यांत सफेत साखर घालून घोड्यास एक रत्तल पाजावें. अनुभव आहे.

गुदावर फोड होतात त्यावर.

बारिद्गी—गुदाभोंवतीं लाल होतें, रक्त वाहतें, फोड थोडे होतात, त्यावर इलाज—तिळाचें तेल, शेंदूर, किंवा अंड्याचा पिंवळा बलक, सुवासिक तेल, व केशर, एकत्र करून लावावें. किंवा लेप करावा. रक्तचंदनाचे गंधाचा लेप करावा. कापूर व अंड्यांतील पिंवळा भाग दोन्ही एकत्र करून लावावें व शेंदुराचें मलम लावावें.

दुसरा प्रकार—तहाजु रूद्दुबुर. सर्व गुदावर फोड फार होतात. त्यापासून रक्त वाहत नाहीं व कातडें निघत नाहीं. त्यावर इलाज—द्राक्षाचें पाणी, धन्यांचें पाणी, मेण व सुगंधि तेल हीं सर्व

चोळावीं. किंवा कापूर, धन्यांचें पाणी व अश्वत्थ झाडाचें पाणी व मेण हें सर्व तिळाचे तेलांत घालून लेप करावा किंवा शेंदुराचें मलम लावावें.

तिसरा प्रकार—बवाशिर ह्मणजे मूळ व्याध, गुदांत फोड येतात, ते कटीण होतात व घाण येते. कांहीं लोक त्याला धुऊन टाकतात. दोऱ्यांनीं ते फोड बांधतात, ते गुदांतून बाहेर येतात. त्यांस लेप एक करावा. सदहू फोड कांपतात. अनुभव आहे.

उपचार—कांपल्यावर फुलाचें तेल लावावें. नंतर कागद घेऊन जाळून त्याची राख फटकी व माजूम गुलबार ह्याबरोबर घेऊन ती भुकटी गुदास लावावी.

घोड्याचें गुद बाहेर येतें त्यावर.

भाजलेली सोहागी अर्धा छटाक, व मांग कचरा वगैरे काढून दोन टांक भाजावी. मग दोन्ही छाणून घ्यावीं व त्यावर लेप करावा. कांहीं दिवसांत बरें होईल. अनुभव आहे.

लेंडी बाहेर पडते वेळेस गुद बाहेर पडतें त्यास.

हिरडे, व हळद, दोन्ही बरोबर घेऊन भांड्यांत घालून शिजवावें. व बाहेर काढून बारिक करून वस्त्रगाळ करावें. नंतर गुदद्वार बाहेर येतें त्या वेळेस लिंबाचे रसांत कालवून लावावें. लिंबु न मिळेल तर गाईचे पित्तांत लावावें. व तीन दिवसपर्यंत आंत वाळवें. अनुभव आहे.

दुसरा उपाय—सज्जिखार, हळद, कलौंजी, गाईचें पित्त, किंवा राईचें तेल, किंवा कडूतेल, तीन दिवसपर्यंत चोळावें. अनुभव आहे.

गुदांतून रक्त पडतें. त्यास खसखशीचे फळाची साल, जंगली दालचिनी गूळ बरोबर घेऊन कढवावें आणि तांबडी साखर व दारूयांत घालून पिण्यास द्यावी. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—माजूम, डाळिंबाचे झाडाची साल यास शिजवून मग पाणी आणि शिरका एकत्र करून त्याचे आंत घालावें. अनभव आहे.

लेंड्या कठीण होतात व पडल्याबरावर रक्त बाहेर पडतें त्यास.

चक्कादहीं एक शेर आणावें. बेलझाडाचें बीं चार पैसेभार, पांढरें जिरें चार पैसेभार व धने चार पैसेभार हीं सर्व बारीक करून वस्त्रगाळ करावीं. त्यांत दहीं घालून ज्वारीचे पिठांत चवदा गोळ्या कराव्या. दररोज एकेकप्रमाणें दोन आठवडे द्यावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज.—तूप आतपाव, आवळकटी आतपाव, मुरुडफळ एक पैसाभार, पिकलेली भांग चार पैसेभार, अजवान आतपाव, व शक्तरी (खडीसाखर) हीं सर्व साखर खेरीज भिलाव्याचे तेलांत घालावीं, नंतर भाजून बारीक करावीं, मग त्यांत ती साखर घालून ज्वारीचे पिठांत चवदा गोळ्या कराव्या. दररोज एक गोळी देणें. अनुभव आहे.

असहाल किंवा नळसुरी (पोटांतून मैल निघतो).

उपचार.—कितरा झाडाचा गोंद, व इसबगोल, बराबर घेऊन घोड्यास खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

जंगली अंजिराचीं पानें खाण्यास द्यावीं व त्याजवर जव खाण्यास द्यावे.

घोड्याची लीद पाण्याप्रमाणें होते त्यास.

कंगई झाडाचीं पानें अर्धा शेर मोठे घोड्यास व लहान घोड्यास पावशेर, दहीं एकशेर त्यांत कांहीं पाणी घालावें, एक वेळ घोड्यास खाण्यास द्यावें म्हणजे बंद होईल.

अन्न जिरत नाहीं त्यामुळें लीद पाण्याप्रमाणें होते.

डांळिंबाचे दाणे, सुंठ, पिंपळपानें, दगडी मीठ, बेलफळाचा मगज छटाक, किंवा बेलबोळ ज्याचें गुजराथेंत लोणचें करितात तें किंवा कोणी बदामही देतात.

कच्चे डाळिंबाचे दाणे नऊ पैसेभार, कायफळ, इंद्रजव नागरमोथे व कवठ, हीं सर्व औषधें नऊ पैसेभार प्रत्येक घ्यावीं. सर्व बारीक करावीं. पावशेर मध व अर्धा शेर सदहू औषधें एकत्र करून द्यावें.

करंज्याचें बीं व कवठ प्रत्येक पावशेर घेऊन एक शेर साटी तांदूळ शिजवून एक शेर दहीं व पावशेर तूप त्यांत घालून घोड्यास द्यावें. तीन दिवस दाणा देऊं नये. तीन दिवसांत बरें न झालें तर सात दिवस द्यावें. नंतर मासाची शीर व तांदूळाची शीर ह्मणजे पेज द्यावी, पहिल्यानें दाणा कांहीं द्यावा. पुढें वाढवीत जावा.

दुसरा इलाज.—घोड्यास गोडें तेल पुष्कळ पिण्यास द्यावें. चर्बीही पुष्कळ द्यावी.

तिसरा इलाज.—हिंग व दगडी मीठ एकत्र करून वस्त्रगाळ करावें, एक शेर गुळाचे दारूंत दर दिवशीं द्यावें. वरील हिंग साहा पैसेभार व मीठ नऊ पैसेभार द्यावें. अनुभव आहे.

चौथा इलाज.—अजमोदा, अजवान, कारल्याचे झाडाची मुळी, बोळ, शेंदेलोण, राई, मुळटी, काळाकुडा, चिराईत, हिरडे, बाळहिर्डे, कंगाईची पानें, शेंदण्या झाडाचें बीं, जव (आळशी), कितराझाडाचा गोंद, काळे दाणे व पांढरे दाणे, पांढरें जिरें, धावड्याचें मूळ, संभाळू (निरगुडी) चीं पानें, सज्जिखार, अफू जवखार, व समुद्राचें मीठ, हें प्रत्येक बराबर घेऊन व सदहू सज्जिखार सर्वांपेक्षां कमी घेऊन सर्व बारीक कुटावें. सात दिवस घोड्यास खाण्यास देणें.

डिसेंटरी.

हा रोग आंव झाल्यानें, किंवा रक्ताचे ढाळ होऊन, किंवा मोठें नासरू झाल्यानें होतो.

कारणें.—डायरियाचे योगानें, किंवा सर्द जागेपासून होतो.

लक्षण.—ढाळास फार घाण येते, आणि ते पूमिश्रित किंवा रक्तमिश्रत होतात, फार त्रास पडेल, फार बसेल, तहान लागेल, नाडी एका मिनिटांत साठपर्यंत चालते, फार घाबरा होतो, दाणा व चारा खातो, दुबळा राहतो.

इलाज.—हवाशीर ठाणामध्यें टेवावा. गरम झूल किंवा गरम बांडीस बांधावें, दाणा व चारा बारीक करून द्यावा, लिनसिड, चहा, किंवा कांजी देत जावी, पोटास गरम (स्टिम्यूलन्ट) औषधें लावावीं. चार प्रकारचीं औषधें द्यावीं, व तीं तीन तीन दिवसांनीं बदलावीं. प्रथम क्यालोमेल, आणि ओपियम एकेक स्क्रुपळ द्यावें. ह्यानें गुण न आल्यास, तिसरे दिवशीं अलम पावडर दोनपासून चार ड्रामपर्यंत द्यावी. ह्यानेंही आराम न वाटल्यास तिसरे दिरशीं नायट्रोम्यूऱ्याटिक आसिड पाण्यांत मिश्रण करून दिवसांतून दोन वेळां द्यावें. ह्यानेंही बरें न वाटल्यास, टरपेन तेल अर्धा औंस द्यावें. इपिकाक्कायना दीड ड्राम दिवसांतून तीन वेळां द्यावा, किंवा ह्याचे बदली मांदार झाडाची बुकणी द्यावी. बाभळीचा गोंद सहा तोळे, थंड पाण्यांत मिश्रण करून द्यावा. सफेद जिरे एक तोळा, हिंग एक तोळा, अफू अर्धा ड्राम, पीठ, किंवा पाणी मिश्रण करून द्यावें.

आगरू.

घोड्याच्या गुदद्वारांतून अंग बाहेर येतें व फोड येतात, व कळा होतात. त्यास उपचार—गुदाभोंवतीं डाग द्यावा. मग वेळूच्या कांड्या जाळून त्याची राख करावी. ही राख व मिरपूड एकत्र करून

लावावी. वर विटेचा शेक द्यावा. पाणी तापवून त्याणें गुद शेकावें.

क्रिमींवर व जंतांवर.

इलाज.—राई पावशेर, मीठ पावशेर, सेंजण्या झाडाचें बीं पावशेर व दहीं दोन शेर, हें सर्व बारीक करून दह्यांत टाकून दर दिवशीं पावशेरप्रमाणें द्यावें. तीन दिवसपर्यंत सर्व क्रिमी पडून जातील. परंतु घोडयास खरूज फार येईल. त्यास शिरनी व चर्बी, एकत्र करूनशिजवावें व घोडयास खाण्यास द्यावें.सर्व क्रिमी जातील.

माती खातो व जमीन चाटतो त्यापासून क्रिमी होतात. व घोडें दुबळें होतें, फोड होतात. त्याची चलाखीही कमी होते. लीद सुकलेली होते. त्यावर इलाज.—कावळी वावडिंग, आजमोदाः प्रत्येक पावशेर, चित्रक, मिरची, सुंठ, दगडी मीठ, हळद, निमा झाडाचीं पानें, व साल, प्रत्येक नऊ पैसेभार घेऊन बारीक करून सात भाग करावे. दर दिवशीं दोन वेळ दाणापाणी देण्याचे पूर्वी गोमूत्रांत खमिर ह्मणजे शिजवून द्यावें.

लिंबाचीं पानें व साल, हिर्डे, व बाळहिर्डे, प्रत्येक पावशेर घेऊन बारीक करून दहा शेर पाणी कढवून पांच शेर पाणी राहिल्यावर दोन शेर मूग घालावे. आणि शिजवावे. त्यांत चार शेर तिळाचें तेल घालावें. सकाळीं घोडयास खाण्यास द्यावें.

दुसरा इलाज.—अजवान, किरमाणी ओंवा, करंज्याचें बीं, पळसपापडी, कमेदा व वावडिंग, एकेक अतपाव घेऊन बारीक करून गुळांत गोळ्या कराव्या. सात दिवस घोडयास द्यावें. अनुभव आहे.

तिसरा इलाज.—धने एक मूठ पाण्यांत टाकून सारी रात्र ठेवावे. सकाळीं बाजरीचे पिठांत एकत्र करून घोडयास तीन दिवस द्यावें. बकाणा झाडाचीं पानें पावशेर बारीक करावीं. दह्यांत घालून

सारी रात्र ठेवावें, सकाळीं पावशेरप्रमाणें घोड्यास तीन दिवस द्यावें.

पोटांत गोमाशा होतात त्यावर.

घोड्याचे पोटांत गोमाशा होतात त्या योगानें तो फार खातो परंतु दुबळा होतो. जैतूनचें तेल हातास लावून घोड्याचे गुदांत घालावें.

पारकिडा होतो त्यावर इलाज.

घोड्यास लाल तोंडाचे क्रिमी होतात त्यास पारकिडे ह्मणतात. त्याचा इलाज कोणास कळत नाहीं.तो इलाज मीं स्वत: पाहिला आहे. दिल्लीस पातशहा सुलतान महंमद याचे घोड्यास आजार झाला होता त्यावर एका मनुष्यानें इलाज केला तो.

१ चंदन पांढरा, १ हिंगण झाडाची साल, १ कपिला, १ हिंग, १ पळसपापडीचें बीज, १ सेवतीचें फूल, आणि नाईकीरा काळा हीं सर्व वस्त्रगाळ करून पाणी घालून तें नळीनें घोड्यास पाजावें.

दुसरा इलाज—हिराहिंग तोळे चार, पळसपापडी पावशेर, काळी मीठ पावशेर,रुईचा चीक चार तोळे,सेंधेलोण पावशेर,राई पावशेर, तूप दोनशेर,कुटकी पावशेर,कोरफड एक तुकडा,मेथ्यांचें पीठ दोनशेर, घोरपडीचीं नखें काढून व पोटांतील मैळ काढून हाडें व मांस बारीक करावें; घोरपडीचें मांस तुपांत तळावें, मग सर्व वस्तु बारीक करून तुपांत भाजून एकत्र कराव्या. अतपावाची एक गोळी करावी. सकाळीं व संध्याकाळीं एकेक गोळी चाळीस दिवस द्यावी. गूळ किंवा लसूण किंवा आलें यांचें पाणी तयार करावें, त्यांत गोळ्या कराव्या.अनुभव आहे.

पांढरे क्रिमी होतात त्यावर.

घोडयास पांढरे क्रिमी होतात ते भोपळ्याचे बियांप्रमाणें असतात. त्यास कद्दूदाणा ह्मणतात व त्यांचा रंग पांढरा असतो.

उपाय—तेलिया सुहागी तोळे आठ ८, सोनामुखी चार ४ तोळे, अंबेहाळद १२ बारा तोळे, कोळिंजन दोन २ पैसेभार, अजवान १२ बारा तोळे, गूळ बारा तोळे, हें सर्व बारीक करून सात गोळ्या कराव्या. मग सकाळीं एक व संध्याकाळीं एक द्यावी व घोडयास चार तास फिरवावें.

पांढरे व काळे क्रिमी होतात त्यावर.

गंधान झाडाचीं पानें मूठभर खाण्यास द्यावीं. तीं सकाळीं दाणा व पाणी देण्याचे पूर्वीं सात दिवस द्यावीं. फार अनुभव आहे.

मीरअलीनें केलेलें अनुभवशीर औषध कशाही प्रकारचे क्रिमी असले तरी बरे होतात. कुटकी अतपाव, डिकेमाली अतपाव, कापूर अतपाव, पळसपापडी अतपाव, सोनामुखी अतपाव, राई अतपाव, हींग छटाक, काळीं मिरें अतपाव, गंधान झाडाचीं पानें सुकलेलीं अतपाव, लिंब झाडाचें बीं छटाक, अमलतास झाडाची साल व सेंधेलोण(काळें व पांढरें) पावशेर, वच (वेखंड) अतपाव, बोळ छटाक, चिराईत छटाक, हिरडे व बाळहिरडे अतपाव, गुग्गूळ अतपाव, लसूण पावशेर, गजगा मगज अतपाव, अंबेहाळद अतपाव, मिरे अतपाव, कुचला अतपाव, बावडिंग तीनपाव, अजवान तीनपाव, सुहाब झाडाचें बीं, इंद्रजव अतपाव, करंज्याचें बीं अतपाव, फटकी अतपाव, सुंठ अतपाव, घीकवारचा मगज (कोरफड) अतपाव, हिंग छटाक, मेथीचें बीं अतपाव, मिरच्या लाल, पिंपळी अतपाव, बडीशोप पावशेर, लाहोरी मीठ अतपाव, हिंगण झाडाची साल छटाक, बेलाचा गीर छटाक, कपिला छटाक, पापडखार अतपाव, बांगडखार छटाक, हें सर्व बारीक करून वस्त्रगाळ करावें व तीन दिवस दह्यांत घालून ठेवावें. मग त्यापैकीं पावशेर घेऊन गोळी करावी. सकाळीं दाणापाणी देण्याचे पूर्वीं द्यावी. केलेलें औषध संपेपर्यंत द्यावें. सुकलें तर पुन्हा मठ्ठा घालावा. कसेही प्रकारचे

क्रिमी असल्यास मरतील. व लिदीबराबर बाहेर पडतील आणि घोडा ताजा होईल. अनुभव आहे.

पाऱ्यासाईट (किडा.)

हा रोग तीन जातींचा आहे, पाहिल्यास लंबरी कार्डीस ह्मणतात. हा आठरा इंच लांब असतो. दुसरे लहान लहान असतात व मोठाही आंत असतो. हे काळ्या रंगाचे असतात. तिसरा स्ट्रंग्यूलस हे लहान आंतल्या आंत रहातात. ह्यांस काढलें नाहीं तर अंड्या एवढे मोठे होतात व त्यांच्या योगानें घोडा दुबळा होतो.

कारण.—घोडा दुबळा झाल्यानें, वाईट दाणा किंवा चारा ज्याच्यांत अंडीं किंवा कीड असते तो दिल्यानें होतो.एखादे वेळेस तयार घोड्यासही हा रोग होतो, ह्याचें कारण समजण्यांत येत नाहीं.

लक्षण.—लिदीच्याबरोबर किडे पडतात, कुरकुरीप्रमाणें दुःख होईल, शेपूट हालवीत राहील, लीद करितांना गुदद्वार उघडें राहतें, शेपूट वर करतो त्यावेळेस पिंपळी किंवा पांढरी वस्तू नजरेस येते. दिवाल चाटतो, वरचा ओंठ वर धरतो, तोंड सुकलेलें किंवा खरबडीत राहतें, कातडीं चिकटलीं जातात, शेपूट वर करून पाहिलें तर अर्धाच तुटलेला किडा दृष्टीस पडेल.

इलाज—इलाज पुष्कळ प्रकारचे आहेत. पैकीं दोन प्रकारचे इलाज करावेत.——सलफेट ऑफ कापर दोन ड्राम, खूप बारीक करून चार रोजपर्यंत द्यावें, पुन्हां जुलाब द्यावा. पुन्हां टानिक दवा द्यावी. दुसरा इलाज.—स्यांटोनाईन एक ड्राम संध्याकाळीं दाण्यांत घालून द्यावें, पुन्हां सकाळीं जुलाब द्यावा. पळसपापडी एक तोळा, बाजरीचें पीठ एक तोळा, तेलांत तळून खाण्यास द्यावें. राई एक तोळा, अजवान एक तोळा, वेड्या बाभळीच्या शेंगा चार, किंवा दोन, काळा निमक ताकांत गाळून पिण्यास

द्यावें, किंवा शिताफळाचें बीं कुटून ताकांत गाळून पिण्यास द्याव.

पाठीवरचे हाडाचे आसपास फोड होतात सावर.

मेण, तिळाचें तेल, शेंदूर, सर्व ऊन करून त्याचा लेप करावा. कित्येक लोक खांद्याजवळचें हाड कांपून सदर्हू मलम लावतात.

पोटांतील आंतडीं तुटतात त्यावर.

घोडा जें खातो तें नाकांतून निघून येतें. रक्त तापल्यानें व कफाचे योगानें असें होतें त्यास इलाज नाहीं परंतु कांहीं कांहीं करितात. थंड वस्तु खाण्यास द्यावी. त्याचे नाकांत थंड पदार्थ घालावे. तंग बांधल्यात तेथील रक्त काढावें.

घोड्यास कुर्कुरी होते त्यास.

घोड्यास कुर्कुरी होते त्याचें कारण, सर्दीपासून होतें. व मातीच्यापासून किंवा लांकडाचे तुकडे गवतांत येतात ते खाल्यापासून असें होतें व त्या योगानें पोटांत मुरडतें आणि दुखतें. आंतडीचें नांव ऊर आहे. त्याला एक तोंड असतें. तें लांकूड वगैरेंनीं बंद होतें. त्यामुळें मुतणें व हागणें बंद होतें, तेणेंकरून जमिनीवर पडतो, लोळतो, त्या समयीं घोडा मरतो व एखादे घोड्यास त्याच वेळेस घाम निघून फोड होतात त्या योगानें मरतो. त्यास सुरम्याचा इलाज करावा. तो येणेंप्रमाणें,—काथ पांढरा, भुक, मोचरस, राई, अकरा दाणे डाळिंबाचे, अजमोदा, हीं सर्व बारीक करून गोळ्या करून खाण्यास द्याव्या, दर्द राहील.

दुसरा इलाज—लाल क्रिमी होऊन दर्द होतें त्यास. किसनी (धने) एक पैसाभार, नागरमोथे एक पैसाभार, खस (वाळा) एक टांक, सुंठ एक टांक, व बेलाचा मगज एक टांक, सर्व बारीक करून

तीन पुड्या कराव्या. अच्छेर पाणी घालून त्यांत सदर्हू जिन्नस शिजवावे. छटाक पाणी राहिलें ह्मणजे सर्व लाल क्रिमी पडतात. अनुभव आहे.

३रा इलाज-हिंग१ सहा मासे, लिंबू१ एक खट्टें मोठें. लिंबाचे आंत हिंग ठेवून त्यास कपडमढ करावें, विस्तवांत शिजवावें, शिजल्यावर सर्व लिंबू खाण्यास द्यावें. दोन तास मालिस करावें, नंतर कांहीं लाल मिरच्या बारीक करून शरीरांत (गुदद्वारांत) घालाव्या.

कांहीं राई घेऊन बारीक कराव्या. त्या त्याचे शरीरास व अंडास चोळाव्या. व विस्तवानें शेकावें, ह्मणजे घोडा मुतेल व हागेल.

वावडिंग एक तोळा, अंजिराचें तेल एक तोळा व एरंडीचें तेल एक तोळा. अर्धशेर पाणी गरम करून त्यांत तेल टाकावें. नंतर वावडिंग बारीक करून घालावें आणि शिजवावें. अर्धे पाणी राहिल्यावर नळींत घालून पाजावें.

आणखी उपाय—हिंग एक तोळा, व मस्का छटाक, एकत्र करून घोड्यास खाण्यास देणें.

काळींमिरें एक पैसाभार भाजून बारीक करून तुपांत घालून क्रिमी झालेल्या घोड्यास खाण्यास देणें.

चुन्याची ताजी कळी त्यांत पाणी गेलेलें नसावें. व हर्ताळ हीं दोन्हीं समभाग घेऊन चण्याबरोबर गोळी करून ज्वारीचे पिठांत मिळवून घोड्यास खाण्यास द्यावी. अनुभविक आहे.

जर घोडा मरण्याचे बेतांत असेल तर त्यावर इलाज.—बकरा किंवा बकरी आणून त्यास कापून त्याचें ताजें रक्त व त्याचे पोटांतील गू घेऊन दोन्हीं एकेठिकाणीं मिळवून ऊन ऊन घोड्यास पिण्यास द्यावें. अनुभविक आहे.

करड एक तोळा, व रेवाचिनी एक तोळा, हीं एक शेर पाण्यांत बारीक करून ऊन करावीं. व तें पाणी जरा निवाल्यावर एका नळींत घालून घोड्यास पाजावें.

आलें, व खडीसाखर, हीं बारीक करून एकत्र करावीं. मग त्याच्या गोळ्या करून त्यांपैकीं एक गोळी घेऊन घोड्याचे शरीरांत घालावी. ह्मणजे त्यास लघवी होईल व लीदही करील. कुरकुरी बरी होईल. अनुभव आहे.

घोडा मोठा असल्यास काळे धोतऱ्याचीं पानें सात, व लहान असल्यास साडेतीन व हिराहिंग एक तोळा अशीं दोन्ही एकत्र करून घोड्यास खाण्यास द्यावीं. ह्या पानांपासून चमत्कारिक फायदे होतात. अनुभविक आहे.

साबण अतपाव भाजलेला, हळद छटाक, जुना गूळ अतपाव, व हलीम याचें बीं अतपाव, गुग्गूळ छटाक, गेरू छटाक, सज्जिखार अतपाव, सुहागी छटाक, फटकी अर्धपाव, अफू चार तोळे, रुईचीं पानें शंभर. फटकी व सुहागी या दोहोंस भाजावें व बाकीच्यांस बारीक करून त्याच्या लिंबाएवढाल्या गोळ्या कराव्या. दररोज एक दोन गोळ्या खाण्यास द्याव्या. अनुभव आहे.

काजरी (सुकलेलीं वांगीं) चार तोळे, वेखंड चारपैसेभार, कुटकी, सतवासोट (सुंठ) चार पैसेभार, पिंपळी चार टांक, हिंग उत्तम एक तोळा व द्राक्षाचा शिरका पावशेर घेऊन किंवा शिरका न मिळाल्यास गुळाचे पावशेर दारूंत किंवा तीही न मिळाल्यास गूळ पावशेर घ्यावा.सर्वांस बारीक करून शिरक्यांत किंवा दारूंत किंवा गुळांत किंवा बाजरीचे पिठांत घालून एकत्र करावे. व बांबूचे नळींत घालून पाजावें. पुष्कळ वेळां अनुभव घेतला आहे परंतु दोन दिवस घोड्यास दाणा देऊं नये. व पाणी गरम करून एक वेळ देणें. पोटभर पाणी पाजूं नये.

कुरकुरी व पोटांतील दर्द यांमुळें घोडयास मूत होत नाहीं व लेंडीही करीत नाहीं.

त्यास उपाय.—जमालगोटे चार घेऊन एकशेर गाईचे दुधांत

कढवावे. दूध निम्मे राहूं द्यावे. नंतर ते काढून त्यांचे वरचें सालपट काढावें. नंतर पावशेर मधांत एकत्र करून घोड्यास खाण्यास द्यावे. व दूध टाकून द्यावें. अनुभव आहे. घोडा मूत करील व लेंडीही करील ह्मणजे जुलाब होतील. जुलाब बंद न झाल्यास एकशेर तांदूळ शिजवून त्यांत पावशेर तूप घालून व एकशेर चक्कादहीं घालून द्यावें ह्मणजे जुलाब बंद होतील.

कुरकुरी व पोटांतली दर्द व पारकिडा लाल झाला असतां घोडा जमीनीवर धरपडतो व दोन्हीं पाय मारतो, जीभ सुकते, पोट फुगते, मलमूत्र बंद होतें. त्यास उपाय.—

बकऱ्याचें ताजें रक्त, हिराहिंग सहामासे व बकरीचे कातड्याचे आंतील गोवर हीं तिन्हीं एकत्र करून बांबूचे नळींत भरून घोड्यास पिण्यास देणें. परंतु त्यांत थोडा कांद्याचा रसही घालावा.

दुसरा इलाज—खसखशीचे झाडाचीं साल नऊ टांक, पळसबीज नऊ टांक, खारीक सुकलेली पावशेर जुनी, ओंवा एक टांक, गुलकंद एकशेर, हीं सर्व बारीक करून घोड्यास तीन दिवस खाण्यास द्यावें. अनुभव आहे.

घोड्याचें पोट फुगतें त्यास उपाय.- तरवड झाडाचा डिंक एक तोळा, पळसाचा डिंक एक तोळा, काळें मीठ छटाक, व बांगडखार छटाक, ह्या चौंवांस निरनिराळें बारीक करून एकत्र करावें. नंतर मनुष्याचे मुतांत गोळ्या कराव्या. व कांहीं मूत घेऊन घोड्याचे नाकांत घालावें. घोडा त्याच वेळेस बरा होईल.

दुसरा इलाज—गरमीपासून कुरकुरी वगैरे दर्द होतें त्यावर सुंठ पावशेर, काळी मिरें अतपाव, पोखरमूळ एक पैसाभार, कुटकी एक पैसाभार, बच(वेखंड) एक पैसाभार, व ओंवा पावशेर, हीं सर्व बारीक करून दर रोज एकवेळ घोड्यास खाण्यास द्यावीं. अनुभव आहे.

घोड्यास पुष्कळ पिटलें व वर लगेच त्यास गार पाणी पाजलें

तर त्याचे पोटांत दुखतें व आवाज होतो. ह्मणजे पोटांत गुरगुर वाजतें. त्यामुळें घोडा खालीं बसतो व पाय आपटतो व लांब करतो त्यास उपाय.—

सतवा (सुंठ) सहा टांक, पिंपळी सहा,टांक पिंपळमूळ सहा टांक, वावडिंग सहा पैसेभार, अजवान सहा पैसेभार, एरंडयाचें तेल. (रौगन शितवर) हीं सर्व औषधें बारीक करून एकत्र करावें. व तीन दिवस द्यावें. अनुभव आहे.

घोड्याचे पोटांत शूळ होतो, व पोटावर फोड होतात, आणि लघवी बंद होते, व शेंपूट हालवतो, त्यावर इलाज.—

पाखरा झाडाची साल नऊ टांक, तिळाचें तेल शेर एक, हिंर्डे आठ टांक, बच नऊ टांक, सुंठ नऊ टांक, गुलकंद एकशेर, सर्वांस बारीक करून एकत्र करावें. व तीन दिवस द्यावें. अनुभव आहे.

कुकुरी व पोटांतील दर्द यावर दुसरा इलाज.–

लिंबाचीं पानें, अजवान, सुंट, पिंपळपानें, काळीं मिरें, राजहंस, शेंदेलोण, जवखार, खाण्याचें मीठ, बडिशोप बारीक करून वस्त्रगाळ करावीं. त्याचें पाणी द्यावें. मध उत्तम बकानाचीं पानें, व काळें मीठ (पादेलोण).हें सर्व बारीक करून व सर्व बराबर वजन घेऊन तीन दिवस देणें. वायूशूळास, कुरकुरीही ह्मणतात. पोटांतील आंतडीं बंद होतात. ही बिमारी आठरा प्रकारची आहे.

वायुकुलन याचे सहा प्रकार.

यांजवर अजवान अर्धाशेर, बचअठराटांक, वावडिंग अर्धाशेर, अजमोदा अर्धाशेर, मीठ (पादेलोण) अर्धाशेर, हिंग एकूणतीस टांक, कोष्टकोळिंजन अर्धाशेर,व लसूण अठराटांक,ह्या सर्वांस बारीक वस्त्रगाळ करून त्याचेतीन भागकरावे. पैकीं एक भाग औषध त्यांत लसूण पैसाभार घालून व बंदजिर झाडाचें तेल हे सर्व पाण्या बरोबर द्यावे.

दुसरा प्रकार—पोटांत शूळ ही दर्द झाली असतां घोड्यास फोड होतात व ऊठबस करितो. कारण, त्याचे पोटांत दाणा किंवा कडबा यांत कीड जाते. त्या योगानें असें होतें. त्यास उपाय—

तिळाचें तेळ एक शेर, गाईचें तूप एक शेर, व दूध एक शेर, हीं तिन्ही एकत्र करून कढवावीं, एक कढ आल्यावर उतरून घ्यावें. व थंड झाल्यावर नळींत घालून पाजावें.

घोड्याचे पोटांत बेडकी गेली तर.

कोष्ट, पांढरेजिरे, हिर्डे, हिंग, नागरमोथे, अजवान, व बच हे एकत्र करून ऊन पाण्यांत द्यावे. त्या योगानें विष जाईल.

शूळ होतो त्यावर.—तूप पावशेर, गाईचे दूध अर्धशेर, पिंपळी चार पैसेभार, सुंठ दोन पैसेभार हें सर्व बारिक करून एकत्र करावें, व खाण्यास द्यावें. अनुभव आहे.–

सहावा प्रकार शूळ—पाण्याची तहान फार लागते. तेव्हां पाणी फार पिऊं देऊंनये, दिलें तर पोटांत दर्द होते. पोटावर फोड होतात. त्यावर उपचार.

अजवान, बच, पिंपळी, सुंठ हीं सर्व पाण्यांत उगाळून द्यावीं. एक तासांत बरें होईल. अनुभव आहे.

सातवा प्रकार शूळ—घोड्यास ताप येतो, दर्द होते, व बसतो, त्यास उपचार.–

चिराईत, तुरटी, गुलपलस (पळसाचें फूल), पांढरें जिरें, गुलाबपाण्या बरोबर द्यावें. अनुभव आहे.

आठवा प्रकार शूळ—पोटांत दर्द होते त्यामुळें मूत बंद होतें, पोटावर फोड येतात, हातपाय आपटतो, त्यास उपचार.–

सुंठ बारीक करून घोड्याचे डोळ्यांत, नाकांत व शरीरांत घालावी, ह्मणजे मूत होतें.

नववा प्रकार शूळ.—पोटांत मुरडतें त्यास उपचार—कापूर,व जवदाणे, शरिरांत ठेवावे, त्या वेळेस त्याजला लवकी होईल. नागरमोथे, कचूरा, अजवान, अजमोदा, काळीं कारळीं,इंद्रजव,वावडिंग, हें बारीक करून खाण्यास द्यावें.

दहावा प्रकार शूळ—सर्दी व गर्मीमुळें दर्द होते, त्यास इलाज—मशागुग्गूळ, पिंपळीं, पिंपळमूळ, कुटकी, पिंपळपानें, काळेदाणे, जिरें, वावडिंग, हिरडे, जवखार, ज्येष्टमध, आजमोदा, खोडवच हें सर्व चार पैसेभार, अफू अर्धापैसाभार, अंबमूल, आंबोशी, सुंठ अर्धाशेर, अर्धाशेर पाण्यांत अफू घोळावी. हें सर्व एकत्र करून त्यापैकीं चार पैसेभार घेऊन नरमूत्रांत रात्रभर ठेवावें. नंतर सकाळीं द्यावें.

अक्रावा प्रकार.—बोज्याचे पोटांत दाणे हाजम (जिरत) नाहींत, लिद्दीवाटे जातात. त्यास उपचार.—

सुखवले दाणे, कडू कुसुंब्याचें बीं, चिकंदर, गूळ, खैरसाल व फूल, सर्व बराबर घेऊन कढवून गोळ्या कराव्या. त्यांत तूप घालावें. मग गुदद्वारावाटे पोटांत घालावें. व कांहीं खाण्यास द्यावें ह्मणजे दाणा जिरेल. व बेंबीजवळ डागही द्यावा. याप्रमाणें कोणी डागाजवळचें रक्तही काढतात. साबूण बारिक करून गुदद्वारांत घालावा. सुखे दाणे, फटकी, गुग्गूळ, पुदाणा व शलगम, पाणी घालून कढवावें. अर्धे राहिल्यावर छाणून मीठ घालावें. व चर्बी ऊन करून गुदद्वारांत घालावी.

बद्धकोष्ठ व सर्दीपासून दर्द होतें, पोट वाजतें त्यास उपचार.—

फटकी, सुखले दाणे, बांस, असपरख, कांदा, व जंगलीकांदा उंदराची चर्बी काढून कढवून तिसरा हिस्सा पाणी ठेवावें. त्यांत मीठ व तिळाचें तेल घालून गुजद्वारांत घालावें.

आळसी, आलें, सुखेदाणे, बोळ, कुमूस, अंजिरपानें व कांदे,

पाणी बरोबर घालून कढवून तिसरा हिस्सा ठेवावें. मग मीठ घालून कोंबडी व बदक यांची चर्बी घालावी. व हेंही शरीरांत घालावें नाहीं तर जुलाब द्यावा. त्याणें बरें न होईल तर सकाळीं घोड्यास पाणी पाजावें. बकरीची चर्बी किंवा कोणतेही जनावराची चर्बी द्यावी. तिळाचें तेल व सोरा एक टांक,या सर्वांस छाणून एकत्र करून शरिरांत घालावें. शरीरांत घालणार माहितगार असावा. अनुभव आहे.

कचनाळ झाडाची साल अर्धाशेर, तीन शेर पाण्यांत घालून कढवून एकशेर राहूं द्यावी. हें पाणी गरम दुधाबरोबर पाजावें. जुलाब होईल. जुलाब झाल्यावर तांदूळ शिजवून अर्धाशेर दहीं व पावशेर तूप घालावें. आणि घोड्यास पाजावें. अनुभव आहे.

जुलाबाची तरकीं—एरंडाचें तेल पावशेर, गाईचें दूध शेर, सोनामुखी सहा मासे, अमलतास एक तोळा, हिरडे ४, बाळहिर्डे चार, कासनीस सहा मासे, तीन शेर तुपांत कढवून एक शेर ठेवावें. आणि घोड्यास पाजावें. तें दूध व तेल एकत्र करून दवा काढून बाकी चें पाजावें. एकवेळ घोड्यास ऊन पाणी द्यावें. फार जुलाब झाले तर एकशेर दहीं व एकशेर तांदूळ शिजवून घोड्यास खाण्यास द्यावे. अनुभव आहे.

नाभिरोग.

नाभिरोग समजण्याचा प्रकार—बेंबींत गांठी होतात त्याजवर इलाज—दोन्ही हातांच्या शिरांचें रक्त काढावें. व सुंठ, पिंपळी, काळे मिरे, सिरसाची साल,व हळद, हीं समभाग घेऊन चिंचेच्या रसांत एके ठिकाणीं करून खापरांत घालून ऊन करून, सुजले ठिकाणीं लेप करावा. आणखी चाटण द्यावयाचें तें—वेलदोडे, सुंठ,

लवंग, धणे, कंकोळ, हिरडा, बेहडा, अवळकटी हें सभभाग घेऊन पूड करून तुपामध्यें कालवून चार दिवस द्यावें.

बेंबी सुजते त्यास वढिया ह्मणतात. त्यास उपचार.—

पुढील पायाच्या शिरांचें रक्त काढावें. मग सुंठ, मिरे, पिंपळी, सिरसाची साल व हळद, हे समभाग घेऊन चूर्ण करून चिंचेच्या बरबटांत कालवून, खापरांत ऊन करून त्याचा नाभीस लेप करावा. त्यावर चिरगुटें बांधावीं. असें तीन दिवस करावें. नंतर सुंठ, लवंगा, कंकोळ, धने, हिरडे, बेहडा, व आवळकटी ४ टांक प्रत्येकीं, येणेंप्रमाणें घेऊन, त्याचें चूर्ण करून, तूप अगर मध यांत कालवून सात दिवस पोटांत द्यावें.

घोड्याचे नाभींत फोड होऊन त्यांतून पू जातो. त्यास उपाय—

चिंचेवरील टरफलाची बारीक पूड करावी. व फोड ऊन पाण्यानें धुवावे. व तुपाचा लेप करावा, व त्यावर सदर चिंचेची लिहिलेली पूड टाकीत जावी. असें बरें होईपर्यंत करावें. व त्या जागेवरील केंस गेले तर रेड्याचें शेण आणून त्याचा रस घेऊन त्यांत तूप मिळवून खापरांत ऊन करावें. आणि केंस गेले ठिकाणीं केंस येईपर्यंत लेप करावा.

बेंबी व पोटाखालील रोग.

घोड्याचे पोटावर हात मारला असतां पाण्याचे मसक्यावर हात मारून अवाज होतो त्याप्रमाणें होतो. हा रोग पाणी पिण्यापासून होतो. मेहनतीनंतर पाणी फार पाजलें तर होतो. त्यावर इलाज—

पोट नरम करून पोटांतील पाणी काढून टाकावें. कोंबडी एक, व कबूतर एक, अर्धा रत्तल मास प्रत्येकाचें घेऊन एकत्र करावें. पिण्याचे दारूंत व जैतूनचें तेल बुरा अरमणी सर्व मिळवून घोड्याचे गुद-

द्वारांतून पोटांत घालावें. त्यावर दोन रत्तल दारू पिण्यास द्यावी ह्मणजे पिवळें पाणी निघून जाईल.

दुसरा इलाज.—पुदिना, व इसबगोल, जवांबराबर एकत्र करून खाण्यास द्यावे. पिण्यास जवशिरचे झाडाचा चीक, कुटकी, व बोळ, बरोबर घेऊन पिण्यास द्यावें. कांहीं लोक घोड्याचें पोट बेंबीखालीं तीन अंगूळ फाडून भोंक पाडून त्यांत नळी घालून पिवळें पाणी काढून घेतात. आणि नंतर जखम भरण्याचें औषध लावतात.

पोटाखालीं फोड बेंबीपर्यंत व तंगापर्यंत होतात. त्यावर इलाज—चवक, लालमिरची, जिरे सफेद, व गंधान झाडाचीं पानें हें सर्व बारीक करून आतपाव किंवा पावशेर एक वेळ दाण्याचे पूर्वीं खाण्यास तीन दिवस द्यावें. अनुभव आहे.

घोडयाचे पोटाखालीं कठीण फोड होतात. कठीण असल्यास तंबाखू चार पैसेभार, कळीचा चुना चार पैसेभार, चार पैसेभार जुना गूळ, व हिंग पावशेर. तंबाखू गुळांत घालून मळावी. थोडें पाणी घालावें. फोड कांपून धुऊन त्यांत दवा घालून लावून त्यावर पिलू किंवा चांदवेलीचीं पानें बांधून तीन दिवस ठेवावीं. दुसरा इलाज—पांढरे जिरे, व कोष्ट, हीं दोन्ही खाण्यास द्यावीं. गूळ व खोबरें बारीक करून त्यावर चोळावें. अनुभव आहे.

दुसरा इलाज—कुटकी पावशेर, काळीं मिरें पावशेर, व अंबेहाळद पावशेर. गुळांत गोळी तयार करावी, दिवसांत दोन वेळ सकाळीं व संध्याकाळीं चार दिवसपर्यंत द्यावी. तिसरा इलाज.–बेंबीखालीं, पोटाखालीं व अंगावर फार कठीण फोड होतात. बेंबीवर व चेहऱ्यावर काठवठ ह्मणतात. किंवा तबकही ह्मणतात. त्यास उपाय.—मैदालकडी एक तोळा, व हिरा गुग्गूळ एक तोळा बारीक करून नंतर गुग्गूळ मैदालकडींत घालावा. कपड्यांतून छानून लिंबाचे रसांत खल करून नंतर लेप करावा. अनुभव आहे.